# महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्रे

श्री. रं. म. जोशी



REFBK-0029338

सरस्वती ग्रंथ भांडार, पुणे

ऐतिहासिक अथवा धार्मिक अशा सुप्रसिद्ध ठिकाणांची
उत्तम माहिती असलेले उपयुक्त पुस्तक

# महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्रे


लेखक :
**रंगनाथ मनोहर जोशी**
**नेर्मळगुरुजी)**



REFBK-0029338


**किंमत २० रुपये**


**मे. सरस्वती ग्रंथ भांडार**
अप्पा बळवंत चौक, पुणे २.
Fax : ०२१२ ४५१२१९
☎ : ४५१२१९/४५११५८

**मे. सरस्वती बुक डेपो**
नवी पेठ, सोलापूर ७.
☎ : २६६३०

कै. ती. मातोश्री
जानकीबाई म. जोशी
यांचे चरणी
सादर समर्पण.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
मु. प्रवास
८१०
दा. क्र. २९३३८
१०।११।९८
... शाखा

संदर्भ
मु. प्रवास
८१०

२९३३८
१०।११।९८

प्रस्थान

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

सूचना : खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे. तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (६) नुसार प्रतिदिनी २५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल. (किमान दंड १ रुपया घेतला जाईल.)

३।१२।९८

21 FEB 1998

28 FEB 1998

8 APR 1998

३।१।९९

२।२।९९

६।३।९९

१५।३।९९

(कृ.मा.पहा)

१६०००/११-९५

## अनुक्रमणिका


१. अष्टविनायक ...........
२. श्रीक्षेत्र कोल्हापूर ......२
३. श्रीक्षेत्र जेजुरी. .........२
४. श्रीक्षेत्र नेवासे .........५
५. श्रीक्षेत्र रामटेक.........५
६. श्रीक्षेत्र तुळजापूर .......६
७. श्रीक्षेत्र राक्षसभुवन .....७
८. श्रीक्षेत्र पंढरपूर .........७
९. श्रीक्षेत्र देवाची आळंदी..८३



**प्रकाशक : मुद्रक**

प्रकाश य. कुंदूर
**मे. श्रीराम ऑफसेट**
१४/२३, 'गायत्री', धायरी,
पुणे ४११०४१.

**संपादक :**
श्री. शरद

**संस्कारित आवृत्ती :**



© सर्व हक्क प्रकाशकाधीन



*श्री. र. म. जोशी, निर्मळगुरुजी यांची पुस्तके*

आबा आणि गणबा
आपले सुख आपल्या हाती व
पानिपतची कहाणी
पिंजऱ्यातील प्राण
झाशीच्या राणीची कथा
नवी वजने,नवी मापे
माझा मराठाचि बोल कवतुके
स्वदेशी कारखानदार
दानशूर कुबेर
प्रफुल्लचंद्र रॉय
बाशिंगबळ
ऐका हो ऐका
सोन्याचा दिवस
नवा प्रधान
सुखी सम्राट
मुरारबाजी
गुणाशी गाठ
ससेभाऊंच्या गमतीजमती
भारतीय नद्यांची कहाणी
सुंदर आमुचा गाव
सण, उत्सव आणि दिनविशेष
श्री लक्ष्मीमाहात्म्य
संपूर्ण श्रीगणेशपूजा
संपूर्ण कोकिळा व्रत-उपासना
शिवाजी महाराज
गौतम बुद्ध

# महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्रे

## १. अष्टविनायक



"ॐ श्रीगणेशायनमः ।" कोणत्याही शुभकार्याला प्रारंभ करताना आपण श्रीगणेशाचे नाव घेतो. गणपती हा सुखकर्ता आणि दुःखहर्ता आहे. तो श्रेष्ठ सिद्धिविनायक निर्विघ्नपणे सर्व कार्ये पार पाडतो.

अखिल हिंदुमात्राला पूज्य असलेल्या श्रीगणेश देवतेच्या कथा व तिच्या नामरूपाची अनेक वर्णने पुराणान्तरी लिहिलेली आहेत. विशेषतः मुद्‍गल पुराण, श्रीगणेशपुराण, विनायक-माहात्म्य, चिंतामणीविजय, परळीमाहात्म्य इत्यादी ग्रंथांतून गणपतीच्या अनेक कथा सांगितल्या आहेत.

कृतयुगातील विनायक<br>
त्रेतायुगातील मयूरेश्वर<br>
द्वापारयुगातील गजानन<br>
कलियुगातील धूम्रकेतू

इत्यादी गणेशाचे अवतार प्रसिद्ध आहेत. याखेरीज पार्वतीपुत्र गजानन-गणेश, गुणेश, अष्टविनायक हेही गणपतीचे अवतार झाले.

गणपतीला अनेक नावे आहेत. कोणी सहस्रनामावली गातो, तर कोणी एकशेआठ नावे; पण-

'सुमुखश्चैकदंतश्च कपिलो गजकर्णकः ।<br>
लंबोदरश्च विकटो विघ्ननाशो गणाधिपः ।<br>
धूम्रकेतुर्गणाध्यक्षो भालचंद्रो गजाननः ।'

ही बारा नावे सर्वत्र प्रसिद्ध आहेत.

सुमारे तीन हजार वर्षांपूर्वीपासून श्रीगणेश देवतेचा इतिहास उपलब्ध होतो. विशेषतः या थोर महाराष्ट्रातच या देवतेच्या अवतारकार्याचे अवशेष आपणांस सापडतात. अखिल भारतात या देवतेने आपले विघ्ननाशाचे कार्य करून अग्रपूजेचा मान मिळविला आहे. त्या सर्व कथांपैकी काही विशेष कथा आपणांस अवगत व्हाव्यात म्हणून संग्रहित करण्याचा प्रयत्न केला आहे.

पूर्वी ब्रह्मदेवाला एक जोराची जांभई आली आणि त्याच्या तोंडातून एक भयंकर राक्षस निघाला. काळ्या केसांचा आणि तांबड्या शेंदरी रंगाचा तो क्रूर पुरुष पाहून ब्रह्मदेवालाही नवल वाटले.

ब्रह्मदेवाने त्याचे नाव जृंभाज किंवा सिंदूर असे ठेवले आणि त्यास वर दिला, "तू त्रैलोक्यात विजयी होशील. तू ज्याला आलिंगन देशील, त्याचे भस्म होईल."

सिंदूर आनंदला आणि या वराचा खरेखोटेपणा पाहण्यास तो प्रथम ब्रह्मदेवालाच कवटाळू लागला. तेव्हा ब्रह्मदेव भिऊन पळाला आणि विष्णूकडे गेला. सिंदूर त्याच्या पाठीशीच होता. विष्णूने सिंदुराची समजूत घालून त्याला शंकराकडे पाठविले.

जृंभाज कैलासावर गेला. तेथे त्याला प्रथम सुंदर पार्वती दिसली. तिलाच तो कवटाळू लागला तेव्हा ती ओरडली. भगवान शंकर रागावले. त्रिशूळ घेऊन ते सिंदुरावर धावले. इतक्यात ब्राह्मणरूपी विनायकाने आपला परशू आडवा धरून शंकरास थांबविले.

"या क्रूर सिंदुराला मी पुढील जन्मी ठार करीन. तोवर तुम्ही शांत रहावे." असे सांगितले.

सिंदुरासुराला भिऊन पार्वती पर्यली काननात पळाली. शंकरालाही ते स्थान फारच आवडले. ती दोघे तेथे आनंदाने राहू लागली.

"तदैव भूतलं यातः सगणो गहनं वनम्
बभ्राम न ददर्शाहं यदा रम्यं तु काननम् ।
तदैव वीक्षितं स्कन्दं पर्यलीकाननं मया
अनेक वृक्षसंपन्नं शुकसारिकशोभितम् ॥

परळी येथे वैजनाथ महादेवाने वास्तव्य केले, तेथे पार्वतीच्या पोटी विनायकाने गर्भ धारण केला.

परळी वैजनाथ हे स्थान मराठवाड्यात बीड जिल्ह्यात आहे.

इकडे सिंदुरासुराने पृथ्वीवर हाहाकार मांडला. तेव्हा एकदा इंद्राने

आकाशवाणीने त्याला सांगितले, "मूर्खा, तुझा नाश करण्यास पार्वतीच्या पोटी गर्भ राहिला आहे"

सिंदूर पुन्हा कैलासाला गेला, पण तेथे त्याला पार्वती दिसली नाही. शोधता शोधता शेवटी त्याला पर्यली काननात ती सापडली. तेव्हा त्याने वायुरूप घेऊन तिच्या उदरात प्रवेश केला आणि आपल्या नखाने त्या गर्भाचे मस्तक छेदून विंध्याचलानजीक नर्मदेत टाकले. अद्यापही तेथील दगड गणेशरूप झालेले दिसतात.

पुढे पार्वती यथाकाल प्रसूत झाली. तिला मस्तक नसलेले बालक झाले. ती शोक करू लागली. सारे देव जमले. तेव्हा बालकाच्या कंठातून आवाज आला आणि त्याने ती सर्व हकीकत सांगितली.

जन्मसोहळ्यानिमित्त घातलेला मंडप गजासुर नावाच्या हत्तीने मोडला; ते पाहून श्रीशंकराने त्या गजाचे मस्तक छेदून तेच त्या जन्मलेल्या बालकास बसविले आणि त्याचे नाव गजानन असे ठेविले.

गजाननाचा जन्म भाद्रपद शुद्ध चतुर्थीला झाला. ज्या गजासुराचे मस्तक शंकराने छेदले, तो गज पूर्वजन्मी महेश नावाचा राजा होता.

महेशाकडे एकदा बृहस्पती आले होते तेव्हा त्यांच्या पूजेने प्रसन्न होऊन त्यांनी महेशास वर दिला होता, "पुढील जन्मी तू गजयोनीत जन्म घेशील आणि सर्व देवांतही तुला अग्रपूजेचा मान मिळेल."

त्याप्रमाणे या गजासुराचा उद्धार झाला. मरताना तो "ॐ नमः शिवाय" असे म्हणाला होता, म्हणून शंकर प्रसन्न झाले आणि ते त्या गजाचे चर्म पांघरू लागले.

गजाननाची आणखीही एक जन्मकथा आहे.

एकदा पार्वती स्नानास बसली असता, तिने आपल्या अंगाच्या मळीपासून एक पुतळा बनविला आणि तो द्वाररक्षक म्हणून ठेवला. आदिशक्तीच्या कृपेने तो पुतळा सजीव आणि अजिंक्य बनला होता.

ही गोष्ट नारदाने शंकराला सांगितली. तेव्हा रागाने श्रीशंकर तेथे आले. त्या पुतळ्याने त्यांना घरात जाण्यास मज्जाव केला. तेव्हा शंकराने त्याचे शिर उडविले. त्याच वेळी गजासुर नावाचा हत्तीने श्रीशंकराचे कमंडलू लाथाडले होते; पण या पुतळ्यानेच ते कमंडलू लाथाडले, असा समज शंकराने करून घेतला आणि पुतळ्याचे शिर उडविले.

पार्वती बाहेर आली. ती शोक करू लागली. शंकराला खरी हकीगत कळली आणि मग शंकराने त्या गजासुराचे मस्तक छेदून ते पुतळ्यास बसविले आणि

त्याचे नाव गजानन, असे ठेवून त्याला अग्रपूजेचा वर दिला.

पूर्वी प्राण्याचा मुखवटा घालून त्यास प्रतिष्ठा दिल्याची उदाहरणे पुराणांत पुष्कळ आढळतात. उदा.- १ तुंबरू - घोड्याचे मुख. २. दक्ष - अजमुख. ३. नरसिंह - सिंहमुख. ४. गणेश - गजमुख इत्यादी.

हत्ती हा सर्व प्राण्यांत बुद्धिमान गणला जातो. शंकर-पार्वती ज्या भागात राहत तेथे हत्तीचेही वास्तव्य होते. तेव्हा आपल्या पुत्रास त्यांनी हत्तीचे मुख देण्यात विशेष वैशिष्ट्य साधले होते.

परळी-माहात्म्यात पार्वतीपुत्र गजानन-गणेश आणि कश्यपपुत्र विनायक यांच्या कथा आहेत. हे अवतार परळीच्या परिसरात घडले. अद्यापही तेथे ती मंदिरे आहेत.

महिष्मती नगरचा राजा वरेण्य याची राणी पुष्पिका, हिला संतान नव्हते. म्हणून शंकराने आपल्या गजानन बालकास तिच्या जवळ नेऊन ठेवले; पण हे कुरूप बालक पाहताच राजधानीत खूपच गोंधळ उडाला. राजाने या दुश्चिन्हाला अरण्यात नेऊन ठेवले.

पराशर ऋषीने गजाननाचा सांभाळ केला. त्याला सर्वविद्यापारंगत केले व त्याचे नाव गुणेश असे ठेवले.

गुणेश आठ वर्षांचा होता तेव्हा त्याला एकदा वनात प्रचंड मोठे अंडे सापडले. ते त्याने फोडले तेव्हा त्यातून एक प्रचंड मोर बाहेर आला. गुणेश आणि मोर यांचे युद्ध झाले, पण तो मोर फार बलिष्ठ होता. मग गुणेश त्याला म्हणाला, "वर माग."

मोर म्हणाला, "तुझ्या नावापूर्वी माझे नाव येईल असे कर." तेव्हापासून गुणेशाला मयुरेश्वर नाव पडले.

मयूरेश्वराची दुसरीही एक कथा आहे, ती अशी :

पूर्वी कमलासुर नावाचा दैत्य फार माजला. त्याला मारण्यासाठी गर्गमुनींच्या सांगण्यावरून बल्लाळ नावाच्या महापुरुषाने एक मोठा यज्ञ केला. तेव्हा अग्निकुंडातून एक मोठा मोर बाहेर आला. त्या मोरावर बसून बल्लाळाने कमलासुराशी युद्ध केले आणि त्रिशूळाने त्या असुराचे तीन तुकडे करून तीन दिशांना फेकले. मस्तकाचा भाग जेथे पडला ते मोरगाव नावाचे क्षेत्र



मोरगावचा मयूरेश्वर

बनले. तेथे बल्लाळ जाऊन राहिला. पुढे त्यास मयूरेश्वर असे नाव पडले.


हे मोरगाव क्षेत्र पुणे जिल्ह्यात जेजुरीजवळ पाच कोसांवर कऱ्हा नदीच्या काठी आहे व तेथे मयूरेश्वर हे अष्टविनायकांपैकी एक दैवत अद्यापही आहे.

पराशर ऋषींच्या आश्रमात शिकत असतानाच गजानन-गुणेशाच्या पराक्रमाची कीर्ती सर्वत्र झाली. एकदा सर्व ऋषिमुनी गुणेशाकडे आले आणि त्यांनी विघ्नासुर नावाच्या दैत्याने मांडलेला कहर गुणेशाला सांगितला.

माळव्यातील हैमवतीच्या अभिनंदन राजाने इंद्रपदप्राप्तीसाठी खूप यज्ञ केले होते. तेव्हा त्याला इंद्रपद मिळू नये व त्याच्या यज्ञात विघ्न यावे म्हणून इंद्राने कालपुरुषाला विघ्नासुराच्या रूपाने पाठविले होते. याच विघ्नासुराने भारतात सर्वत्र उच्छाद मांडला होता.

भयभीत ऋषिमुनींना गुणेशाने निर्भयतेचे आश्वासन दिले आणि तो विघ्नासुराशी युद्ध करण्यास निघाला.

गुणेश आणि विघ्नासुराची जोराची लढाई झाली. विघ्नासुर गुणेशाला शरण आला. मग गुणेशाने त्याला परत इंद्राकडे पाठवून दिले.



ओझरचा विघ्नेश्वर

गुणेशाला तेव्हापासून विघ्नेश्वर हे नाव पडले आणि जेथे जेथे गणेश-गुणेशाचे भजन-पूजन चालते तेथून सर्व विघ्नें दूर पळतात.

अष्ट-विनायकांच्या स्थानांपैकी विघ्नेश्वराचे हे स्थान पुणे जिल्ह्यात जुन्नरपासून पाच कोसांवर ओझर येथे आहे व अद्यापही ते प्रसिद्ध आहे.

याच विघ्नासुराला गुणेशाने नंतर आपले वाहन बनविले. त्या कालपुरुषाला उंदराचे रूप त्याने दिले. काळ जसा हळूहळू सर्व वास्तुमात्राचा नाश करतो तसा उंदीरही कुरतडून कुरतडून सर्व वस्तूंचा नाश करतो. म्हणून त्या कालस्वरूप उंदरावर स्वार होऊन गणेशाने विजय मिळविला, असे रूपक आहे.

मूषक-वाहनाची खरी कथा अशी आहे :

एकदा इंद्रसभेत क्रौंच नावाच्या गंधर्वाचा पाय चुकून वामदेव ऋषीस लागला. तेव्हा वामदेवांनी क्रौंचास शाप दिला, "मूषक होऊन तू भूलोकी पडशील" त्याप्रमाणे तो गंधर्व मूषक होऊन पराशर ऋषींच्या आश्रमाजवळ पडला.

तेथे अनेक पदार्थ कुरतडून तो खाऊ लागला. त्यामुळे आश्रमात खूप त्रास होऊ लागला. एके दिवशी गजानन-गुणेशाने आपला पाश त्यावर टाकून तो उंदीर धरला.

उंदीर फारच विव्हळू लागला. पाशातून सुटण्याची तो धडपड करू लागला. गुणेशाला त्याची फार गंमत वाटली आणि तो त्यावर प्रसन्न होऊन म्हणाला, "वर माग."

उंदीर उद्धटपणे गुणेशाला म्हणाला, "अरे गजानना, तू रे मला काय देणार? मी 'काळ' आहे. तूच काय पाहिजे ते मला माग. मी देईन."

बुद्धिमान आणि चतुर गजाननाने त्याला मागितले की, "आजपासून तू माझे वाहन हो."

दिलेल्या शब्दामुळे त्या मूषकाला आता गजाननाच्या मागणीप्रमाणे कबूल व्हावेच लागले. गजानन त्यावर बसला. तेव्हा सर्वांना मजा वाटली. तेव्हापासून गजाननास "मूषकवाहन" हे नाव पडले.

अशा रीतीने पराशरांच्या आश्रमात शिकून तयार झाल्यावर गजाननाने वरेण्यराजाची भेट घेतली आणि त्याला गणेशगीता सांगून खूप ज्ञानप्रसार केला.

ज्या सिंदुरासुराला मारण्यास गजाननाचा हा अवतार झाला, त्या सिंदुरासुराला मोठेपणी या गुणेशाने युद्धात अंगाला अंग घासून ठार मारले. गुणेशाचे अंग त्यामुळे लाल झाले. तेव्हापासून त्याला सिंदुरवदन किंवा सिंदुरप्रिय हे नाव मिळाले. शंकर, पार्वती आणि ब्रह्मदेवांसही खूप आनंद झाला.

एकदा काय झाले! कैलासावर सर्व देव जमले. गजाननाच्या पराक्रमाबद्दल अभिनंदन करण्यास सर्वजण जमले होते.

उंदरावर बसून गजाननाची स्वारी येत होती. कैलासपर्वत चढता चढता घाईमुळे उंदराची उडी चुकली आणि गजाननाची स्वारी खाली पडली. ते पाहून वरून चंद्र हसला. गजाननाला चंद्राचा खूप राग आला. नंतर सभेत सर्वजण जमले; तेव्हा नारदाने एक छानदार फळ शंकरापुढे ठेवले. ते फळ बाळांना खाण्यास द्यावे म्हणून पार्वतीने कार्तिकेय व गजानन यांना पुढे बोलावले; पण फळ एक आणि मुले दोन. तेव्हा ते फळ कोणास द्यावे, हा प्रश्न पडला.

ब्रह्मदेव म्हणाले, "ते फळ कार्तिकेयास द्या; कारण तो फार हट्टी आहे. उगीच गोंधळ नको." पार्वतीने ते फळ कार्तिकेयास दिले.

तेव्हा शहाणा बाळ गजाननही खूप रागावला. त्याने उग्र स्वरूप धारण केले. ब्रह्मदेवही घाबरले. ते पाहून चंद्र पुन्हा हसला आणि गणपतीची त्याने थट्टा केली; पण ..........

गजानन चंद्रावर खूप रागावला. त्याने चंद्राला शाप दिला, "तुझे रूप पालटेल आणि कोणीही तुझे दर्शन घेणार नाही." लगेच चंद्र कुरूप झाला. चंद्र त्यामुळे लाजला आणि लपला.

चंद्रदर्शनाला पारखे झाल्यामुळे सर्व देव अस्वस्थ झाले. त्यांनी गजाननाची प्रार्थना केली. तेव्हा गजानन प्रसन्न झाले आणि त्यांनी चंद्राचा तो शाप कमी केला.

चंद्र पुन्हा सुंदर झाला, पण गणेशचतुर्थीच्या दिवशी म्हणजे भाद्रपद शुद्ध चतुर्थीला मात्र चंद्राचे दर्शन सर्वांना वर्ज्य केले. त्या दिवशी जो कोणी चंद्र पाहील, त्यावर संकटे येतील," असे गजानन म्हणाला.

नंतर इंद्राने चंद्राला गजाननाचा एकाक्षरी मंत्र दिला. तो त्याने बारा वर्षे जपला, त्यामुळे गजानन प्रसन्न झाले आणि त्यांनी चंद्राला वर दिला,-

दरमहा वद्य चतुर्थीस लोक तुझे दर्शन घेतल्याशिवाय अन्न घेणार नाहीत. असे जे लोक करतील त्यांची सर्व संकटे दूर होतील.

तेव्हापासून काही लोक दरमहा संकष्टी चतुर्थी हे व्रत करू लागले आणि गणेशकृपेने त्यांची संकटेही दूर होतात, असा त्यांचा विश्वास आहे

एकदा लंकेचा राजा रावण याने खडतर तपश्चर्या केली. श्रीशंकर त्याला प्रसन्न झाले आणि त्यांनी रावणाला आत्मलिंग देऊन टाकले.

भोळ्या शंकराच्या या कृतीमुळे सर्व देवांना काळजी वाटू लागली. त्यांनी गजाननाची प्रार्थना केली, तेव्हा गजानन प्रसन्न झाले आणि त्यांनी रावणाला विघ्न आणून शंकराचे आत्मलिंग त्यापासून सोडविले.

रावण लिंग घेऊन चालला होता. वाटेतच सायंकाळ झाली. रावणाची ती संध्येची वेळ होती. कोणाजवळ तरी हे लिंग द्यावे आणि संध्या आटोपावी, या विचारात तो होता. इतक्यात -

गजाननाने एका गुराखी मुलाचे रूप घेतले. त्याच्याजवळ रावणाने ते लिंग दिले व तो संध्येस बसला; पण त्या मुलाने रावणास हाका मारण्याचा सपाटा सुरू केला आणि "जड झाले रे, झेपेना हे," असे म्हणून तीन आरोळ्या ठोकून शेवटी त्याने ते लिंग खाली ठेवले.

रावण खूपच रागावला. संध्या आटोपून तो आला. भूमीवरील लिंग वीस हातांनी तो उचलू लागला. पण शेवटी त्याच्या हातात गाईचा कानच आला ते स्थान म्हणजे हल्लीचे गोकर्ण महाबळेश्वर होय.

पूर्वी गंडकी नावाच्या नदीत सिंधू नावाचा एक भयंकर राक्षस निर्माण झाला होता. त्याने तपश्चर्या करून सूर्याला प्रसन्न करून घेतले. सूर्याने त्याला नाभीत

अमृत देऊन अमर केले.

पुढे या सिंधू दैत्याने सर्व देवांना कैद केले. प्रत्यक्ष विष्णूसही गंडकीत कोंडून ठवेले आणि सर्वत्र धुमाकूळ माजवला.

या सिंधू दैत्याचा नाश करण्याकरिता पार्वतीने इंद्राच्या विनंतीवरून सह्यगिरीच्या (पुणे जिल्हा, जुन्नरनजीक लेण्याद्रीमध्ये) एका गुहेत लपून गजाननाची एक मूर्ती स्थापली आणि त्या मृत्तिकामूर्तीच्या आराधनेकरिता बारा वर्षे तपश्चर्या केली.

शेवटी गजानन प्रसन्न झाले. तीच मृत्तिकामूर्ती भाद्रपद शुद्ध चतुर्थीला सचेतन झाली आणि त्या गिरिजात्मजाने नंतर त्या दुष्ट सिंधू दैत्याला ठार केले. त्याची नाभीच छेदली!

गंडकीतून विष्णूसह सर्व देवांची सुटका केली आणि पृथ्वीवरील सर्व त्रास नाहीसा केला.

अद्यापीही अष्टविनायकांपैकी गिरिजात्मजाचे स्थान जुन्नरजवळ लेण्याद्रीमध्ये आहे. तेथे पार्वतीच्या गुहेमागेच गणेशाची मूर्ती कोरलेली आहे. त्या ठिकाणी बौद्धलेणीही आहेत.



लेण्याद्रीमधील गिरिजात्मक

गणेशपुराणात या स्थानास जीर्णापूर व लेखनपर्वत हे नाव आहे.

मुद्गलपुराणात गणेशाने काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या सहा असुरांचा नाश केल्याची वर्णने आहेत.

अनलासुर मारल्यामुळे गणेशाच्या सर्वांगाचा दाह झाला. तेव्हा त्याने डोक्यावर चंद्र धारण करून तो भालचंद्र बनला. शंकराचा नाग त्याने धारण केला व दूर्वारसही घेतला, तेव्हा त्याचा दाह शांत झाला, अशीही एक कथा प्रसिद्ध आहे.

पूर्वी मुकुंदा नावाची एक ऋषिपत्नी होती. तिचे प्रेम रुक्मांगद नावाच्या राजावर होते; पण एकदा इंद्रच रुक्मांगदाच्या रूपाने तिला भेटला.

मुकुंदेला इंद्रापासून एक पुत्र झाला; त्याचे नाव गृत्समद.

गृत्समद मोठेपणी फार विद्वान झाला. पण त्या वेळचे याज्ञिक लोक त्याला मान देईनात. तेव्हा त्याला फार वाईट वाटले.

गृत्समदाने पुष्पक किंवा भद्रक (महढ) नावाच्या वनात घोर तपश्चर्या केली. "गणनां त्वा गणपतिं" या मंत्रजपामुळे गजानन त्याला प्रसन्न झाला आणि



महढ येथील श्रीवरदविनायक

त्याने गृत्समदाला विद्वान् म्हणून जगात मान प्राप्त करून दिला. तेव्हा गृत्समदाने त्या तपोवनात श्रीवरद विनायकाची स्थापना केली.

अद्यापीही ते स्थान अष्ट विनायकांपैकी एक म्हणून पुणे-मुंबई रस्त्यावर मढ (महढ) कर्जत-खोपोलीनजीक प्रसिद्ध आहे.


याच गृत्समद मुनीला एकदा एक मोठी शिंक आली व त्यातून एक अवाढव्य पुरुष निर्माण झाला. त्याने अंतराळात सोने, रुपे व लोखंड यांची तीन पुरे वसविली आणि सर्व देवदानवांना जर्जर करून सोडले.

या त्रिपुरासुराला मारण्यास शंकराने विनायकाची आराधना केली; तेव्हा सत्त्व-रज-तमात्मक गुणेश प्रकटला व त्याने आद्यबीज मंत्राने शंकराचा त्रिशूळ भारून दिला.

त्या त्रिशूळाने शंकराने त्रिपुरासुराचा वध केला आणि गुणेशाला देवाधिदेव मानून त्याची स्थापना केली. ते स्थान म्हणजे हल्लीचे पुणे जिल्ह्यातील घोडनदी रस्त्यावर उरुळी स्टेशनपासून पाच कोसांवर असलेले रांजणगाव हे होय. याच रांजणगावाची आणखीही एक कथा आहे ती अशी -

एकदा रती आणि मदन यांच्यावर शंकर रागावले आणि त्यामुळे रती व मदन भिऊन वनात पळून गेले. त्यांनी श्रीगजाननाच्या षडाक्षरी मंत्राचे अनुष्ठान याच रांजणगावाजवळ तपोवनात केले. तेव्हा त्यांना दशमुखात्मक गणपतीचे दर्शन झाले. त्याच्या कृपेने रतिमदनावरील शंकराचा राग मावळला.

तेव्हा रतिमदनाने या गजाननास महोत्कट हे नाव दिले व तेथे त्याची स्थापना केली.



रांजणगाव येथील श्रीगणपती

पुढे मदनाने प्रद्युम्नरूपाने याच ठिकाणी अवतरून पुन्हा अनुष्ठान केले, अशी कथा आहे.

गणेश पुराणात या स्थानास मणिपूर हे नाव आहे. अद्यापीही रांजणगाव-गणपती येथे दृश्यमूर्तीच्या खाली तळघरात दहा सोंडांचा गणपती पाहण्यास मिळतो.

गणेशपुराणात अशी एक कथा आहे की, पाली (जिल्हा कुलाबा,

नागोठण्याजवळ सात मैलांवर) येथे पूर्वी कल्याणशेटी नावाचा श्रीमंत वैश्य राहात होता. त्याने द्वारकेहून आदिनारायणाची मूर्ती वालवल या गावी आणली होती. त्याला बल्लाळ नावाचा एक मुलगा होता.

बल्लाळाने गावाजवळ एका शमी वृक्षाखाली आपल्या सवंगड्यांच्या साहाय्याने एक गणेशमंदिर बांधले. सर्व मुले तेथे रात्रंदिवस गणेशाची आराधना करीत.

ती गोष्ट त्याच्या कृष्णभक्त पालकांना आवडेना. मुलांना या गणेशभक्तीच्या फंदापासून परावृत्त करण्याचा त्यांनी पराकाष्ठेचा प्रयत्न केला व त्यांना बेदम चोपही दिला, पण बल्लाळ गणेशध्यानापासून ढळला नाही. शेवटी बल्लाळाला गणेश प्रसन्न झाले आणि त्यांनी तेथेच वास्तव्य केले. पालकांनाही आश्चर्य वाटले व तेव्हापासून त्या गणेशमूर्तीला सर्वांनी आदराने बल्लाळेश्वर हे नाव दिले आहे. अद्यापही ते स्थान अष्टविनायकांपैकी एक म्हणून प्रसिद्ध आहे.


पाली येथील बल्लाळेश्वर

एकदा विष्णूच्या कानातील मळापासून मधु-कैटभ नावाचे दैत्य निर्माण झाले आणि विष्णूशीच लढू लागले. तेव्हा विष्णू पळून शंकराकडे गेला. शंकराने विष्णूला विनायकाचा षडाक्षरी मंत्र सांगितला. विष्णूने त्या मंत्राचा जप तपोवनात केला.

विष्णूला या ठिकाणी गणपती प्रसन्न झाला आणि त्याने मधु-कैटभांना मारण्याची युक्ती सांगितली.


विष्णू आणि मधु-कैटभ दैत्यांची लढाई झाली; तेव्हा विष्णू त्या दैत्यांना मुद्दाम म्हणाला, "तुमच्या पराक्रमावर मी खूष झालो आहे. तुम्हांला काय पाहिजे ते मागा."

यावर ते दुष्ट राक्षस गर्वाने म्हणाले, "अरे, तूच माग आमच्याकडे ! मागशील ते देण्यास आम्ही समर्थ आहोत."

मग विष्णूने त्यांना शब्दांत पकडले आणि एकच मागितले, "मला तुमचे प्राण द्या."

ते राक्षस वचनामुळे बांधले गेले आणि तयार झाले. विष्णूने त्यांना मांडीवर घेऊन ठार मारले.

श्रीगणेशाच्या कृपेने विष्णूला ही युक्ती मिळाली व त्या दुष्टांना मारण्याकरिता सिद्धी प्राप्त झाली म्हणून विष्णूने त्या तपस्थळी श्रीसिद्धिविनायकाची स्थापना केली.


सिद्धटेक येथील सिद्धिविनायक

ते स्थान म्हणजे हल्लीचे नगर जिल्ह्यातील भीमा नदीच्या काठी सिद्धटेक म्हणून प्रसिद्ध आहे. अष्टविनायकांपैकी एक अशा या स्थानी अहिल्याबाई होळकर यांनी हल्लीचे देऊळ बांधले आहे. तेथील घाट हरिपंत फडक्यांनी बांधलेला आहे. मोहिमेवर निघताना पुण्याचे पेशवे प्रथम येथूनच निघत आणि त्यांना सिद्धी प्राप्त होत असे, असे म्हणतात.

पूर्वी द्रविड देशात अभिजित नावाचा पराक्रमी राजा होता. वैशंपायन ऋषींच्या आज्ञेप्रमाणे राजाने तपश्चर्या केली तेव्हा राणी गुणवतीला 'गण' नावाचा पुत्र प्राप्त झाला.

गण हा फार पराक्रमी, पण तामसी निघाला. एकदा कपिलमहामुनींच्या आश्रमात हा गण दैत्य आपल्या भारी सेनेसह थांबला होता. कपिलांनी त्याचे स्वागत केले. कपिलमुनींना इंद्राने चिंतामणी नावाचे रत्न दिले होते. त्या मण्याच्या साह्याने कपिल ऋषींनी गण दैत्याच्या त्या थोर सैन्याला तावडतोब इच्छाभोजन दिले.

चिंतामणीचा हा प्रभाव पाहून गणदैत्याने कपिलांजवळ त्या मण्याची मागणी केली; पण कपिल तो मणी त्यास देईनात; तेव्हा गणदैत्याने तो मणी कपिलांपासून बळजबरीने हिसकावून नेला.

मग कपिलमुनींनी श्रीविनायकाची आराधना केली. विनायक प्रसन्न झाला व त्याने गणदैत्याला आपल्या परशूने ठार मारले.

अभिजित राजाने तो मणी विनायकास अर्पण केला. विनायकाने तो कपिलास दिला पण कपिलांनी परत तो विनायकास अर्पण करून कृतज्ञता व्यक्त केली आणि विनायकाचे नाव 'चिंतामणी' असे ठेवून त्या स्थळी अष्टविनायकांपैकी एक तीर्थ म्हणून मूर्ती स्थापली.

याच ठिकाणी-कदंब तीर्थाजवळ रुक्मांगद राजा सपरिवार स्वर्गास गेला, अशीही कथा आहे.

गौतमऋषींच्या शापाचे पाप नाहीसे होण्यासाठी इंद्राने याच श्रीचिंतामणी विनायकाची आराधना केली आणि त्याच्या तपामुळे चिंतामणी प्रसन्न होऊन


थोरले माधवराव पेशवे


त्याने इंद्राला पुन्हा आरोग्य व इंद्रपद प्राप्त करून दिले.

हे स्थान म्हणजे पुणे जिल्ह्यात लोणी स्टेशनजवळ तीन मैलांवर मुळामुठेच्या काठी थेऊर नावाने प्रसिद्ध आहे. पुण्याच्या पेशव्यांचे हेच आराध्य दैवत होते. याच ठिकाणी श्रीमंत माधवरावांची समाधी व सती रमाबाईचे वृंदावन आहे.

पूर्वी विंध्य देशात पार्वती नावाची नगरी होती. तेथे धूम या नावाचा राजा राज्य करीत होता. ते राज्य वैभवसंपन्न होते.

एकदा भृगुऋषी फिरत फिरत धूमाकडे आले. धूमाने त्यांचे स्वागत केले आणि आपले वैभव त्यांना दाखविले. राजा म्हणाला, "मुनिमहाराज, मला एवढे वैभव कशामुळे प्राप्त झाले बरे?"

तेव्हा भृगुऋषी म्हणाले, "राजा, पूर्वपुण्याईमुळेच तुला वैभव मिळाले. पूर्वजन्मी तू निवृत्ती नावाचा राजा होतास. इंद्रपदप्राप्तीसाठी तू शंभर यज्ञ केलेस, पण शेवटचा यज्ञ पार पडला नाही. म्हणून तू इंद्र झाला नाहीस. त्या वेळी स्वतः इंद्राने शिवशर्मा नावाच्या ब्राह्मणाच्या रूपाने येऊन तो तुझा शेवटचा यज्ञ मोडला होता.


थेऊर येथील श्रीचिंतामणी

"या जन्मी मात्र तू आपल्या वैभवाचा गर्व करतो आहेस आणि त्यामुळेच तुझा नाश होणार आहे. अरे, प्रत्यक्ष तुझ्याच राजधानीतील कोणी सुमदा नांवाची पतिव्रता स्त्री आहे; तिच्या पुत्राकडून तुझा नाश होईल."

एवढे सांगून भृगऋषी निघून गेले. धूमराजा बेचैन झाला. त्याने सुमदेचा शोध केला. तेव्हा माधव नावाच्या एका क्षत्रियाची पत्नी सुमदा ही फार विष्णुभक्त पतिव्रता आहे, हे त्यास आढळले. ती त्या वेळी गरोदरही होती.

धूमाने आपला सेनापती विद्रुम यास सुमदेला ठार मारण्याची कामगिरी दिली. विद्रुमाने सुमदेला अरण्यात नेले आणि तो तिला ठार मारणार इतक्यात अचानक विष्णुकृपेने सैन्य निर्माण झाले व विद्रुम पळत धूमाकडे परत आला. धूमाने त्याचा शिरच्छेद केला, मग धूमाने सुमदेवर कडक पहारा ठेवला. ती

जेव्हा प्रसूत होईल तेव्हा बाळासच ठार करण्याचे त्याने ठरविले; पण काय आश्चर्य ! सुमदेच्या पोटी प्रत्यक्ष विष्णूनेच विनायकाच्या रूपाने जन्म घेतला आणि तत्काळ भयंकर गगनभेदी रूप धारण करून धूमकेतूला तोंडात टाकून गिळले. तेव्हापासून विनायकाला धूम्रकेतू (धूम्रवर्ण) हे नाव पडले.

रत्नागिरीच्या उत्तरेस सहा कोसांवर समुद्रकाठी डोंगराच्या पायथ्याशी एक अत्यंत रमणीय स्थान आहे. तेथे केतकीबनात श्रीगणपतीचे एक स्वयंभू स्थान आहे.

देवळामागे जो गोल डोंगर आहे, तोही गणपती मानून लोक त्याला प्रदक्षिणा घालतात.

ते देवस्थान अद्यापही जागृत आहे. दक्षिण महाराष्ट्रातील पटवर्धनांचे ते आराध्य दैवत आहे. श्रीशिवाजीमहाराजांनी या श्रेष्ठ देवस्थानास वर्षासन करून दिले होते आणि श्रीमंत माधवराव पेशवे यांची पत्नी सती रमाबाई यांनी तेथे एक भव्य धर्मशाळा बांधलेली आहे.

महादेवपार्वतीला दोन मुले होती. कार्तिकेय आणि गजानन. या दोघांपेकी श्रेष्ठ कोण म्हणून सर्व देवांनी त्यांची परीक्षा पाहण्याचे ठरविले

नारदाने प्रश्न केला, "पृथ्वीप्रदक्षिणा कोण लवकर करतो ते पाहू, आणि जो लवकर करील तोच श्रेष्ठ!"

कार्तिकेय भराभर पळू लागला. पृथ्वीला फेरा घालण्यास त्याला कितीतरी समय लागला व कष्ट पडले; पण गजानन बुद्धिवान व चतुर होता. त्याने झटकन आपल्या मातापित्यासच एक प्रदक्षिणा घातली.

अर्थात् सर्वांनी गजाननालाच श्रेष्ठ ठरविले.

गणपतीला वक्रतुंड म्हणतात. याचा अर्थ असा आहे की, वाकड्यास तोडणारा म्हणजे दुष्टांचा संहार करणारा. गणपतीला आवडणाऱ्या वनस्पती फारच श्रेष्ठ आहेत.

१. दूर्वा - यामुळे सर्व तऱ्हेचा दाह शांत होतो.

२. शमी - सर्व तऱ्हेच्या त्वचारोगांवर ही फार उपयुक्त आहे.

३. रुई - ही अनेक रोग नाहीसे करते.

फार फार वर्षांपूर्वी सिंदूरपूर येथे जुंभा नावाच्या राक्षसीचा मुलगा नरांतक हा राक्षस राजा होतो. त्याने भरतखंडातील सर्व आर्य गणराज्यांवर हल्ले करून आर्यांना त्रासून सोडले. सारे आर्य भयभीत झाले व या दुष्ट नरांतकाचा नाश करण्यासाठी देवाने अवतार घ्यावा म्हणून सर्वजण देवाची प्रार्थना करू लागले.

हिमालयात कश्यप नावाचे ऋषी राहात होते. त्यांची पत्नी अदिती ही

सूर्याची कडक उपासना करीत होती. तिच्या पोटी भाद्रपद शुक्ल चतुर्थीला श्रीविनायकाने जन्म घेतला.

हा बाळ जन्मतःच फार कुरूप होता. तरी त्याचे तेज सूर्याप्रमाणे होते. पराशर ऋषींनी या बाळाचे भविष्य पाहिले. तेव्हा ते म्हणाले, "हा बाळ गुणांचा ईश्वर आहे. हा मंगलमूर्ती आहे. हा गणनायक होईल. याला सर्व देवांत अग्रपूजेचा मान मिळेल आणि हाच दुष्टांचा संहार करील. हा सुखकर्ता आणि दुःखहर्ता होईल."

विनायक पाच वर्षांचा झाला तेव्हा त्याची मौंज झाली. त्या वेळी सर्व देवांनी त्याला आशीर्वाद दिले. मुनींनी त्याला उपदेश केला. शंकर, इंद्र, व्यास, अश्विनीकुमार, काशीराजा, रेणुका, महेश्वरी, अरुंधती वगैरे सर्व आले होते.

ब्रह्मदेवाने त्याला सर्वकाळ फुललेले कमळ दिले व त्याचे नाव 'ब्रह्मणस्पती' असे ठेवले. कुबेराने त्याला आपल्या गळ्यातील माळ देऊन 'सर्वप्रिय' हे नाव दिले. शंकराने त्रिशूळ व डमरू देऊन 'भालचंद्र' हे नाव दिले. याप्रमाणे शेष, वायू, समुद्र इत्यादी सर्वांनी देणग्या देऊन त्याला निरनिराळी नावे दिली; पण इंद्र मात्र तटस्थ राहिला.

तेव्हा कश्यप रागाने म्हणाले, "प्रत्यक्ष परमात्मा सगुणरूपाने अवतरला आहे. याच्या विरोधकांचा नाश होईल." इंद्राला त्यामुळे फार राग आला आणि त्यांने गर्वाने या बाळ महोत्कटाशी युद्ध केले; पण शेवटी विनायकाने विराटरूप धारण करून इंद्राचे गर्वहरण केले. मग इंद्राने प्रसन्न होऊन महोत्कटास अंकुश व कल्पवृक्ष देऊन श्रीमहाविनायक हे नाव दिले. बाळ महोत्कटाने मग बालपणीच पुष्कळशा दुष्ट राक्षसांचा वध केला.

मौंजीनंतर विनायकाचे शिक्षण सुरू झाले. त्या वेळी तो रोज पहाटेस उठे. मातापित्यांना वंदन करी. जान्हवी नदीत स्नान करी. सूर्याला अर्घ्य देई. गायत्री मंत्राचा जप करी, कपडे धुऊन आश्रमांत परत येई. वेदांची संथा घेऊन चांगले पठण करी. आश्रमातल्या पशुपक्ष्यांची सेवा करी. झाडांची निगा राखी. गाईचे दूध पिऊन रानात जाई. यज्ञासाठी समिधा व जळणास लाकडे आणी. फावल्या वेळात सूत काती आणि वस्त्रेही विणी. स्वावलंबन आणि सतत परिश्रमांनी तो निष्ठेने जीवनशिक्षण घेई. लवकरच त्याचे आरोग्य, शील व बुद्धी यांचा चांगला विकास झाला.

विनायकाची आदर्श वागणूक सर्वांना फार आवडे. सर्व विद्यार्थी त्याला आपला नायक मानीत. मान देत. लवकरच विनायकाने सर्व विद्यार्थ्यांचे एकत्र गट बनविले आणि तो त्या सर्व गणांचा नायक बनला. या गणपतीने आपल्या

सर्व गणांना शिस्त शिकवून सेवाधर्माचे धडे दिले.

आश्रमात वेदाभ्यास व युद्धकला आणि जीवनाचे शिक्षण आटोपून गणपती अमरावतीच्या अश्विनीकुमार यांच्या आयुर्वेद विद्यालयात गेला. तेथे त्याने सहा वर्षे अभ्यास करून दूर्वा, शमी, रुई, आघाडा, मंदार, तुळस, बेल इत्यादी वनस्पतींच्या उपयोगाचे रहस्य समजून घेतले. रोज एकवीस दूर्वांचा रस घेऊन तो तेथे सुदृढ झाला.

नंतर त्याने भूतानच्या पशुपति-विद्यालयांत अस्त्रविद्या, धनुर्विद्या, हटयोग इत्यादींचे शिक्षण घेतले. तेथील संचालक भगवान शंकर यांना या गणपतीबद्दल फारच आदर वाटे.

पर्वतीमातेने तर या गणपतीला आपला पुत्रच मानले. शिक्षण पूर्ण झाल्यावर गणपतीने जेव्हा पार्वतीमातेचा निरोप घेतला, तेव्हा सर्वांचेच अंतःकरण भरून आले होते.

महोत्कटाला - आपल्या विनायकाला - विद्येचे विलक्षण तेज आलेले पाहून कश्यप-अदिती यांना अत्यंत धन्य वाटले आणि दुष्ट नरांतकाचा नाश याच्याच हातून होईल, ही खात्री वाटली.

विनायकाने एकदा 'ऐरावत' नावाचे नाटक लिहिले होते. त्याचे कथानक अत्यंत श्रेष्ठ व उद्‌बोधक होते.

"जंगलात अक्राळविक्राळ वणवा पेटला आहे. मोठमोठी झाडे जळत आहेत. पशुपक्षी भीतीने पाहात आहेत. सर्वत्र हाहाकार माजला आहे. अशा भयंकर स्थितीत एक मोठा हत्ती आपल्या सोंडेने त्या वणव्यावर पाणी फेकीत आहे.

"वणवा विझत आहे. पेटलेले रान शांत होत आहे. पशुपक्षी पुन्हा आनंदाने विहार करीत आहेत. भाजलेल्या जमिनीवर सर्वत्र पाणीच पाणी झाले आहे आणि मग जमिनीतून पवित्र दूर्वांकुर बाहेर येत आहेत. लवकरच सर्व भूमी सुजलाम् सुफलाम् झाली आहे."

हे नाटक सर्व विद्यार्थिगणांनी करून दाखविले. पशुपक्षी, झाडे वगैरे सोंगे इतर विद्यार्थिगणांनी घेतली आणि गजराजाची भूमिका विनायकाने घेतली होती.

हत्तीचा मुखवटा घेतलेला तो गजानन-विनायक सर्वांनाच फार आवडला. त्याचे ते रूप आणि कार्य पाहून सर्वांनी त्याचे कौतुक केले आणि तेव्हापासून गणपति-विनायकाला गजानन हे नाव मिळाले.

नाटकाच्या निमित्ताने गणांत घडलेले सहकार्य व संस्कृति-संवर्धनाची मिळालेली स्फूर्ती फारच उपयुक्त ठरली. लवकरच एकवीसशे गणांनी एकत्र येऊन दुष्ट नरान्तक राक्षसाला ठार मारण्याचा संकल्प केला आणि त्यासाठी

त्रिशूळधारी सूर्योपासक गणसैन्याचे अत्यंत शिस्तबद्ध संचलन या महागणपतीच्या मार्गदर्शनाने सर्व भरतखंडभर सुरू झाले.

याच विनायकाने वेळोवेळी सात अवतार घेऊन भरतखंडातील इतर सर्व दुष्ट राक्षसांचे वध केले. त्या सर्व कथा विनायक-माहात्म्यात सुरस वर्णिल्या आहेत.

सिंदूरपूरच्या नरान्तकाच्या नाशासाठी मात्र या गणपतीने भारतभर प्रवास करून ठिकठिकाणी आर्यगणांची अत्यंत प्रभावी व प्रबळ संघटना केली. त्या वार्ता ऐकून नरान्तकाला धडकीच भरली.

नरान्तकाचा सेनापती धूम्राक्ष याने एके दिवशी एक भयंकर बातमी नरान्तकास सांगितली. तो म्हणाला, "महाराज, आपण आर्यावर्तात जो धुमाकूळ माजविला आहे, त्याचा राग येऊन कश्यपपुत्र विनायकाने भारी गणसैन्य तयार केले आहे व रत्नपुरीचा काशीराजा त्यास साह्य करीत आहे; पण......

आपण कारागृहात कोंडलेल्या एकवीस हजार कुमारिकांची सुटका करविण्यासाठी प्रत्यक्ष आपल्या सिंदूरपूर राजधानीतील दोन कुमारिका ऋद्धी आणि सिद्धी यांनीही जोराचे गुप्त प्रयत्न चालविले आहेत.

या ऋद्धिसिद्धींनी आपल्या आठ मैत्रिणींच्या मदतीने व गणपतीच्या मार्गदर्शनाने स्त्रियांची एक मोठी सेनाच उभारली आहे. त्या अंकुशधारी सूर्योपासक स्त्रीसेनेच्या व्यवस्थेचा हा पाहा आराखडा -

(१) पृथिमा - शहरव्यवस्था
(२) प्रकाम्या - हेरखाते.
(३) वशिता - रुग्णशुश्रूषा
(४) महिमा - नौकानयन
(५) ईशिता - न्यायखाते
(६) गरिमा - आश्रमव्यवस्था
(७) लघिमा - कृषिसंवर्धन
(८) प्राप्ती - बालरक्षण
(९) ऋद्धी - स्त्रीसैन्यसंचलन
(१०) सिद्धी - सर्व देखरेख.

"महाराज, पाहिलीत ही व्यवस्था आणि कारवाई ! कामाची कशी वाटणी व्यवस्थित करून या स्त्रिया आपणांविरुद्ध कार्य करीत आहेत! हा धोका भयंकर आहे."

धूम्राक्षाने सप्रमाण दिलेली ही माहिती ऐकून नरान्तक फारच क्रुद्ध झाला. त्याने संतापाने जोराचे हुकूम सोडले आणि आर्य भारतात भयंकरच उच्छाद मांडला. सर्वत्र विनाशाचा कहर सुरू झाला.

विनायक-महागणपतीला ही गोष्ट कळाली तेव्हा त्याला आनंदच झाला. तो म्हणाला, "ठीकच झाले. नरान्तकाचा नाश जवळ आला आहे. विनाशकाले विपरीत बुद्धी!" मग सारे गणसैन्य जोराने कामाला लागले. सर्वत्र युद्धाची

जय्यत तयारी झाली.

कश्यपांच्या आश्रमात एके दिवशी काही ऋषिकुमार आले. त्यांनी श्रीव्यासांचा निरोप सांगितला की -

"महामुनि व्यासांनी, श्रीमहागणपतीला ताबडतोब थेट बद्रिकाश्रमी भेटीसाठी बोलावले आहे."

विनायक बद्रिकाश्रमास गेला तेव्हा रस्त्यातील घनदाट अरण्यात दुष्ट नरान्तकाचे सैन्य लपले होते. सेनापती धूम्राक्षाने एक मत्त हत्ती विनायकावर सोडला, पण त्याला विनायकाने तत्काळ ठार केले; तेव्हा नारदांनी गणपतीवर फुलांचा पाऊस पाडला.

श्रीगणपती व्यासांना भेटला तेव्हा व्यास म्हणाले, "गणेशा, तुझी बुद्धिमत्ता व चातुर्य अलौकिक आहे. मी महाभारत नावाचे महाकाव्य लिहीत आहे. त्याचे पहिले पर्व मी तुला तुझ्या मौंजीच्या वेळीच अर्पण केले आहे. आता हा ग्रंथ तुझ्याच साह्याने पूर्ण होईल. तरी तू मला लेखनासाठी मदत कर."

गणपती व्यासांचा लेखक झाला. त्याने तो ग्रंथ पूर्ण लिहिला. गणपतीच्या या लेखनकलेवर आणि बुद्धिसामर्थ्यावर प्रत्यक्ष ब्रह्मकुमारी सरस्वती फारच खूष झाली व गणेशावर लुब्ध होऊन त्याची दासी बनली.

हे कार्य पूर्ण झाल्यावर व्यासांचा निरोप घेऊन आणि महाभारताच्या एकवीसशे प्रती घेऊन गणेश निघाला. त्याने त्या पोथ्या भारतभर वाटून दिल्या.

घरोघर महाभारताचे वाचन, मनन, पठण सुरू झाले आणि श्रेष्ठ भारतीय संस्कृतीचा प्रभाव पुन्हा उज्ज्वल झाला.

'ॐ श्रीगणेशायनमः' हा मंत्र कोणत्याही शुभकार्याच्या आरंभी प्रत्येक भारतीय आदराने म्हणू लागला आणि भारतात सर्वत्र श्रीगणेशाचे पूजन सुरू झाले.

महाभारताच्या प्रसाराचे कार्य पूर्ण झाल्यावर विनायक रत्नपुराच्या काशीराजाकडे निघाला. राजपुत्राच्या विवाहाचे पौरोहित्य गणपतीकडे होते; पण रस्त्यातच पुन्हा नरान्तकाच्या भारी सैन्याची गाठ पडली. त्या सैन्याचा विनायकाने तर फडशाच पाडला आणि तो रत्नपुरास गेला.

ही बातमी नरान्तकास कळली तेव्हा तो स्वतः प्रचंड सैन्य घेऊन रत्नपुरावर चाल करून आला. गणपतीचेही सर्व सैन्य विवाहानिमित्त येथे होतेच. ऋद्धिसिद्धि आणि अष्टनायिकाही तेथे आपल्या स्त्रीसैन्यासह आल्या.

तुमुल युद्ध झाले आणि शेवटी त्या दुष्ट नरान्तकाला गणपतीने ठार मारले. तेव्हा स्वर्गात दुंदुभी वाजल्या. देवांनी विमानातून पुष्पवर्षाव केला. विनायकाच्या

जयजयकाराने अंतराळ तर दुमदुमून गेले.

अखंड भारतात पुन्हा गणराज्याची स्थापना झाली. काशीराजाचा सन्मान करण्यात आला. बंदीतील सर्व देवगंधर्व, ऋषिमुनी आणि कुमारिका यांची सुटका झाली. सर्व विघ्नांचा नाश झाला.

भारतीय गणराजाचे पहिले अध्यक्ष म्हणून काशीराजाची निवड करण्यात आली. त्यांनी त्या श्रेष्ठ महागणपतीला भारताचे पहिले सेनापतिपद स्वीकारण्याची विनंती केली; पण गणपतीने ती विनंती अत्यंत विनयाने नाकारली.

श्रीमहागणपती विनायकाचा थोर सत्कार करण्यात आला. त्या वेळी शुक्ल नावाच्या ऋषीने गूळखोबरे घालून एकवीस मोदक गजाननास दिले. ते मोदक त्यास फारच आवडले.

भाद्रपद चतुर्थीच्या दिवशी गणपती रत्नपुरीहून उत्तरेकडे स्वाश्रमाकडे निघाला आणि त्याने दुष्टांचे अत्याचार थांबवून सुजनांचे रक्षण केले.

ठिकठिकाणी सत्कार घेत विनायक सिद्धपुरात आला. बंधमुक्त कुमारिकांनी नयनांच्या नीरांजनांनी त्याला आदराने ओवाळले. नंतर तो कश्यप, अदिती यांना भेटला. बाळ विनायकाचे थोर कार्य पाहून त्या श्रेष्ठ मातापित्यास फारच आनंद झाला व धन्यता वाटली.

ब्रह्मकुमारी सरस्वती-शारदा ही गणपतीसाठी वधू निश्चित केली होती. आता गणेशाने विवाह करून संसार थाटावा म्हणून सर्वांनी प्रार्थना केली.

पण गणेश म्हणाला, "क्षमा करा. माझ्या त्या संसारापेक्षा मी भारताची सेवा करण्यातच धन्यता मानतो. सर्व भारतीयांचे व भारताचे सर्व संसार सुरळीत चालावेत आणि सर्वत्र सुखशांतीच नांदावी म्हणून मी अखंड प्रयत्न करीत राहीन. मी आता अवतार संपवीन आणि योग्य त्या वेळेला पुन्हा पुन्हा नवा अवतार घेईन. मला सर्वांनी आता प्रेमाने शेवटचा निरोप द्यावा."

अनंत चतुर्दशीच्या दिवशी सायंकाळच्या वेळी श्रीविनायक महागणपतीने जलसमाधी घेतली. सर्वत्र शोकाचा भडका उडाला. सारे नरनारी जलाशयाकडे धावले आणि एकच आरोळी झाली, "पुढच्या वर्षी लवकर या!"

महागणपती विनायकाच्या थोर कार्याचे स्मरण सतत राहावे म्हणून लोकांनी त्याची मूर्ती करून दहा दिवस मोठा उत्सव केला आणि तीच प्रथा अद्यापीही चालू आहे.

ब्रह्मकुमारी सरस्वती पुढे अखंड कुमारीच राहिली. तिने आपले आयुष्य लोकांना विद्यादान करण्यातच घालविले. ती आदर्श पवित्र देवता बनली.

ब्रह्मदेवाचा दुष्ट पुत्र सिंदुरासुर याला पावतीपुत्र गणेश-गजानन याने ठार मारले. तेव्हा ब्रह्मकुमारी ऋद्धी व सिद्धी यांचा विवाह गणेशाशी झाल्याचीही एक कथा आहे.

श्रीमहागणपतीच्या अशा अनेक कथा आहेत. विशेषतः विनायकानेच निरनिराळ्या वेळी वेगवेगळे अवतार धारण करून विघ्ने दूर केली.

गणपतीची आराधना केवळ महाराष्ट्रातच आहे असे नाही, तर भारतीय आणि अखिल विश्वात त्याची आराधना चालू आहे. उजव्या आणि डाव्या सोंडेचा गणपती व त्याचे वैशिष्ट्य आणि योग्य आराधना तज्ज्ञांकडून उपलब्ध करून घ्यावी. सर्वत्र प्रचलित अशी काही स्तोत्रे येणेप्रमाणे :-

१. वक्रतुंड महाकाय सूर्यकोटीसमप्रभ ।
निर्विघ्नं कुरु मे देव सर्व कार्येषु सर्वदा ॥

२. ॐ नमोजी गणनायका । सर्वसिद्धि फलदायका ॥
अज्ञान-भ्रांति-छेदका । बोधरूपा ॥ (रामदास)

३. प्रारंभी विनंती करू गणपती विद्यादया सागरा ।
अज्ञातत्व हरोनि बुद्धिमति दे, आराध्य मोरेश्वरा ।
चिंताक्लेश दरिद्र दुःख अवघे देशान्तरा पाठवी ।
हेरंबा, गणनायका गजमुखा भक्तां बहु तोषवी ॥

४. सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची । नुरवी पुरवी प्रेम - इत्यादि प्रसिद्ध आरत्या.

महाराष्ट्रातील अष्टविनायकांची स्थाने पुढीलप्रमाणे :

१. गिरिजात्मज - जुन्नरजवळ लेण्याद्रीमध्ये (जीर्णापूर) (लेखन-पर्वत)

२. वरदविनायक - पुणे-मुंबई रस्त्यावर मढ (महढ) येथे (कर्जत खोपोलीनजीक)

३. श्रीगणपति - पुणे-नगर रस्त्यावर रांजणगाव येथे (मणिपूरचा हाच दहा सोंडांचा गणपती)

४. बल्लाळेश्वर - रायगड जिल्ह्यात नागोठण्याजवळ.

५. सिद्धिविनायक - नगर जिल्ह्यात राशीनजवळ सिद्धिटेक येथे.

६. चिंतामणी - पुणे जिल्ह्यात लोणी स्टेशनजवळ थेऊर येथे. (हे पेशव्यांचे आराध्य दैवत)

७. मयूरेश्वर - जेजुरीजवळ मोरगाव येथे.

८. विघ्नेश्वर - जुन्नरजवळ ओझर येथे.

# २. श्रीक्षेत्र कोल्हापूर

फार प्राचीन काळी कोलासुरदैत्य आणि त्याचा मुलगा करवीर हे राक्षस फार माजले होते. त्यांनी पृथ्वीला खूप त्रास दिला. त्या दुष्टांचा नाश करण्यासाठी जगन्माता आदिशक्तीने जगदंबेचा अवतार धारण केला आणि गोमंतक पर्वताच्या आश्रयाने लपून बसलेल्या त्या असुरांवर हल्ला केला. त्यांना ठार करून जगाला तिने निर्भय केले. या कामी जगदंबेला टेंबलाईदेवी आणि भैरव जोतीबा देव यांनी साहाय्य केले.

त्या जगज्जननी जगदंबेची मूर्तिरूपाने ज्या स्थळी स्थापना झाली तेच कोलापूर किंवा करवीर क्षेत्र, महालक्ष्मीचे निवासक्षेत्र कोल्हापूर !

महाराष्ट्रातील आदिअंबेची साडेतीन पीठे म्हणजे तुळजापूर, माहूर, अंबेजोगाई आणि कोल्हापूर. कोल्हापूर हे अर्धपीठ असले तरी त्याला खूपच महत्त्व आहे. महालक्ष्मी जगदंबेचे ते पवित्र क्षेत्र आहे.

चला जाऊ पाहू - कोल्हापुरी राहू ।
ओवियात गाऊ - अंबाबाई ।।
कोल्हापूर शहर - दुरून दिसे मनोहर
पाच शिखरे लहानथोर - अंबाबाईची ।।
येथून नमस्कार - महादरवाजा सन्मुख
माझी विनंती ऐक - अंबाबाई ।।

अशा प्रकारच्या ओव्या आणि जुनी गाणी कोल्हापुराचे महत्त्व सांगतात. मार्कंडेय पुराणात कोल्हापूरचे वर्णन आहे. एकनाथांनी या देवीची प्रार्थना केली होती की,

"नमो आदिमायाभगवती । अनादिसिद्ध मूळप्रकृती ।
महालक्ष्मी त्रिजगती । बया दार उघड ।।"

महाराष्ट्राच्या दक्षिण भागात सह्याद्रीच्या कुशीत अगदी संरक्षक ठिकाणी हे कोल्हापूरक्षेत्र वसलेले आहे. त्याच्याभोवती कोटकिल्ल्यांचे तट आहेत. घाट आहेत. पंचगंगा नद्यांच्या खोऱ्यातील सुपीक प्रदेश आहे. मराठ्यांची ती एक राजधानी आहे. कोकण आणि देश यांना जोडणारा हा एक महत्त्वाचा प्रदेश आहे. श्रीदत्तप्रभूंचे ते भिक्षास्थान म्हणून प्रसिद्ध आहे. व्यापारी पेठ म्हणून प्राचीन काळापासून याचे महत्त्व आहे.

कोल्हापुराजवळच ब्रह्मपुरी येथे जे उत्खनन झाले त्यात त्या भागातील

ऐतिहासिक संस्कृतीवर खूपच प्रकाश पडला आहे. कोल्हापूरचे पौराणिक महत्त्व, ऐतिहासिक श्रेष्ठत्व आणि आधुनिक वैशिष्ट्य यांच्या त्रिवेणी संगमामुळे हे पवित्र क्षेत्र महाराष्ट्राच्या मानाचे एक महत्त्वाचे केंद्र बनले आहे.

ययातीचे पुत्र कोल नावाचे अनार्य पूर्वी या ठिकाणी राहात होते कोल म्हणजे कोळी किंवा कानडी भाषेत कोलिहू म्हणजे कमळ; ह्या नावावरून या स्थळाला कोलपूर किंवा कमलक्षेत्र असे नाव पडले आहे, असे म्हणतात. कोल्हापूर येथील पद्माळे किंवा कमल सरोवराच्या ठिकाणी घोडदौडीचे मैदान होते.

मात्र कमला म्हणजे श्रीविष्णूची लक्ष्मी ती ही कोल्हापूरची महालक्ष्मी नव्हे. महालक्ष्मी ही आदिशक्ती महामाया जगदंबा आहे. याच जगदंबेने दुष्टांच्या संहारासाठी वेळोवेळी अवतार घेऊन सर्व जगाला सुखी केले. श्रीविष्णूच्या लक्ष्मीने असा अवतार कधीच घेतल्याचे प्रसिद्ध नाही. कोल्हापूरच्या जगदंबा महालक्ष्मीचे म्हणूनच फार फार महत्त्व आहे.



कोल्हापूरची अंबाबाई

ह्या आदिशक्ती, भुवनेश्वरी, त्रिपुरसुंदरी, महालक्ष्मी जगदंबेचे मंदिर कोल्हापूर येथे आहे. ह्याच शिवशक्तीने उग्रस्वरूप धारण करून जगाचे मंगल केले. दुष्टांचा नाश करून सर्व कल्याण केले.

कोल्हापूरच्या ह्या भगवतीदेवीची मूर्ती तीन फूट उंचीच्या आसनावर सुमारे चार फूट उंच चतुर्भुज अशी उभी आहे. तिच्या उजव्या हातात महाळुंग फळ आणि गदा आहे. डाव्या दोन हातांत ढाल आणि पानपत्र आहे. डोक्यावर शिवलिंग आहे. मागील बाजूस सिंह आणि नागाकृती प्रभावलय आहे. ही मूर्ती अत्यंत मनोहर असून मालामेखलांनी रूपाभरणविभूषित आहे.

ह्या महालक्ष्मीचे मंदिर पश्चिमाभिमुख आहे. मावळत्या सूर्याचे किरण माघमासी शुद्धपक्षामध्ये तीन दिवस देवीच्या सर्वांगावर

पडतील, अशा कौशल्याने ह्या मंदिराची रचना केलेली आहे. त्या किरणस्नानपर्वकालात देवीची आरती करणे व दर्शन घेणे महान् पुण्यप्रद मानले जाते. तो सोहळा पाहण्यास अलोट गर्दी होत असते.

मंदिराचे दरवाजे चांदीच्या पत्र्यांनी मढविलेले आहेत. मंदिरापुढे बाराखांबी मणिमंडप आहे. भिंतींना उत्तम नक्षीच्या जाळीदार खिडक्या आहेत. शेजघर, खजिना व पालखी यांच्या खोल्या तेथे आहेत. दारावरील जयविजय द्वारपालांच्या सुमारे सोळा फूट उंचीच्या उभ्या मूर्तीचे शिल्पकाम पाहण्यासारखे आहे.

मुखमंडपात आठ ओळींत अडुसष्ट खांब असून मधील चार खांबांच्या चौकावर घुमट आहे. त्यात कमलाकार झुंबर लोंबते ठेवलेले आहे. ह्याच मंडपातील चार कोपऱ्यांत मुरलीधर, वीरभद्र, विष्णू आणि वासुदेव यांच्या चार भव्य मूर्ती आहेत. शिवाय चौरीधरांच्या दोन धिप्पाड मूर्तीही सर्वांचे लक्ष वेधून घेतात.

चौतीसखांबी मुक्तिमंडपात गणेशमूर्ती असून उत्तर बाजूला महाकालीचे मंदिर आणि दक्षिण बाजूला महासरस्वतीचे मंदिर आहे. महालक्ष्मीच्या मंदिराची रचना श्रीयंत्राच्या गूढ आणि सर्वतोभद्र शिल्पाची नक्षत्राकार केलेली आहे.

मुख मंडपातून महाकालीच्या मंदिराकडे जाताना वाटेत "ॐ, ऱ्हाम्, ऱ्हीम्" इत्यादी गूढमंत्राचे प्रसिद्ध असे ऐश्वर्यप्रद आणि आरोग्यदायक श्रीयंत्र एका गुळगुळीत काळ्या दगडावर कोरलेले आहे. त्याचे शास्त्रीय तंत्र महत्त्वाचे आहे. यालाच कोणी इतरत्र दुर्मिळ असे सूर्यकमलही म्हणतात.

ह्या श्रीयंत्राच्या मागील जिन्याने महाळुंगरूपी मातुलिंग शंकराच्या दर्शनास जाता येते. येथील दगडी खांबांनी वेष्टित असा भव्य नंदी, त्या सर्व खांबांवरील फुलवेलींची नक्षी, भिंतीवरील पौराणिक कथांची चित्रे आणि चौकोनी खांबांवरील प्रसिद्ध अशा चौसष्ट योगिनींच्या नृत्याविर्भावातील अत्यंत सुंदर मूर्ती प्रेक्षणीय आणि अभ्यसनीय आहेत.

कार्तिकस्वामी आणि सिद्धेश्वर यांची मंदिरे खोल जमिनीत आहेत. विठोबा, सत्यनारायण वगैरे अनेक देवदेवता भिंतीबरील कोनाड्यांतून दिसतात. कोल्हापूरला दक्षिण काशी म्हणतात. मनिकर्णिका कुंडाजवळ तर कितीतरी देवतांची मंदिरे आहेत. येथील दत्तस्थान हे महानुभावांचे अत्यंत पवित्र, पूज्य स्थान आहे.

महालक्ष्मीच्या घंटाद्वाराजवळ अत्यंत सुंदर शिल्पकाम असलेले नवग्रहांचे मंदिर आहे.

पूर्व दरवाजाजवळ शेषशाईचे देऊळ आहे. ते जैनांचेही पवित्रस्थान आहे. जैनांच्या यक्षिणी म्हणजेच मातृका आणि पद्मावती किंवा अंबादेवी ह्या देवताही

कोल्हापुरासच आहेत, असे मानतात.

कोल्हापूर येथे पंचगंगा नदीला सुंदर घाट बांधलेले आहेत. नदीकाठी उत्तरेश्वर शंकराचे फारच जुने मंदिर आहे. त्यातील पिंडी पुरुषभर उंचीची आहे. भोगावती, कुंभी आणि तुळशी ह्या नद्यांचा संगम कोल्हापुराजवळच आहे. त्या त्रिवेणी संगम स्थळाला प्रयागतीर्थाचे महत्त्व आहे, असे मानतात.

सुमारे बाराशे वर्षांपूर्वी एका भूकंपामुळे कोल्हापुरास रंकाळे नावाचा एक मोठा तलाव तयार झाला. हा भव्य आणि सुंदर तलाव म्हणजे कोल्हापूरच्या लोकांची जणू चौपाटीच आहे. तेथे खूप लोक दररोज हवा खाण्यासाठी येत असतात. येथील घुमटीतला नंदी दररोज गहूभर पुढे आणि तीळभर मागे सरकत असतो. ह्या गतीने तो जेव्हा संपूर्ण पाण्यात बुडेल तेव्हा हे जगही बुडणार आहे असे म्हणतात. खरे काय होईल ते फक्त त्या जगदंबेलाच ठाऊक!

अंबाबाईच्या देवळात रोज पहाटे काकडआरती होते. नंतर सकाळी षोडशोपचारे पूजा, दुपारी महानैवेद्य आणि आरती होते. सायंकाळी अलंकारपूजा व धूपारती करतात. रात्री शेजारती होते. ह्या मंदिरात दररोज स्त्रियांची खूपच गर्दी असते.

दर शुक्रवारी पालखीचा सोहळा होतो. चैत्रमासी वासंतीय नवरात्राचा उत्सव आणि अश्विनात शारदीय नवरात्राचा उत्सव येथे मोठ्या थाटाने करतात.

दररोजच्या दर्शनासाठी, ओहर यात्रेसाठी आणि नवस फेडण्यासाठी अनेक लोक मंदिरात येत असतात. महालक्ष्मी जगदंबेची ती वस्त्रालंकारविभूषित मनोहारी मूर्ती पाहून प्रत्येक भक्ताचे अंतःकरण हरखून जाते.

कहाण्यांच्या प्रसिद्ध पुस्तकातील महालक्ष्मीची कहाणी कोल्हापुराच्या जगदंबेशी संबंधित आहे. त्या कहाणीतील पाटमाधवराणी, चिमादेवराणी, नागकन्या, देवकन्या, महालक्ष्मीचा वसा, पूजेतील तातू, घागरी फुंकणे वगैरे सर्व आणि उत्तरपूजेनंतर "महालक्ष्मीमाय कोल्हापुरा जाती जागती" असे म्हणणे हे सर्व कोल्हापूरच्या कथेतील चिंतनीय आणि आदरणीय विषय आहेत. सुवासिनींचे सौभाग्य राखून जगाचे मंगल करणारी, दुष्ट शत्रूंचा नाश करून आपणा सर्वांना शक्ती, शांती देणारी कोल्हापूरची महालक्ष्मी जगदंबा खरोखरच आदिमाया जगन्माता आहे.

ह्या महालक्ष्मीला शत्रूच्या संहारात साहाय्य करणारी श्रीटेंबलाईदेवी कोल्हापुरापासून पूर्वेला दीड कोस अंतरावर एका टेकडीवर जाऊन राहिली आहे. आश्विन शुद्ध पंचमीला तिच्या भेटीसाठी दरवर्षी महालक्ष्मीची पालखी थाटाने नेतात. त्या पालखीबरोबर कोल्हापूरचे महाराजही असतात. बावड्याच्या पाटलांची कुवार कन्या ह्या वेळी टेंबलाईदेवीपुढे कोहळा फळ कापण्याचा विधी करते आणि शत्रूचा संहार ह्या देवीने केल्याची आठवण सर्वांना देते. परंपरागत

भावनेच्या ह्या कार्यक्रमाचे महत्त्व मानले जाते.

कोल्हापूरच्या दक्षिणेस पाच मैलांवरील टेकडीवर कात्यायनी देवीचे मंदिर आहे आणि उत्तरेला बारा मैलांवर एका डोंगरावर भैरव जोतीबाचे स्थान फारच प्रेक्षणीय व महत्त्वाचे आहे.

कोल्हापूरची जगदंबा ही शिलाहार राजांची कुलदेवता होती. एका राष्ट्रकूट राजाने या देवीपुढे आपल्या हाताची करंगळी कापून देवीला अर्पण केली होती. गोव्याच्या कदंब राजांनी ह्या देवीची भक्तिसेवा केली होती. यादव घराण्यातील दुसरा सिंधणराजा ह्या भगवतीदेवीचा परमभक्त होता. अनेक राजांनी ह्या देवीला नवस केले, दाने दिली, गावे आणि जमिनी इनाम दिल्या. शिवछत्रपतीच्या वंशजांनी कोल्हापूर येथे मराठ्यांची गादी स्थापन केली. त्यांनी ह्या महालक्ष्मी जगदंबेचे महत्त्व वाढविले आणि कोल्हापूर राजधानीचे वैभव वाढवून एक महान कार्य करून ठेवले.

कोल्हापूरचा इतिहास म्हणजे महाराष्ट्राच्या इतिहासातील एक मानाचे, महत्त्वाचे सोनेरी पान आहे. महाकाली, महासरस्वती आणि महालक्ष्मी यांच्या वरप्रसादाने कोल्हापूर हे महाराष्ट्राच्या महान शक्तीचे, बुद्धीचे आणि वैभवाचे केंद्रस्थान बनले आहे.

आधुनिक काळात कोल्हापूर शहर म्हणजे कलापूर बनलेले आहे. चित्रकला, सिनेसृष्टी, संगीतकला, मल्लविद्या वगैरे अनेक कलांचे हे माहेरघर बनले आहे. येथील पॅलेस थिएटर किंवा भोसले नाट्यगृह हे तर महाराष्ट्रातील एक अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण कलागृह आहे. शहरात अनेक क्रीडांगणे आहेत, प्रशस्त असे खासबाग मैदान आहे, भव्य असे कुस्तीचे मैदान आहे.

छत्रपती शाहूमहाराजांनी अनेक राजकीय सुधारणांबरोबरच सामाजिक सुधारणा करून कोल्हापूरचे वैभव वाढविले. त्याच्या कार्याची कीर्ती अजरामर आहे. शिवाजी उद्यमनगर हे तर अनेक प्रकारच्या उद्योगधंद्याचे एक महान आदर्श केंद्र बनले आहे. श्रीशिवाजी विद्यापीठ हे महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वाचे कार्य करीत आहे. येथील प्रसिद्ध राजाराम महाविद्यालयाने तर गेली ऐंशी वर्षे अत्यंत श्रेष्ठ असे शिक्षणकार्य करून महाराष्ट्राला मानाचे स्थान प्राप्त करून दिले आहे. येथील करवीर पीठाचे श्रीशंकराचार्य धर्मसंस्कृति-संवर्धनाचे कार्य करीत आहेत.

पंचगंगा, कळंब तलाव, राजाराम तलाव वगैरेंमुळे कोल्हापुराच्या पाणीपुरवठ्याची व्यवस्था अत्यंत उत्तम झाली आहे. कोल्हापुरात भरपूर पाणी आहे. कोल्हापूरचे जीवन समृद्ध आहे. कोल्हापूर भागातील गूळ फारच उत्तम असतो. भारतभर कोल्हापुरी गुळाची प्रसिद्धी आहे. आधुनिक काळात त्या भागात सुधारलेल्या शास्त्रीय पद्धतीच्या शेतीमुळे त्या भागातील पुष्कळ शेतकरी

सुखी, सुधारलेले आणि संपन्न आहेत. कोल्हापूरला जाणारे प्रवासी जवळच असलेल्या पन्हाळ्याची सहल मुद्दाम करतात; कारण ती सहल अत्यंत आनंददायी असते.

कोल्हापूरचे महालक्ष्मी मंदिर आणि इतर पौराणिक, ऐतिहासिक व आधुनिक स्थळांबरोबरच शालिनी राजवाडा, न्यू पॅलेस, राजारामपुरी, शाहुपुरी, ताराबाई पार्क, मार्केट यार्ड वगैरे स्थळेही कोल्हापूरच्या वास्तुसौंदर्यात भर घालीत आहेत. कोल्हापुराची माहिती वाचून अथवा ऐकून प्रत्येक जण म्हणेल, "चला जाऊ पाहू - कोल्हापुरी राहू !"

## ३. श्रीक्षेत्र जेजुरी

फार वर्षे झाली, शेषशाई भगवान विष्णू एकदा महायोगनिद्रेत मग्न होते, त्यांच्या कर्णातून मधू आणि कैटभ नावाचे दोन दैत्य बाहेर आले. ते ब्रह्मदेवाला मारू लागले. नंतर विष्णू उठले आणि दैत्यांशी युद्ध करू लागले, पण ते दैत्य विष्णूला आवरेनात. शेवटी विष्णू पळाले, त्यांनी विनायकाला प्रसन्न करून घेतले. विनायकाने विष्णूला सिद्धी दिली.

पुन्हा विष्णू व मधु-कैटभ यांचे युद्ध जुंपले. विष्णूचा थोर पराक्रम पाहून दैत्य संतुष्ट झाले आणि विष्णूला म्हणाले, 'वर माग.'

या संधीचा फायदा विष्णूने घेतला व म्हणाला, 'दैत्यांनो, तुमचा वध माझ्या हातूनच होईल, असा वर द्या.'

दैत्य निरुत्तर झाले. विष्णूने त्यांचा वध केला; पण त्यांचे रक्त शेषाच्या मस्तकावर पडले. त्या रक्तापासून पुन्हा दोन दैत्य निर्माण झाले.

त्या दैत्यांनी प्रखर तपश्चर्या करून शंकराला प्रसन्न करून घेतले, अजिंक्यपद मिळविले, पण शेवटी शंकराच्या वेगळ्या अवतारात त्यांच्याच हातून मरण इच्छिले. शंकरांनी या दोन दैत्यांची नावे ठेवली ती - पहिला दैत्य मणी. शेषमस्तकावर मण्याप्रमाणे शोभणारा म्हणून व दुसरा दैत्य मल्ल (मत्+ लय = माझ्या हातून लय होण्यायोग्य म्हणून).

मणी आणि मल्ल हे असुर मदोन्मत्त झाले. त्यांनी नंतर पृथ्वी, स्वर्ग, पाताळ या त्रिखंडांत उच्छाद मांडला, कहर उडविला. इंद्र, विष्णू, ब्रह्मदेव, गंधर्व, यक्ष, नरनारी, ऋषिमुनी वगैरे कोणाचीच मात्रा त्यांच्यापुढे चालेना. सर्वत्र

हाहाकार झाला. शेवटी सर्वजण शंकराला शरण गेले.

धवलगिरीच्या गुप्त कडेकपारात अनेक ऋषीमुनी आश्रम करून यज्ञयाग करीत होते. तेथे ऋषींची कुटुंबीय मंडळी गुप्तपणे लपली होती, पण तेथेही मणिमल्लांची धाड गेली. आश्रम उद्‌ध्वस्त झाले, मुनिजन पळून गेले.

कैलासावर देव, गंधर्व, ऋषिमुनींचा मेळावा जमला. ऋषींचे दुःख पाहून भगवान भोलानाथाला दया आली. मणिमल्लांचा नाश जवळ आला आहे, तरी आता वेगळे रूप धारण करून त्यांना उद्धरावे हे शंकरांनी ठरविले. त्यांनी सर्वांना अभय दिले आणि लगेच मार्तंड भैरवाचा नवा अवतार धारण केला.

मणिमल्ल दैत्यांनी केलेला संहार पाहून व छळ ऐकून श्रीमार्तंड भैरव खूप रागावले. ताडकन उठून त्यांनी जटा आपटल्या. जटेतून महामारी या नावाची क्रूर देवता निघाली. ऋषींनी तिला तूप पाजले. तेव्हा धृतहारी अंशरूपाने एक प्रचंड खड्‌ग बनली.

खड्‌ग धारण करून व हाती त्रिशूळ घेऊन मार्तंडभैरव युद्धास सज्ज झाले. त्यांचे तेज कोटी सूर्यांप्रमाणे विलसत होते. भालप्रदेश भंडारायुक्त होता. चंद्र हा त्यांचा घोडा बनला. आदिशक्ती पार्वती नवे रूप धारण करून त्यांच्यामागे घोड्यावर बसली. रौद्र आवाज करणारे भयंकर कुत्रे त्यांनी बरोबर घेतले. चैत्र शुद्ध पौर्णिमेला दोन प्रहरी शंकराने हा मार्तंडभैरवाचा अवतार धारण केला.

स्कंद (कार्तिकेय) हा मार्तंडभैरवाचा सेनापती झाला. मोरयाने (गणेशाने) करा नदीच्या किनाऱ्यावर तळ दिला. इंद्राने (पुरंदराने) इंद्रकिलगिरीवर मोर्चे बांधले. धवलगिरी (धावडदरा) जवळच्या कडेपठाराजवळ देवांचे सैन्य सज्ज झाले आणि वीरभद्राने रुद्र, वेताळ, पिशाच्चे, शाकिनी, डाकिनी यांचे आसुरी सैन्यही मार्तंडभैरवाच्या मदतीस आणले. निर्बर नागेश्वराची नागसेना (नाझरे), करवीरच्या लक्ष्मीची स्त्रीसेना, बिल्वेश्वराची सेना (बेलसर), शंकरेश्वराचे सैन्य (साकुर्डे) असे देवांनी तळ दिले.

रणवाद्यांनी अंबर दुमदुमले. रणधुमाळीने वातावरण धूसर बनले. मणिचूर पर्वताकडे कूच करताना धवलगिरीच धर्मपुत्र लव आदी ऋषींच्या आश्रमाजवळ जयाद्री पर्वताच्या त्या निबिड कडेपठारावरून मार्तंडभैरवाने युद्धासाठी प्रस्थान ठेवले. ते प्रस्थानपीठ (कडेपठार) सर्वांनी पूज्य मानले.

मणिमल्लांनी मार्तंडभैरवाच्या सैन्यावर चाल केली. त्यांचे सिंदूरचर्चित उग्र सैन्य भैरवाच्या प्रचंड सैन्यापुढे टिकाव धरीना. भयंकर रणसंग्राम झाला. मणिदैत्य प्रथम ठार झाला. मल्ल चवताळून आला. अपूर्व युद्ध झाले. मार्तंड भैरवाने तर आपल्या खड्‌गाच्या साह्याने मल्लाचा हात तोडला. आदिशक्ती

पार्वती, घोडा, कुत्रा यांनीही पराक्रमाची शर्थच केली. अनेक असुरांचा संहार झाला. मल्ल घायाळ झाला. तो शंकरांना शरण आला. त्याने मार्तंडभैरवाचे चरण धरले. शेवटी शंकर प्रसन्न झाले आणि त्याचे नाव आपल्या नावाशी संलग्न करून त्यांनी त्याला मुक्ती दिली.

मल्लारी (मल्ल+अरि) मार्तंड हे नाव तेव्हापासून रूढ झाले. म्हणजे खड्ग धारण करणारा तो खंडोबा, हेही नाव प्रचारात आले. सेनापती स्कंदाची आठवणही त्या नावात कायम राहिली.

श्रीमार्तंड भैरवाने दुष्ट मणिमल्लांचा नाश केला. पापताप नाहीसे झाले. मुनिजन, देवगंधर्व संतोष पावले. त्यांनी युद्धानंतर मल्लारी देवांची प्रार्थना केली, "प्रस्थानपीठ (कडेपठार) येथे आपण याच रूपाने सतत राहून भक्तांच्या मनोकामना पुरवाव्या. या प्रेमपुरीत जय मिळविला म्हणून या स्थानाचे माहात्म्य वाढावे. या स्थानाला जयपुरी नाव असावे. जयाद्रीवरील या थोर स्थळी आपण मल्लारिमार्तंड किंवा खंडोबाच्या रूपाने सतत वास करावा आणि ते तीर्थक्षेत्र महान राष्ट्रांचे, वीरांचे स्फूर्तिक्षेत्र बनावे. आपण मानवरूपाने येथे राहून सर्वांना मार्गदर्शन करावे."

सर्वांची ही प्रार्थना प्रभूंनी मान्य केली आणि मग जयाद्रीवरील कडेपठारावर मार्गशीर्ष शुद्ध षष्ठीच्या दिवशी शंकर-पार्वती स्वयंभू दोन लिंगांच्या रूपाने प्रकट झाले. सर्व भक्तांना तो दिवस आणि ते स्थळ धन्य वाटले.

लोकांनी मग येथे यात्रा भरविली. त्या दिवशी सर्वांनी मार्तंडभैरवाची एक भव्य, मृत्तिकामूर्ती तयार केली. तिला तैलस्नान घातले. ती भैराळाची मूर्ती हिंदोळ्यावर बसविली (म=महादेव. र=रक्षण करणारा. इळा= मृत्तिका. मूर्ती = मैराळ अशी भैराळ शब्दाची व्युत्पत्ती सांगतात.) त्या मूर्तीची षोडशोपचारे पूजा केली. थाटाने ती मूर्ती मिरवली. रात्रौ नृत्यगायनादी आनंदाचे कार्यक्रम केले. चंपाषष्ठीचा हा उत्सव पुढे दरसाल लाखो लोक जमून करू लागले.

जयाद्री-जयपुरी-जेजुरी. जेजुरी हे नाव असे पडले. कडेपठारावर मार्तंड-भैरवाचे पवित्र स्थान. हे नंतर मराठे प्रांतात लाखो लोकांचे कुलदैवत बनले. मल्लारीची जेजुरी हे क्षेत्र भारतात प्रसिद्ध झाले.

त्यानंतर काही कालाने मार्तंडभैरवाने त्या स्थळी मानवरूप धारण केले. आपल्या बेलभंडार, कुत्रा, घोडा वगैरे साधनांनी सर्वत्र व्याधिनिरसनाचे कार्य सुरू केले. अनेक रोगरूपी राक्षसांचा संहार करणारा तो धन्वंतरीचा नवा अवतारच होता. हरिद्राचूर्णाची महती त्यानेच जगाला प्रथम पटविली. जखमा करून घेऊन त्यावर बेलभंडाऱ्याचे प्रयोग, उपचार त्याने करून पाहिले. अनेक

चमत्कार जगाला दाखविले. जगाने खंडोबाला नमस्कारच करावा, असा अधिकार त्याला प्राप्त झाला. धन्य तो मार्तंडभैरव आणि धन्य ती मल्लारीची जेजुरी !

मल्हारीच्या पराक्रमाच्या आणि थोर परोपकाराच्या वार्ता लवकरच सर्व देशभर पसरल्या. त्याची कीर्ती श्रीक्षेत्र निधिनिवास (नेवासे) ऊर्फ महाल क्षेत्र येथील एका भाविक श्रीमंत वाण्याने ऐकली; तो तीमसेठ वाणी फारच श्रीमंत होता. त्याने आपली एकुलती एक कन्या या मल्हारीला देऊन टाकली. आता जेजुरी येथे मल्हारीचा संसार सुरू झाला.

महालया क्षेत्राची पत्नी केली म्हणून मल्हारीने तिचे नाव महालया किंवा म्हाळसा असेच ठेवले.

वास्तविक हा योगायोग पूर्वजन्मीचाच ठरलेला होता. ज्या वेळी समुद्रमंथन झाले होते, महादेव विष प्याले होते, त्या वेळी अमृत वाटणारी मोहिनी शंकरांनी पाहिली नव्हती. पुढे एकदा विष्णूला त्यांनी विनंती केली; विष्णूंनी त्याला ते रूप दाखविले. त्या मोहिनी मायेची भुरळ शंकराला पडली. ते बेचैन झाले. पार्वतीच्या ठिकाणी ही त्यांना दिसू लागली.

एकदा शंकर पार्वतीला म्हणाले, "मणिमल्लासुराचा वध करण्यास मी मार्तंडभैरवाचा अवतार धारण करीन तेव्हा तू महाल या क्षेत्रात जन्म घे. नंतर मी मल्हारी जेजुरीहून नेवासे येथे येईन. त्या वेळी तुझी मोहिनी मला पडेल आणि मग आपला विवाह होईल. नंतर आपण मानवरूपाने जेजुरीस राहू. भक्तांना मार्गदर्शन करू, भक्तांना अभयामृत वाटू!"

ठरल्याप्रमाणे पौष शुद्ध पौर्णिमेस म्हाळसा आणि मल्हारी यांचा विवाह पाली, जिल्हा सातारा येथे झाला. त्या प्रसंगाची आठवण म्हणून पाली येथे दोन लिंगे आहेत. तेथेही खंडोबाचे स्थान आहे. नेवासेही खंडोबाचे बनले.

शंकर आणि पार्वती मल्हारी म्हाळसेच्या रूपाने जेजुरीत राहू लागले, ते पाहून कैलासाहून गंगाही तेथे आली. ती कडेपठारावर भैरवसान्निध्यात गुप्तपणे राहू लागली.

गंगा-गौरी या सवतीसवतीच्या कटकटी घरात वाढू लागल्या. तेव्हा मल्हारीरूपी खंडोबाला आपल्या तिसऱ्या पत्नीची आठवण होऊ लागली.

आणि एके दिवशी खंडोबाने चमत्कार केलाच ! नळदुर्गाहून चंदनवाडीच्या एका धनगराची मुलगी बाणाई हिला घोड्यावर घालून पत्नी म्हणून जेजुरीस आणले. गंगा-गौरी चकित झाल्या. सवतीमत्सराने म्हाळसा तर अगदी बेचैन झाली. तेव्हा शंकराने तिला पूर्वीची आठवण दिली, ती अशी -

पूर्वी कैलासावर गौरी आणि गंगा यांची भांडणे जया नावाची दासी मिटवीत

असे. त्या दोघींचा सलोखा करणारी जयादासी त्या दोघींना खूप आवडे. एकदा सहज खुशीत येऊन त्या दोघी जयाला म्हणाल्य, 'तू शंकराची बायको होशील तर फारच चांगल होईल!'

गणपतीच्या साक्षीने त्या दोघींनी तसा करार लिहून दिला. करार घेऊन जया शंकराकडे गेली. शंकर म्हणाले, "मी मार्तंडभैरवाचे रूप घेऊन मणिमल्ल दैत्यांचा वध करीन. नंतर तू माझी तिसरी भार्या हो; तोपर्यंत हा बाण घे. खुणेसाठी! हा बाण किरातार्जुन युद्धाच्या वेळी माझ्या डोक्यावर अर्जुनाने मारलेला आहे. या बाणासह तू बाणासुराच्या पोटी जन्म घे. मग यथाकाल तुझा-माझा विवाह होईल."

शंकरभक्त बाणासुराला पुढे बाणासह एक मुलगी झाली. ती बाणा वयात आल्यावर तिने स्वयंवरात मुरासुराला माळ घातली, पण श्रीकृष्णाने मुरासुरालापण युद्धात ठार केले.

मग बाणाई कावेरी नदीत तपश्चर्या करू लागली. तेव्हा तिला शंकर प्रसन्न झाले. त्यांनी तिला नळदुर्ग येथे जाण्यास सांगितले. नळदुर्गास त्यांचा विवाह होणार होता!

नळदुर्गाजवळ चंदनवृक्षाखाली अजामीळ या नावाचा धनगर मेंढरे बसवीत असे, त्या वृक्षावर बाणा गुप्तपणे राहिली. एकदा रानातील सर्व वाघांनी अजामिळाच्या मेंढरांना वेढा दिला. त्याला मेंढरे मागितली. धनगराचा कुत्रा फार जोरदार होता. प्रत्यक्ष मार्तंडभैरवानेच त्या कुत्र्याचे रूप घेतले होते. त्या सर्व वाघांचा जोर पाहून अजामिळाने शंकराची प्रार्थना केली. तेव्हा प्रत्यक्ष मार्तंडभैरव तेथे प्रगटले. त्यांनी वाघांवर भंडार फेकला त्या वाघांना मानवरूप प्राप्त झाले. ते सर्व वाघ (वाग्गे) म्हणजे खंडोबाचे भक्त बनले.

हा चमत्कार झाडावरून बाणाईने पाहिला. ती खाली उतरली. धनगरास म्हणाली, "बाबा, मी तुमची मुलगी आहे. माझे लग्न या मार्तंडभैरवाशी लावून द्या." बाबा थक्क झाला. त्याने त्या दोघांना मेंढरे सांभाळावयास लावली आणि तो गावात गेला.

सर्व धनगर जमातीने मिळून नळराजाच्या साह्याने बाणाई व मल्हारी यांचा विवाह श्रावणशुद्ध पौर्णिमेस लावला. त्या प्रसंगाची खूण म्हणून नळदुर्ग, जिल्हा धाराशीव येथील किल्ल्यावर बाणाई व शंकर यांची दोन स्वयंभू लिंगे आहेत.

मल्हारी देवांनी सांगितलेली ही आठवण म्हाळसादेवी मान्य करीना; ती रागाने फणफणतच होती. तेव्हा शंकरांनी साक्षी गणपतीला तो करार घेऊन बोलाविले. गणपतीने तो जपून ठेवलेला करार म्हाळसामातेला दाखविला, पण तिने तो लगेच फाडला. त्या कागदाचे तुकडे करून तिने फेकून दिले. गणपतीचा अपमान झाला. तेव्हा तो रुसून निघून गेला.

मल्हारीने मग म्हाळसेच्या म्हणण्याप्रमाणे बाणाईला गडाखाली एक स्वतंत्र मंदिर बांधून दिले. बिचारी बाणाई स्वतंत्र राहू लागली. मल्हारी देव तिचे भेटीस फक्त रविवारीच जाऊ लागले.

म्हाळसेचा तो सवतीमत्सर पाहून मार्तंडभैरवालाही खूप वाईट वाटले. एकदा ते अचानक गुप्त झाले, मग मात्र गौरी-गंगा अस्वस्थ झाल्या. देवाच्या भेटीसाठी त्या तप करू लागल्या. कऱ्हानदीत त्या राहिल्या, दरीतही राहिल्या ! मग नारदमुनी आले. त्यांनी खंडोबाच्या घरातील कटकटी पाहिली. गुप्त झालेल्या मल्हारीला बाहेर काढले. जलात तप करणाऱ्या गंगा- गौरींना गणपतीच्या साह्याने बाहेर काढले. त्या स्थानांना अनुक्रमे गुप्त मल्लेश्वर आणि जानाईतीर्थ (जननीतीर्थ) ही नावे दिली.

गौरी, गंगा, गणपती, शंकर पुन्हा मानवरूपाने तेथे गुण्यागोविंदाने एकत्र राहू लागले. बाणाई मात्र गडाखाली राहू लागली. एकंदरीत खंडोबाचा संसार सुरळीत चालला.

बाणाईचा पाठीराखा भाऊ म्हणून प्रत्यक्ष विष्णूने (हेंगण) हेगडी धनगराचे रूप घेतले होते. तो जेजुरीस आला तेव्हा मल्हारीने त्याला आपला प्रधान कारभारी नेमले होते.

श्रीविष्णू हेगडी प्रधानाच्या रूपाने जेजुरीस राहिले, हे लक्ष्मीला समजताच लक्ष्मीही जेजुरीस आले. तिला खंडोबाने लक्ष्मीतीर्थात स्थान देऊन जेजुरीतच ठेवून घेतले. मग सर्वच देवांनी खंडोबाच्या जेजुरी राजधानीत प्रवेश केला व निरनिराळ्या रूपांनी तेथे वास्तव्य केले.

बाणाई ही इंद्राच्या सात मुलींपैकी स्वतंत्र बाण्याची एक मुलगी बानू होती. ती शापभ्रष्ट झाली. धनगरांनी तिचा सांभाळ केला व पुढे ती मल्हारीस अर्पण केली, अशीही कथा कोणी सांगतात. ते काही का असेना!

जेजुरीस खंडोबाचा संसार सुंदर चालला. सर्वांनी लोकांवर उपकार करून यथाकाल मानवरूपे टाकली आणि मग त्या सर्वांची सर्व स्मारके लोकांनी जेजुरीत उभारली आहेत!

जयाद्रीवरील प्रस्थानपीठावर म्हणजेच जेजुरीच्या कडेपठारावर मार्तंड वैभव हे जागृत देवस्थान भक्तांचे मनोरथ पुरवीत असे. चंपाषष्ठी यात्रेच्या वेळी आणि चार पौर्णिमा व सोमवती उत्सवाच्या वेळी लाखो लोक तेथे दर्शनार्थ येत. परंतु काही भक्त नित्यनेमाने वारीसाठी येथे जात असत. अशा श्रेष्ठ भक्तांपैकी सुपेगावचा भाण्या खैरे हा कऱ्हानदी ओलांडून रोज कडेपठारावर दर्शनासाठी येत असे. त्याची ही रोज नेमाची वारी कधी चुकली नाही. पुढे तो वृद्ध झाला.

एके दिवशी डोंगर चढताना त्याला मूर्च्छा आली. भगवान मार्तंडभैरव त्याच्याजवळ आले. त्यांनी त्याला उठविले, तेव्हा दर्शन घेऊन भाण्या खैरे

म्हणाला, "देवा, किती रे उंच राहतोस तू? आता म्हातारपणी मला तुझे दर्शन कसले?"

खंडोबा म्हणाले, 'मी तुझ्यासाठी कडेपठार सोडून खाली येतो, चल पुढे हो ! मागे पाहशील तेथे मी थांबेन.' मग भाण्या खैरे डोंगर उतरू लागला. तो शेवटच्या टेकडीवर आला. त्याने शंकेने मागे पाहिले तोच 'घोडे उड्डाणावरून' त्याच्यामागे आलेले देव त्या टेकडीवर गुप्त झाले. त्या ठिकाणी धनुष्याकृती लिंग भाण्याला दिसले. तो आनंदाने ओरडला, 'देव खाली आले! या रे या पहा.' या सारे लोक जमले. त्यांनी त्या लिंगाचे दर्शन घेतले आणि मोठा उत्सव केला.

कडेपठारावरील सर्वच देवांची ठाणी त्या टेकडीवर स्थापली. तेथे भव्य मंदिरे उभारली. गडकिल्ल्यावर खंडोबाचे राजवैभव पुन्हा विलसू लागले. सगळा संसार गडावर आला आणि मूळच्या प्रस्थानपीठावर कडेपठारावर केवळ स्मृतीच उरल्या.

शके १३०३ मध्ये वीरपाळ वीरमल्ल यांनी खंडोबाचे भव्य आणि सुंदर मंदिर बांधले. शके १५५३ ते ५७ मध्ये खटावच्या राघोबंबाजींनी गाभारा, पुढची सदर व मंदिराभोवती तट बांधला. शके १६६१ मध्ये विठ्ठल शिवदेव वाणी याने देवळामागचे पंचलिंग महादेवाचे देऊळ बांधले.

शके १६७८ मध्ये श्रीगोंदेकरांनी भंडारघर आणि शके १६६४ ते १६९९ पर्यंत अहिल्याबाई आणि होळकर घराण्यातील राजांनी नादुरुस्त कोट पुन्हा चांगला बांधला. इतर अनेक स्थाने व मंदिरे बांधली. इंदूरच्या होळकर सरकारांनी येथे कायम उत्पन्ने दिली. अद्यापही या सर्व देवस्थानांची व्यवस्था होळकरांकडेच आहे.

नंतर अनेक भक्तांनी गड़ाच्या पायऱ्या, दीपमाळा आणि नंदी, हत्ती, घोडे, कुत्रे, कासव इत्यादी दगडी प्राणी बनवून देवालयाला शोभा आणली. असे ऐकतो की, जेजुरी गडाला नऊ लाख पायरी, साडेतीनशे दीपमाळा, अठरा दरवाजे आहेत, पण आज प्रत्यक्ष ती संख्या दिसत नाही, असो. 'कालाय तस्मै नमः!'

सध्याच्या जेजुरी गावातील पेठेतच गडावर जाण्याचा रस्ता आहे. प्रवेश-कमानीजवळ मोठा दगडी नंदी व कासव आहे. वर जाण्यास सुंदर मजबूत मोठ्या दगडी पायऱ्या खूपच आहेत. पायऱ्यांच्या दुतर्फा उंचउंच सुंदर दगडी दीपमाळा आहेत. काही दीपमाळांवर सिंह, हत्ती, घोडे इत्यादी प्राणी द्रवीडियन पद्धतीने कोरले आहेत. या दीपमाळा म्हणजे महाराष्ट्राचे वैशिष्ट्यच होय.

वर जाताना मधूनमधून विश्रांति-स्थाने, दगडी हत्ती, घोडे, काही ऐतिहासिक स्मारके आणि भव्य अशा आठ वेशी आहेत. वीरभद्राचा भव्य दगडी पुतळा डाव्या बाजूस दिसतो. तेथूनच उजवीकडे एक मार्ग आहे, तो

आला आहे. त्या काळी की जेव्हा फक्त अर्धा आणा रोज मजुरी होती. या सर्व तटाला आतून सर्व बाजूंस मोठमोठ्या ओवऱ्या आहेत. ओवऱ्यांवर मजबूत व रुंद अशी भक्कम गच्ची आहे. त्या गच्चीवरून जेजुरीच्या आसमंतातील सर्व प्रदेश व ऐतिहासिक पौराणिक स्थळांचे विहंगम दृश्य सुंदर दिसते.

महाद्वारात जेजुरी नगरपालिकेचा यात्राकर वसुली कारकून असलेला असतो. देहुडीवाले प्रवाशांची चौकशी करतात. कर दिल्यावर देवळाच्या प्रांगणात प्रवेश मिळतो.

गडकिल्ल्यातील प्रांगणात प्रवेश केल्यावर डाव्या हातास म्हणजे पूर्व बाजूस ९ फूट उंचीचा शेंदूरचर्चित भव्य व भयंकर असा मणिदैत्याचा उभा दगडी पुतळा दिसतो. दैत्यासमोरच नंदीच्या चबुतऱ्यावर प्रसिद्ध गाडीबगाडाचा जीर्ण सांगाडा दिसतो.

नवस करणारे लोक पूर्वी त्या ठिकाणी खांबाला गळ बांधून तो पाठीत टोचून घेत आणि लोंबकळत लोंबकळत तेथे गाडीच्या चाकाप्रमाणे फिरत. रक्ताने ती भूमी लाल होऊन जाई. तो क्रूर प्रकार म्हणजे बगाड घेणे. सरकारने हे आता कायद्याने बंद केले आहे. त्या राक्षसी रूढीचे स्मारक मात्र तेथे उभे आहे.

याच प्रकारचे किळसवाणे प्रकार म्हणजे हाळावर चालणे, रखरखीत खैराच्या इंगळावरून चालणे आणि चंपाषष्ठीस वीर काढणे म्हणजे मांडीत सुरा खुपसून रक्तचर्चित मिरवणूक काढणे हे प्रकारही सरकारने कायद्याने बंद केले, ते छान झाले.

गाडीबगाडानंतर देवासमोरील अंगणातील भल्यामोठ्या पितळी कासवाचे दर्शन होते. भक्तांनी हे अति प्रचंड कासव पितळी पत्र्याने मढविले आहे.

कासवावरून समोरच म्हाळसाकांताच्या मुख्य मंदिरात प्रवेश करता येतो. दारातच डाव्या देहुडीत रखवालदारांची आयुधे लटकविलेली आहे. कोपऱ्यात कासवाच्या कातड्याची एक मोठी ढाल आणि खंडोबाचा प्रसिद्ध 'खंडा' ठेवलेला आहे. हा खंडा म्हणजे ४ फूट लांब, ४ इंच रुंद ४० शेर वजनाची एक जुनी तलवार ! याच खड्गाला मोठा इतिहास आहे.

फार पूर्वी दैत्यांनी पृथ्वी गांजली होती. तेव्हा सर्व लोक ब्रह्मदेवास शरण गेले. दैत्यांचा नाश करण्यास ब्रह्मदेव हिमालयात गेले. तेथे त्यांनी मोठा यज्ञ केला. तेव्हा यज्ञातून त्यांना हे कालखड्ग प्राप्त झाले. त्यांनी ते शंकराला दिले. शंकराने ते वीरभद्राला दिले. वीरभद्राने याच खड्गाने सर्व दैत्यांचा संहार केला आणि ते परत शंकराला दिले.

पांडवपुत्रांचा नाश अश्वत्थाम्याने या खड्गाने केला. मार्तंडभैरवाने याच खड्गाने मणिमल्लांचा वध केला. नंतर मल्हारीने हे खड्ग रामराव नावाच्या

बाणाईच्या मंदिराकडून वर जातो.

डाव्या बाजूच्या मुख्य रस्त्याने थोडे वर जाताच एक मोठा चबुतरा दिसतो. त्यावर पितापुत्रांची पावले कोरली आहेत. तेथील ऐतिहासिक घटना अविस्मरणीय आहे. ती घटना म्हणजे - इ.स. १६६२ मध्ये तेथे शहाजी आणि शिवाजी यांची भेट मोरगावच्या मोरया गोसाव्यांनी घडविली आहे. विजापूरच्या आदिलशहाने शिवाजीच्या पुंडाव्याला भिऊन शहाजीराजाला कैदेत टाकले होते; पण शिवाजीने दिल्ली दरबारकडून नाक दाबले तेव्हा शहाजीची सुटका झाली. बारा वर्षांनंतर पितापुत्रांची भेट जेजुरीला मोठ्या थाटात झाली. त्या वेळी दोघांनी खंडोबाचे दर्शन घेतले व तुपाच्या थाळीत प्रथम एकमेकांची तोंडे पाहिली. नंतर ते एकमेकांस भेटले. शिवाजीने शहाजीराजांना पालखीत बसविले. गड उतरेपर्यंत पित्याचे जोडे शिवाजीने घेतले होते. शिवाजीचा स्वराज्य-स्थापनेचा कारभार शहाजीस पसंत पडला.

या पवित्र उघड्या स्मारकाचे दर्शन घेतल्यांनतर हेगडी प्रधानाचे देऊळ उजव्या हातास लागते. त्या देवळात फक्त दोन उघड्या तपस्व्याप्रमाणे मूर्ती आहेत. नंतर वर गेल्यावर गणपती आणि नंतर महाद्वार लागते.

महाद्वाराजवळ मोठा नंदी आहे. जवळच मारुतीचे एक देऊळ आहे. श्रीसमर्थ रामदासांनी या मारुतीची स्थापना केली. नंदीच्या भोवती एक अडीच पायऱ्यांची खूण आहे. भक्तगण मुद्दाम जेजुरीची विशिष्ट खूण पाहून आनंद मानतो.

महाद्वाराजवळच उजव्या बाजूस एक विशेष स्मारक आहे; ते म्हणजे सव्वा लाखाचा भुंगा! असे सांगतात की, जेजुरीच्या उत्तरेस १५ मैलांवरील भुलेश्वराचा बीमोड करून औरंगजेबाचे सैन्य जेजुरीगडावर चाल करून आले. त्या हल्ल्यात गडाचा रखवालदार यशवंतराव ठार झाला, पण दार बंदच होते. मग यावनी सैन्य गडाचा तट फोडू लागले. तेव्हा या ठिकाणच्या एका छिद्रावाटे लाखो भुंगे बाहेर आले. भुंग्यांनी त्या हल्लेखोर अविंधांना खूप बेजार केले. सैन्य गडगडत गडाखाली गेले. पंचक्रोशीत त्यांचा पिच्छा त्या भुंग्यांनी पुरविला. औरंगजेबाने तोबा तोबा केला.

शेवटी औरंगजेब खंडोबा या जागृत देवस्थानाला शरण आला. त्याने कान पकडून माफी मागितली आणि हात बांधून देवाला सव्वालाख रुपये किमतीचे एक रत्न वाहिले. तेव्हा देवाने क्षमा केली!

त्या भुंग्याचे स्मारक आहे ते ! तेथे एक छिद्र दिसते व हत्तींच्या सोंडेसारखी एक सिंदूरचर्चित आकृत दिसते. त्या ठिकाणी भक्तांनी देवाला वाहिलेले लाकडी हातपायही पडलेले आहेत.

गडकिल्ल्याचा तो भव्य, सुंदर आणि मजबूत तट पाहून खरोखरच विलक्षण आदर वाटतो. तो तट दुरुस्त करण्यास होळकरांना अठ्ठावन्न लाख रुपये खर्च

आला आहे. त्या काळी की जेव्हा फक्त अर्धा आणा रोज मजुरी होती. या सर्व तटाला आतून सर्व बाजूंस मोठमोठ्या ओवऱ्या आहेत. ओवऱ्यांवर मजबूत व रुंद अशी भक्कम गच्ची आहे. त्या गच्चीवरून जेजुरीच्या आसमंतातील सर्व प्रदेश व ऐतिहासिक पौराणिक स्थळांचे विहंगम दृश्य सुंदर दिसते.

महाद्वारात जेजुरी नगरपालिकेचा यात्राकर वसुली कारकून असलेला असतो. देहुडीवाले प्रवाशांची चौकशी करतात. कर दिल्यावर देवळाच्या प्रांगणात प्रवेश मिळतो.

गडकिल्ल्यातील प्रांगणात प्रवेश केल्यावर डाव्या हातास म्हणजे पूर्व बाजूस ९ फूट उंचीचा शेंदूरचर्चित भव्य व भयंकर असा मणिदैत्याचा उभा दगडी पुतळा दिसतो. दैत्यासमोरच नंदीच्या चबुतऱ्यावर प्रसिद्ध गाडीबगाडाचा जीर्ण सांगाडा दिसतो.

नवस करणारे लोक पूर्वी त्या ठिकाणी खांबाला गळ बांधून तो पाठीत टोचून घेत आणि लोंबकळत लोंबकळत तेथे गाडीच्या चाकाप्रमाणे फिरत. रक्ताने ती भूमी लाल होऊन जाई. तो क्रूर प्रकार म्हणजे बगाड घेणे. सरकारने हे आता कायद्याने बंद केले आहे. त्या राक्षसी रूढीचे स्मारक मात्र तेथे उभे आहे.

याच प्रकारचे किळसवाणे प्रकार म्हणजे हाळावर चालणे, रखरखीत खैराच्या इंगळावरून चालणे आणि चंपाषष्ठीस वीर काढणे म्हणजे मांडीत सुरा खुपसून रक्तचर्चित मिरवणूक काढणे हे प्रकारही सरकारने कायद्याने बंद केले, ते छान झाले.

गाडीबगाडानंतर देवासमोरील अंगणातील भल्यामोठ्या पितळी कासवाचे दर्शन होते. भक्तांनी हे अति प्रचंड कासव पितळी पत्र्याने मढविले आहे.

कासवावरून समोरच म्हाळसाकांताच्या मुख्य मंदिरात प्रवेश करता येतो. दारातच डाव्या देहुडीत रखवालदारांची आयुधे लटकविलेली आहे. कोपऱ्यात कासवाच्या कातड्याची एक मोठी ढाल आणि खंडोबाचा प्रसिद्ध 'खंडा' ठेवलेला आहे. हा खंडा म्हणजे ४ फूट लांब, ४ इंच रुंद ४० शेर वजनाची एक जुनी तलवार ! याच खड्गाला मोठा इतिहास आहे.

फार पूर्वी दैत्यांनी पृथ्वी गांजली होती. तेव्हा सर्व लोक ब्रह्मदेवास शरण गेले. दैत्यांचा नाश करण्यास ब्रह्मदेव हिमालयात गेले. तेथे त्यांनी मोठा यज्ञ केला. तेव्हा यज्ञातून त्यांना हे कालखड्ग प्राप्त झाले. त्यांनी ते शंकराला दिले. शंकराने ते वीरभद्राला दिले. वीरभद्राने याच खड्गाने सर्व दैत्यांचा संहार केला आणि ते परत शंकराला दिले.

पांडवपुत्रांचा नाश अश्वत्थाम्याने या खड्गाने केला. मार्तंडभैरवाने याच खड्गाने मणिमल्लांचा वध केला. नंतर मल्हारीने हे खड्ग रामराव नावाच्या

धनगरास दिले. त्या रामरावाच्या मृत्यूनंतर हे खड्ग त्या देहुडीत ठेवण्यात आले.

सध्याचे लोक मात्र या खड्गाचे वाटेस जात नाहीत, कारण हे जड खड्ग एक तर उचलत नाही आणि सहज जर उचलले तर हातपायास इजाच होण्याचा संभव जास्त. एखाद्या बलवानाचा प्रश्न वेगळा.

मंदिरात प्रवेश करताच दोन्ही बाजूंना गडाचे दोन प्रचंड घोडे दिसतात. पैकी उजव्या घोड्यावर खंडोबाचा पुतळा आहे. डावा घोडा रिकामाच आहे. या रिकाम्या घोड्याचा मागेच देवाचा जामदारखाना आहे.

गर्भागारात समोरच्या सिंहासनावर म्हाळसाकांताची काळ्या पाषाणाची भव्य मूर्ती बसवलेली दिसते. शिंदेशाही पगडी, मोठा अंगरखा, हातात त्रिशूळ, तरवार आणि डाव्या हाताल एक वाटीसारखे नरकपालात आहे. या नरकपालात सोने टाकल्यास गयेला केलेल्या पिंड श्राद्धाचे पुण्य लाभते, असे म्हणतात.

मुख्य मूर्तीच्या दोन्ही बाजूंस दोन दगडी मूर्ती उभ्या आहेत. त्या म्हाळसा व बाणाईच्या मूर्ती आहेत. सिंहासनापुढेच आणखीही चार जोड पंचधातूंच्या, सोने-चांदीच्या मूर्तींचे उभे मांडले आहेत. या मूर्ती राजेरजवाड्यांनी अर्पण



केलेल्या आहेत. उदाहरणार्थ, चंदीचंदावरचा राजा, होळकर, पेशवे, शाहू महाराजांनी इत्यादी.

नारायणराव पेशव्यांच्या खुनानंतर त्यांच्या पत्नी गंगाबाई गरोदर होत्या.

त्यांना पुत्र व्हावा म्हणून नाना फडणविसांनी श्रीखंडोबास नवस केला होता. खंडेराय पावला. सवाई माधवराव पुण्याचे पेशवे झाले. नानांनी लाखाचा नवस फेडला, तो असा : पंचवीस हजारांच्या देवमूर्ती. बाकी खर्चात सर्व मूर्तींना सोन्याचे मुखवटे, लिंगाला कवच, छत्री आणि पूजेची उपकरणी, तसेच देवाची मंडपी व सिंहासन चांदीने मढविले.

देवपाटात सोन्याचा एक मोठा कुत्राही आहे. या मूर्तीच्या पुढेच मल्हारी व म्हाळसा यांची धनुष्याकृती दोन स्वयंभू लिंगे आहेत. तीच खरी देवपठाराहून गडावर आल्याची खूण आहे. जवळच बाणाईचे लिंग आणि गंगेचाही मुखवटा दिसतो.

या लिंगांना भक्तजन खोबरे, दवणा, बेल, भंडारा वाहतात. देवाचे दर्शन येथूनच घेतात. पुजारी महादक्षिणा मागत असतो. तेथेच उजवीकडे एक खोली आहे. ती फक्त महाशिवरात्रीसच उघडतात. कारण तेथे गुप्त मल्लिकेश्वराचे स्थान आहे.

मुख्य दर्शनानंतर देवळाबाहेर आल्यावर सभोवती आवारात म्हाळसेचे स्वतंत्र मंदिर, भंडारघर व उत्सवमूर्ती पंचलिंगाचे स्थान, भुलेश्वर, शिळा होऊन पडलेली प्रचंड महामारी (घृतमारी), गणपती, कडेपठार दर्शनाची खिडकी, तुळजाभवानी मंदिर, उमाजी नाईकाचा आखाडा आणि बारदारी (येथे दसरा-समारंभात नृत्यगायनाचा दरबार भरतो.) वगैरे अनेक देव-देवता आणि स्मारके पाहण्यास मिळतात.

ओवऱ्यांवरील गच्चीवर चढून गेल्यानंतर भोवतालचा सर्व आसमंत नितांत सुंदर दिसतो. उंचावरून रम्य देखावा दिसतो. तो पश्चिमेकडून क्रमाने असा : -

**१. पुरंदर किल्ला** - समुद्रसपाटीपेक्षा ४४७२ फूट उंचावर हा किल्ला आहे. त्याचा घेर चार मैलांचा आहे. याला इंद्रकीलगिरी हेही नाव आहे. बारभाईची कारस्थाने येथेच शिजली आणि सवाई माधवराव पेशव्यांचा जन्म येथेच झाला.

**२. सासवड** - हा पुरंदर तालुक्याचा मुख्य गाव आहे. येथे प्रसिद्ध संत सोपानदेवांची समाधी आहे. तेथे त्यांनी मिती वैशाख शुद्ध ११ शके १२१९ ला समाधी घेतली. दरसाल या वेळी तेथे मोठी यात्रा भरते.

**३. करा नदी** - बाबदेवघाट (ब्रह्मगिरी) येथे ही नदी उगम पावली आहे. ही नदी भीमाने ब्रह्मदेवाचा कमंडलू सोडल्यामुळे उत्पन्न झाली, अशी कथा आहे. कर हे त्या कमंडलूचे नाव होते, म्हणून कर जा - कऱ्हा असे हिचे नाव पडले. ती पूर्वेकडे वाहते. हिचे पाणी गंगेप्रमाणे निर्मळ व सतत वाहणारे आहे. ही तीर्थ आहे. जेजुरीच्या मार्तंड मल्हारीची उत्सवमूर्ती या नदीवर प्रत्येक सोमवती अमावास्येला स्नानास आणतात. पापनाशन तीर्थ, पांडुकेश्वर, रंभाई आणि

तुकाईची मंदिरे इ. स्थाने नदीकाठी आहेत. गडावरून या नदीचे सौंदर्य फारच बहारीचे दिसते

४. रेल्वेस्टेशन, मोरगाव, पुणे-पंढरपूर सडक इत्यादी पूर्वेकडील भागही दूरवर पाहण्याची मौज वाटते.

**५. जेजुरी गाव** - पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे किंवा प्रदर्शनात मांडलेल्या घराप्रमाणे सध्याचा जेजुरी गाव वरून दिसतो. होळकर तलाव व त्यातील पाणी, छत्रीमंदिर इत्यादी ठिकाणेही दिसतात.

यात्रेकरू लोक जेजुरीला तीन दिवस राहतात. सर्व विधी आटोपून शेवटी कडेपठारावर जातात. तेथील दर्शन झाल्यावरच यात्रा सफल संपूर्ण होते, अशी रूढी आहे.

कडेपठारावर जाण्यासाठी डोंगरावरून पाऊलवाट आहे. दोन मैलांचा चढ आहे. हा सर्व भाग होळकरांच्या मालकीचा आहे. डोंगरभागाचा देखावा रमणीय आहे, पण वर पाणी पुरेसे नाही!

कडेपठारावरील मुख्य मंदिरात मार्तंडभैरव आणि म्हाळसा, अन्नपूर्णा यांची दोन स्वयंभू लिंगे आहेत. गंगा आणि गणपतीही तेथे आहे. तेथील मुख्य मूर्ती गडावरील मूर्तीप्रमाणेच आहे. या देवळात अंधार असून देऊळ जीर्णावस्थेत आहे. येथे सर्व विधी गडावरील विधीप्रमाणेच करावा लागतो.

रामाचे, हनुमंताचे, दत्ताचे वगैरेंची छोटी मंदिरेही आहेत. पडकी धर्मशाळा आहे. पुजाऱ्यांची पाचसात घरे आहेत. बिचाऱ्यांचे पाण्याअभावी व उत्पन्नाअभावी फारच हाल आहेत.

गोविंदबाबा या सत्पुरुषाने कडेपठारावर शके १७४२ मध्ये मार्तंडविजय हा ग्रंथ लिहिला. त्याचे स्मारक तेथे आहे. त्यांचे शिष्य तेथे दत्तजयंती साजरी करतात.

भवानगीरबुवांचा मठ कडेपठारावर आहे. हे बाबा फारच प्रसिद्ध होते. प्रख्यात उमाजी नाईकाला या बाबांचा फार पाठिंबा होता. इंग्रजी पलटण दरोडेखोर उमाजीला पकडण्यास पठारावर आली, तेव्हा उमाजी कुत्रा बनून बुवांजवळ बसला होता, असे म्हणतात. तसेच बुवांच्या छोट्या घागरीत उमाजीचे पाच-सहाशे लोक पाणी पिऊन तहान भागवीत, अशी आख्यायिका आहे.

कडेपठारावरून पुन्हा गडावर उतरताना जनाईचे तीर्थ (जननी तीर्थ) लागते. फाल्गुनी अमावास्येला जेजुरीचे लोक तेथे येतात. लहान लहान वाफ्यांत सर्व प्रकारची धान्ये पेरतात. मग पाडव्याच्या दिवशी पुन्हा येऊन पाहतात. ज्या

धान्याचा मोड जोरदार फुललेला दिसेल ते पीक त्या वर्षी उत्तम येईल, असे म्हणतात. या प्रकाराला 'गुढ्या काढणे' हे नाव आहे. खंडोबाची आणि जनाईची कृपा ! धवलगिरीच्या लवथळेश्वराची कृपाच ती !

रस्त्यात सासू-सुनेच्या शिळा, सवतींच्या भांडणाचे ठिकाण, लवतीर्थ, घोडे उड्डाण वगैरे स्थळे लागतात. गडाच्या पश्चिम दरवाजाजवळ हिरव्यागार नेचे-शेवाळाची पण चांगल्या पाण्याची एक पायऱ्यांची बारव आहे. गडाच्या पश्चिम दरवाजापासून थेट होळकर तलावापर्यंत सुंदर दगडी पायऱ्या आहेत.

कडेपठारावरून गडाच्या पश्चिम दरवाजात येताच जेजुरी देवस्थानावर पडलेल्या प्रसिद्ध दरोड्याची आठवण येते. जेजुरीसारख्या अती श्रीमंत देवस्थानावर प्रत्यक्ष खंडोबाच्याच महान भक्ताने हल्ला केला होता.

इ. स. १८१८ नंतर इंग्रजी अमदानीत अहमदनगरच्या सुप्रसिद्ध कोळी डाकूने- राघू भांगरे याने- जेजुरीवरच घाड घातली. राघू भांगरे हा मल्हारी-मार्तंडाचा परमभक्त होता, पण तो श्रीमंताचा कर्दनकाळ आणि गरीबांचा दीनदयाळ होता. मल्हारीच्या कृपेने तो अनेक संकटांतून वाचला. इंग्रजी फौजेला त्याने जर्जर केले; पण जेजुरीच्या देवाची श्रीमंती लुटून गरीब भक्तांना वाटण्याचे त्याच्या मनाने घेतले. त्याने एके दिवशी जेजुरीच्या खंडोबाचा रामदेवराव यादवांपासून होळकरांपर्यंत राजेरजवाड्यांनी दिलेला श्रीमंती ऐवज पार लुटला. देव धुऊनपुसून निर्मळ केला.

पण त्याच्या साथीदारांना तो अवजड ऐवज झेपला नाही. सोन्याचांदीच्या जीवघेऊ जड मूर्ती त्या पहेलवानांना पेलेनात; म्हणून त्यांनी त्या मूर्ती ठिकठिकाणी रानावनात पुरून ठेवल्या.

बारा वर्षांनी पुढे बेलसरच्या शेतकऱ्याला म्हाळसादेवीची श्रीमूर्ती शेतात नांगरताना सापडली. जेजुरीकरांनी नंतर ती मूर्ती मोठ्या थाटाने आणली व पुन्हा जागेवर तिची प्रतिष्ठापना केली. आणखीही काही ऐवज परत मिळाला; पण त्या वेळी तो अलमगीराचा सव्वा लाखाचा भुंगा मात्र उडून गेला.

सुप्रसिद्ध स्वातंत्र्य-भक्त उमाजी नाईक रामोशी हा तर जेजुरी-पुरंदरच्या डोंगरांतच राहात होता; पण त्याने कधीच आपल्या मल्हारी देवाकडे वाकड्या नजरेने पाहिले नाही. त्याने १८२७ मध्ये इंग्रजांविरुद्ध बंड केले. कॅप्टन मॅकिंटॉश याला त्याने मल्हारीकृपेने सळो की पळो केले; पण शेवटी बहिणीने दगा दिला आणि सन १८३२ मध्ये इंग्रजांनी त्याला फाशी दिले. वीर उमाजीसारखा खंडोबाचा अमोल हिरा इंग्रज दरोडेखोरांनी जेजुरीलाच लुटून नेला.

ता. २७ जुलै १९४४ रोजी काही साळसूद दरोडेखोर जेजुरी गडाच्या पश्चिम दरवाजाने देवस्थानात शिरले आणि त्यांनी मालोजीराजापासून पेशव्यांच्या अखेरपर्यंतचा सर्व माल पुजाऱ्यापासून हिसकावून नेला. या दरोड्याचा पुढे सर्व तपास लागला आणि मल्हारी मार्तंडाचे देवस्थान अद्यापही जागृत आहे हे सिद्ध झाले.

कडेपठार चढून जाताना प्रवासी व भक्तगण थकून जातो. त्याचा थकवा वर गेल्यावर तेथील काही जुने माहितगार पुजारी गोष्टी सांगून नाहीसा करतात. देवाच्या अनेक गोष्टी आहेत. पैकी वाघ्या-मुरळीची कथा मनोरंजक आहे.. वाघ्या-मुरळीची काही गाणीही महाराष्ट्राच्या मुखात आहेत.

नळदुर्गास चंदन वृक्षाखाली धनगराजवळ मेंढी मागण्यास आलेले वाघ मार्तंडभैरवाने भंडारा टाकून वाघे (वग्गे) भक्त केले पूर्वजन्मीच्या चंपूनगरच्या राजांना व सरदारांना वाघ्यांचाच जन्म मिळाला होता. खंडोबाने त्यांचा उद्धार केला. मानवरूप प्राप्त झाल्यावर ते सर्व वाघे बनून देवाच्या गुणगानात व सेवेत आयुष्य घालवू लागले. तीच प्रथा पुढे चालू झाली.

काही लोक आपली मुलेच खंडोबाला वाहू लागले. त्या मुलांनी देवाच्या सेवेतच आयुष्य घालवायचे. मुलांपैकी मुलगे वाघे व मुली मुरळ्या बनत!

वाहिलेल्या मुलींची लग्ने अमावास्या आणि पौर्णिमेच्या मुहूर्तावर खंडोबाच्या मूर्तीशी लागायची; मग ती वाघ्याबरोबर फिरून देवाचे गुणगान करी. आरती, पूजा, देवाची सेवा, चावरी वावरणे आणि नाच यातच तिचे आयुष्य जायचे. वाघ्या-मुरळीचा नाच लोकांना फारच आवडे. या रूढीपासून अनाचार वाढू लागला म्हणून सरकारने कायद्याने बंदी केली आहे. त्यांचे नाच आता लोक विसरत चालले आहेत.

मुरळी म्हणजे मुरलीचा अवतार ! असे सांगतात की, बाणाईच्या विवाहापूर्वी बाणाईच्या वडिलांच्या घरी कृष्ण आपली मुरली विसरला. रात्री मुरलीने बाणाईस संदेश दिला की, कृष्ण मुरासुराला मारणार आहे. तेव्हा बाणाबाई रागावली. तिने मुरलीला शाप दिला की, माझ्या नवऱ्याच्या अंगणात तू नाचत राहशील. त्याप्रमाणे बाणाईचा विवाह मल्हाराशी झाल्यावर मुरली ही मुरळी बनली व जन्मभर नाचली. तीच प्रथा पुढे चालली. कृष्णाची मुरली पूर्वजन्मीची इंद्राच्या दरबारातील तिलोत्तमा नावाची अतिसुंदर अप्सरा होती. तिला एकदा गर्व झाला. तेव्हा तिला इंद्राने शाप दिला आणि मग ती कृष्णाच्या हाती वंशवाद्य मुरली बनली होती. पुढे तीच मुरळी बनली.

इंद्राच्या दरबारातील रंभा नावाची अप्सरा ही मार्तंड भैरवाच्या जीवनात

येऊन गेली म्हणतात. समुद्रमंथनात रंभा ही श्रेष्ठ देवांगना निघाली. तिचे मन महादेवावर होते; पण ती इंद्राच्या वाट्याला गेली. ती झुरत होती. नारदाच्या सांगण्यावरून तिने तप केले. मग मार्तंडभैरव अवतारात तिची इच्छा पूर्ण केली. मुरळीमध्ये रंभेचाही थोडा अंश होताच, असे सांगतात.

भैरवाची जी अनेक ठिकाणे आहेत; त्यांपैकी काशीचा काळभैरव आणि जेजुरीचा मार्तंडभैरव ही फारच प्रसिद्ध आहेत. गावोगाव भैरवाच्या यात्रा, उत्सव-समारंभ दरसाल होत असतात, पण जेजुरीच्या मार्तंड भैरवाचे उत्सव-समारंभ फारच मोठ्या प्रमाणात आणि थाटाने पार पाडले जातात. त्यांपैकी -

**चैत्री पौर्णिमा** - या दिवशी शंकराने मणिमल्लासुराचा वध करण्यासाठी मार्तंड भैरवाचा अवतार धारण केला, म्हणून त्या प्रसगांचे स्मरण सतत राहावे, या उद्देशाने मोठा उत्सव करतात.

**श्रावणी पौर्णिमा** - नळदुर्ग येथे मल्हारीचा विवाह बाणाईशी झाला. त्या प्रसंगाची आठवण या उत्सवामुळे होते. नळदुर्ग जिल्ह्यात धाराशीव येथेही जेजुरीप्रमाणेच मोठा उत्सव होतो.

**पौषी पौर्णिमा** - पाली जिल्ह्यात सातारा येथे मल्हारी व म्हाळसा यांचा विवाह या दिवशी झाला होता. म्हणून हा उत्सव जेजुरी, नेवासे आणि पाली याप्रमाणेच पुष्कळ ठिकाणी साजरा होतो.

**माघी पौर्णिमा** - या दिवशी नेवासे येथे जसा मोहिनी अवतार घेतला, त्याचप्रमाणे पुढे याच दिवशी तेथे परमभक्त तीरसेठ वाणी यांच्या घरी श्रीमहालया-म्हाळसा हिचा जन्म झाला होता. म्हाळसेचा जन्मदिवस म्हणून हा उत्सव जेजुरीसही मोठ्या थाटाने करतात.

**चंपाषष्ठी** - जेजुरीचा हा सर्वांत महत्त्वाचा व मोठा उत्सव आहे. या उत्सवासाठी देशाच्या कोनाकोपऱ्यांतून लाखो लोक जेजुरीस येतात. फारच थाटाचा हा उत्सव होतो. या दिवशी मल्हारीमार्तंडाने भक्तांच्या विनंतीवरून प्रथमच जयाद्रीवर लिंगरूपाने वास्तव्य केले होते. मणिमल्लासुराच्या पापतापातून वाचलेल्या देवमानवांनी याच वेळी प्रथम उत्सव आनंदाने केला होता.

मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेस खंडोबाचे घट बसवितात. माळ, दीप, फुलोरा, पूजा, आरती इत्यादी प्रकारे नेमेकरून सहा दिवस हा उत्सव देशात घरोघर साजरा होतो. चंपाषष्ठीस कुलधर्म - कुलाचार करून खंडोबाला नैवेद्य अर्पण करतात. दिवटी-बुधली घेऊन लोक जेजुरीस दर्शनाला जातात. याच दिवशी खंडोबाला कांदा, वांगे अर्पण करून मग भरीत रोडगा खातात व चातुर्मासाची

समाप्ती होते.

खंडोबाच्या पंचरात्रात पंचमीच्या दिवशी तैलोत्सव होतो. जेजुरीत गडावरून तेलाचा मोठा हंडा गावातील चावडीत थाटाने वाजतगाजत आणतात. तेथे भक्तगण यथाशक्ती तेल त्या हंड्यात ओततात. मग हा हंडा पुन्हा गडावर जातो. हे तेल मग देवाला देतात. तेलाचे स्नान घालणे हा महत्त्वाचा समारंभ होतो.

षष्ठीच्या दिवशी यात्रा भरते. सकाळपासून चोवीस तास हा उत्सव-समारंभ होतो. देवदर्शन, पालखी मिरविणे, शोभेचे भव्य दारूकाम, कुस्त्या वगैरे खूपच धामधुमीचे व गर्दीचे कार्यक्रम जेजुरीस फारच मोठ्या प्रमाणात होतात.

गडावर पुरणपोळी, कांदा, भरीत, रोडगा यांचाच नैवेद्य फक्त देवाला जातो. मेंढी अर्पण करण्याचा विधी अगर तो नैवेद्य फक्त बाणाईपर्यंतच जातो. गडावर मांसाहार वर्ज्य आहे. बळीची प्रथा अलीकडे बंद होत आहे. अघोरी समारंभ बंद होत आहेत.

**हिंदोळाव्रत** - चैत्र शुद्ध तृतीयेपासून (गौरीतीज) वैशाख शुद्ध तृतीपर्यंत (अक्षय्य तृतीया) एक महिनाभर हे व्रत पाळतात. काही लोक थाटाचा हिंदोळा बनवून त्यात म्हाळसा-मल्हारी देवांना बसवितात. पूजाअर्चा, गाणी, नैवेद्य इत्यादी थाट करतात. हा एक प्रकारचा वसंतोत्सवच होय.

**दसरा**- या थाटाच्या व महत्त्वाच्या उत्सवासाठी सर्व लोक नवे कपडे घालून गडावर जमतात. देवदर्शन व सोने-अर्पणादी विधी खूप गर्दीने होतो. रात्री थाटाने पालखी निघते. सारा गड आणि कडेपठाराचा डोंगरभाग माणसांनी गजबजून जातो. भंडारा आणि खोबरे यांची खूपच खैरात होते. गडावरील आणि कडेपठारावरील अशा दोन्ही पालख्यांची भेट रमण्यात होते. तेथे शोभेचे दारूकाम होते. रात्रभर लोक जागरण करतात. नवरात्र दरबारात गडावर उत्सवमूर्तीपुढे कोल्हाटी, गोंधळी, घाडशी, वाघ्यामुरळी वगैरेंचे नाचगायन होते. खूपच मौज असते. सकाळी पालख्या स्वस्थानी जातात. मग तेथे मानकऱ्यांना रोजमुरा होतो. भंडाऱ्यात धान्य वाटतात. या रोजमुऱ्यामुळे खूप बरकत येते म्हणतात ! श्रीखंडोबाचा हा कृपाप्रसादच! विजयादशीचा हा जयच होय! खंडोबा हे वीरदैवत आहे. क्षत्रियांचा तो कुलस्वामीच होय. स्वारीस निघताना सर्व प्रथम त्याची आराधना करीत.

**सोमवती उत्सव** - सोमवारी अमावास्या आली, की हा उत्सव करतात. गडावरून उत्सवमूर्ती पालखीतून निघते. मिरवत मिरवत दीड मैलावर कऱ्हा नदीत स्नानास जाते. तेथे खूप थाटाने स्नान-समारंभ होतो. नंतर पालखी परत

गडावर येते. खूप लोक जमतात.

**इतर उत्सव व समारंभ -** वेळोवेळी यात्रेकरू येतात. ते यथाशक्ती पूजाअर्चा, भेट-धूळ, मेंढीअर्पणविधी, जागरण, दहिभातलेपन (दध्योदन) वगैरे विधी करतात. मात्र सर्वजण दिवटी-बुधली व भंडारखोबरे यांसह तळी भरण्याचा विधी करतातच. 'सदानंदाचा येळकोट' हे जेजुरीचे वैशिष्ट्यच होय.

**श्रीमंत होळकरांची व्यवस्था -** जेजुरीच्या देवस्थानचे सर्व उत्सवसमारंभ आणि रोजची नित्यपूजा, नैवेद्य इत्यादी व्यवस्था होळकर यांच्याकडेच फार पूर्वीपासून आहे. त्यांना मदत म्हणून संस्थान पंचकमिटी व नगरपालिकाही व्यवस्थेत भाग घेतात.

होळकरांचे खंडोबा हेच कुलदैवत असल्यामुळे त्यांनी जेजुरीच्या देवास लाखो रुपये अर्पण केले. पुण्यश्लोक साध्वी अहिल्याबाईंनी भारतभर लोकोपयोगी पुण्यकृत्ये केली. मग जेजुरी तर देवांची राजधानी. येथे त्यांनी कितीतरी थोर कामे करून ठेवली आहेत. इ. स. १७३५ ते १७९५ या त्यांच्या आयुष्य काळात त्यांनी फारच महत्त्वाची कामे जेजुरीला केली. देवी अहिल्याबाईंचा संगमरवरी पुतळा येथे होळकरवाड्यात दर्शनी भागातच आहे. अहिल्याराणीचा पुण्यतिथी-समारंभ श्रावणी अमावास्येस दरसाल गंभीरतेने व आदराने साजरा होतो. धन्य ती भारतकन्या!

जेजुरी येथे होळकरांची सुमारे दोन कोटींची मालमत्ता आहे. जुन्या काळात चार लाख रुपये खर्चून होळकरांनी जेजुरीला गौतमेश्वराचे सुंदर व भव्य देऊळ बांधले. तेथील बांधकाम फारच अप्रतिम आहे. देवळात प्रतिध्वनीची गंमत साधली आहे. बाहेरचा फार मोठा आणि अतिसुंदर नंदी पाहून सर्वजण थक्कच होतात.


श्रीमंत मल्हारराव होळकर आणि त्यांच्या राण्या यांच्या सुंदर संगमरवरी भारी किमतीच्या मूर्ती छत्रीमंदिरात आहेत. छत्रीमंदिरामागे भव्य असा सतत पाणी टिकणारा सुंदर अष्टकोनी होळकर तलाव आहे. १५ एकर २९ गुंठे क्षेत्राच्या जागेवर १८ लाख रुपये खर्चून होळकरांनी जेजुरीला हे जीवनदान दिले आहे. होळकर-वाड्यातील कारभारी या सर्व मालमत्तेची नीट देखरेख करतो. देवाच्या नित्यपूजा, नैवेद्यासाठी व उत्सवासाठी दरसाल १२ ते १४ हजार खर्च येतो, पण अलीकडे विलीनीकरण वगैरेमुळे सर्वत्र औदासीन्य पसरलेले दिसते.

जेजुरीचा मल्हारीमार्तंड हे जागृत आणि कडक दैवत आहे. तो देव नवसाला पावतो; अशी भाविकांची गाढ श्रद्धा आहे. या खंडोबाच्या दर्शनासाठी आजही लाखो लोक येत असतात. आज तेथील दर्शनविधी केवळ औपचारिक

उरलेला दिसतो; परंतु पूर्वीच्या ऐतिहासिक काळी आणि पौराणिक काळी तर या देवाने केलेले व दाखविलेले विशेष चमत्कार पाहून सर्वांना आश्चर्याबरोबर आदरही वाटत असे, अशा या मैराळदेवास फार श्रेष्ठ मानीत.

संतश्रेष्ठ तुकोबारायांनी पंढरी व जेजुरी यांची तुलनाच एका अभंगात केली आहे. तो अभंग असा :-

"पंढरीसी राही रखुमाबाई - येथे म्हाळसा बाणाई ॥
तेथे विटेवरी उभा - येथे घोड्यावरी शोभा ।
तेथे पुंडलिक निधान - येथे हेगडी प्रधान ।
तेथे बुक्याचे देणे - येथे भंडार भूषणे ।
तेथे वाहे चंद्रभागा - येथे जटी वाहे गंगा ।
तेथे मृदंग वीणा टाळ - येथे वाघ्या-मुरळ्यांचा घोळ ॥"




**जेजुरी येथील श्रीखंडोबाचे मंदिर**

श्रीसमर्थरामदासांनी जेजुरीस भेट देऊन गडावर मारुतीची स्थापना केली आणि श्रीखंडोबाची आरती रचिली. ती आरती अखिल महाराष्ट्राच्या मुखी आहे. ती आरती अशी -

"जयदेव जयदेव जय शिव मल्हारी । हो राया मल्हारी
वारी दुर्जन असुरा भव दुस्तर तारी ॥धृ०॥

पंचानन हयवाहन सुरं भूषणलीला
खंडामंडित दंडित दानव अवलीळा
मणिमल्ल मर्दूनिया शिर धूसर पिवळा
हीरे कंकण बाशिंग सुमनांच्या माळा ॥१॥

सुरवर, सत्त्वर वर दे मजलागी देवा
नाना नामें गाइन तुमची ही सेवा
अघटित गुण गावया वाटतसे हेवा
फणिवर शिणला तेथे नरपामर केवा ॥२॥

रघुवर नामस्मरणी शंकर हृदयी नीवाला
तो हा मल्लांतक अवतार झाला
यालागी आवडी भावे वर्णीला । हो भक्ति वर्णीला
रामी रामदासा जिवलग भेटला ॥३॥

जेजुरीच्या खंडोबाला येणाऱ्या लोकांना आणि मराठी खेड्यापाड्यांतील लोकांना वाघ्या-मुरळीची गाणी ऐकायला मिळतात, त्यांपैकी काही प्रसिद्ध गाणी अशी आहेत -

१. या बाई जेजुरी नगरात-कोऱ्या चंदनी महालात .........
   राजा मल्हारी नांदत-म्हाळसा बाणाई भांडत ........ इत्यादी
२. देवा तुझी सोन्याची जेजुरी
   गडाला नऊलाख पायरी....... इत्यादी
३. काहो गांजिता मला भावजी हिशेब देते तुम्हांला ।
   जवळ रुपये होते सोळा-तुमच्या आईचा गेला डोळा
   त्यात एक रुपया खरचला ......इत्यादी.
४. माझा मल्हारी भरदार । पाय त्याचे चुरणार । .........इत्यादी
५. जागरणाला या हो देवा, जागरणाला या खंडोबा ......इत्यादी
६. वाघ्या मुरळी नाचती । बानुबाई कवड्या वेचीती ..... इत्यादी
७. राळ्याभाताचे कांडण, सवती-सवतीचे भांडण
   दोघी मुरळी झुंजती, ऐकून मल्हारी हासती
   का तू भुललीस देवाला, जा तू आपुल्या देशाला
   झाकल्या पाठीनं म्हणती जाई, तोंड उतरून टाकी बाणाई

८. तू वाण्याची हायेस, म्हणून करशी पडिमार
आम्ही धनगरणी, जशा नागिणी, मोठ्या शिरजोर
तुझ्या देवानं आमच्या घरी वळली मेंढरं खिल्लारं
लेंड्या लोकर कन्या मिसळी तुझाच भरतार.....
आईक मी सांगते तुजला, चित्त दे माझ्या बोलाला
इक्त ऐकून बाणाईला राग आला फार ऽऽ
रती मातर तुमच्या घरी नाही इच्यार.......' इत्यादी

९. मल्लारी मार्तंडाबद्दल एकनाथांनीही एक पद वारीसंबंधी तयार केलेले आहे. 'वारी द्या हो वारी - देई गा मल्हारी......' इत्यादी.

एकंदरीत जेजुरी दर्शनास आलेल्या सर्वच प्रवाशांना व यात्रेकरूंना भाविकतेबरोबरच निसर्गशोभा आणि लोककथा व लोकगीते यांची भरपूर मेजवानी मिळते. स्मारके आणि कथा यांचा जेजुरी म्हणजे महाराष्ट्राचा मोठा भंडारखाना आहे. पुराणाची बैठक, इतिहासाची झालर, सृष्टिसौन्दर्याची रंगत, भाविकतेची मखमल आणि कथाकाव्याचे तकिए, लोड अशा मराठी थाटाचा भव्य दरबार जेजुरीच्या खंडेरायाचा आहे.

मुरळीच्या गाण्यांचा व नाचण्याचा प्रकार आता लोप पावला आहे. मुरळीच्या कथेवरून प्रत्यक्ष श्रीकृष्णाचीही कथा आठवते. श्रीकृष्ण एकदा कुत्रा झाला होता. त्याला जेजुरीच्या जाज्वल्य खंडोबाच्या दर्शनासाठी यावे लागले होते. म्हणजे काय झाले की, चंपाषष्ठीचे नवरात्र होते. मल्हारी मैराळ घटी बसले होते. गोकुळात यशोदा खंडोबाची पूजा करीत होती, बाळकृष्ण तेथे आला. त्याने आईला दूध पिण्यास मागितले',पण यशोदा म्हणाली, "हे नैवेद्याचे दूध ! मार्तंडभैरव हे आपले कुलदैवत ! त्यांचे हे दूध आहे. हे देवालाच द्यायचे. तुला नाही मिळणार हे दूध!"

तेच दूध मला पाहिजे, असा कृष्णाने हट्टच घेतला. तेव्हा यशोदा म्हणाली, "अशाने देव रागावेल बरे ! तो फार कडक देव आहे."

कृष्णाला खूप राग आला. तो म्हणाला, "असा कसा हा देव. सोनाराने तर याला घडविला आहे. हा कसले दूध पिणार ! तो कसला माझ्यावर रागावणार ! मीच त्याच्यापेक्षा श्रेष्ठ आहे! तो मला काय करणार?" कृष्णाने देव उचलून अंगणात फेकला. इतक्यात काय चमत्कार झाला! कृष्ण लगेच कुत्रा झाला. खंडोबाने कृष्णाला कुत्रा बनविला. तो भुंकत भुंकत दूर पळून गेला. यशोदा टाहो फोडू लागली. अवघे गोकुळ व्याकुळ झाले. सर्वत्र धावपळ चालली. शेवटी बलरामाने कृष्णकुत्र्याला धरून आणले. साखळदंडाने तो कृष्णकुत्रा बांधून

ठेवला.

रागावलेला मल्हारी लोकांची प्रार्थना ऐकेचना! कुत्रा पुन्हा कृष्ण होईना. शेवटी नारद आले. नंदाचा रथ घेऊन ते नळदुर्गाला निघाले. तेथील कपिलमुनींना आणून मंत्रतंत्र करून पुन्हा कुत्र्याला कृष्ण करणार होते ते!

रस्त्यात जेजुरी लागली. गडाचा थाट नारदाने पाहिला. तेथे एका वाघ्याकडून त्यांनी भंडार घेतला. वाघ्या म्हणाला, "हा भंडार देवाचा आहे. तो कुत्र्यावर टाका, त्याचा पुन्हा कृष्ण होईल. जा लवकर परत!" याच हरिद्राने इंद्रालाही पाशातून सोडविले होते. आश्चर्याची गोष्ट अशी की, नारदाने तो भंडार (हरिद्राचूर्ण) कुत्र्यावर टाकताच त्याचा पुन्हा कृष्ण झाला. सर्वांना आनंद झाला. गळ्यात साखळदंड पाहून कृष्णाला सर्व प्रकार समजून आला. तो खंडोबाला शरण आला.

नंतर सारे गोकुळ जेजुरी यात्रेस गेले. मैराळाचे दर्शन घेऊन सर्वजण धन्य झाले. कृष्णाची जेजुरीला भेट झाली, हे पाहून खंडोबाही संतुष्ट झाले. त्या भेटीमुळे कुत्र्याचेही महत्त्व वाढले. या कृष्णकथेप्रमाणेच खंडोबाच्या चमत्काराच्या आणखीही कितीतरी गोष्टी आहेत.

जेजुरीत रात्रंदिवस हीच घोषणा दुमदुमलेली असते. सदानंदाचा येळकोट (इळा म्हणजे पृथ्वी+ कोट म्हणजेच पूर्णपात्र) सर्वांना ताट भरून वाढा. पूर्णपात्र द्या म्हणजेच पृथ्वी विपुल अन्नाने भरलेली असू द्या. सदानंद सर्वत्र भरून उरले ! जेजुरी येथे अन्नपूर्णेचा वास आहे. तेथे अन्नाची विपुलता आहे. देव सर्वांना भरपूर अन्न देईल, हाच या घोषणेचा अर्थ आहे. भंडार-खोबऱ्याची तळी भरताना हाच मंत्र त्रिवार उच्चारतात. तळी भरून ही घोषणा केली, की दर्शनाची सांगता झाली, असे म्हणतात.

धर्मपुत्र लवमुनींच्या या समृद्ध तपोभूमीत यज्ञयाग इ. कर्मे पूर्वी चालत. आजही येथे यज्ञाची आवश्यकता आहे. केवळ भिक्षेवर पोट चालणे, आता तेथे कठीण आहे ! केवळ पौराणिक अथवा ऐतिहासिक गोष्टी वा स्मारके यांनी हल्लीचे जीवन सुधारणार नाही. तेथे कष्ट, सेवा, त्याग, सहकार्य, ज्ञान आणि अर्थ यांचीच फार जरूर आहे. त्या दृष्टीने लवकरच सर्वांचे सगळीकडून प्रयत्न होतील आणि तेथील सर्व लोक सदा आनंदी राहतील, अशी व्यवस्था श्रीखंडेराय करील. लोकांनी स्वतः केलेले प्रयत्न पाहूनच गडावरचा देव खूष होईल, तोवर तो शांत बसलेलाच राहणार.

**जेजुरीला जाण्याचा मार्ग** - पुणे, सातारा रोडवर पुणे - पंढरपूर एस. टी. ने पुण्याहून ३२ मैलांवर जेजुरी आहे. दक्षिण रेल्वेने पुणे-मिरज रस्त्याने जाताना

जेजुरी स्टेशन लागते. स्टेशनपासून गाव फक्त १ मैलावर आहे. महाराष्ट्रात इतर सर्व ठिकाणांहून जेजुरीस येण्याचे सुलभ मार्ग आहेत.

**हरिद्राचूर्ण (भंडारा)** - जेजुरीला भंडाऱ्याचे फारच महत्त्व आहे. कपाळाला, देवावर, कपड्यावर, अंगणात सर्वत्र भंडारा भरपूर आहे. नवख्या माणसाला नवलच वाटते ते पाहून ! पण (भंडारा) ही फारच उत्तम गुणकारी औषधी वल्ली आहे. त्या चूर्णाचे उपयोग वैद्य चांगलेच जाणतात. स्वयंपाकघरात हळद ही फार आवश्यक चीज ठरली आहे.

हळदीच्या उत्पत्तीची एक छोटी कथाही उपलब्ध आहे. एकदा मणिमल्लांच्या भीतीने विष्णूची महायोगनिद्रा पाताळात पाषाणात लपली होती. तिच्या अभावामुळे देव अस्वस्थच झाले; मग ब्रह्मदेव पळसवृक्ष बनले. विष्णू पिंपळ बनले आणि महेश वट बनले. त्यांनी मुळांनी पाषाणाचे भेद केले.

विष्णूच्या खाली शिळेतून स्फोट झाला. विष्णू घाबरून पळाला. शिळेतून एक पिवळा अंकुर बाहेर आला. त्रिपुरादेवी शिळा होती, तिने त्या अंकुरास जन्म दिला. त्रिपुरे जी होती ती सुवर्ण, ताम्र आणि लोह यांची होती. अंतराळात अधांतरी होती. त्रिपुरासुराचा वध एकाच बाणाने झाल्यावर त्या नगरी वितळल्या. पाषाण बनल्या. त्याच त्रिधातूच्या शिळेतून हा पिवळा अंकुर जन्मला. हरीला द्रा म्हणजे पळविणारी म्हणून ती हरिद्रा बनली. त्या अंकुराची गाठ फारच औषधी ठरली. त्या सर्वनाशक हरिद्रा चूर्णाचे विधियुक्त ग्रहण देवांनी केले. योगनिद्रा परत लाभली. स्वास्थ्य मिळाले.

याच हरिद्राचूर्णाने- भंडाऱ्याने - कुत्र्याचा कृष्ण बनला. इंद्राचा शिवपाश तुटला. वाघांचा वाघ्या झाला इ. चमत्कार झाले; पण यातील तत्त्व संशोधकांनी जाणले पाहिजे. आज भाविक लोक केवळ श्रद्धेने भंडारा धारण करतात एवढेच.

मल्हारीमार्तंडभैरवाची आठ ठिकाणे पवित्र मानली आहेत. त्या ठिकाणी उत्सव होत असतो. **१. प्रेमपूर** - दक्षिण रेल्वेच्या देवरगुड्ड स्टेशनहून १ मैलावर, **२. नळदुर्ग** - सोलापुराहून २६ मैलांवर, **३. पाली** - उत्तर सातारा जिल्हा, **४. जेजुरी** - मार्तंडाची प्रिय राजधानी, **५. निंबगाव** - खेड तालुक्यात भीमातीरी, **६. शेगुड, ७. मंगसूळ, ८. साताळे.**

मार्तंड-पंचायतनांमध्ये गंगा म्हाळसायुक्त मल्हारीची मूर्ती असून ईशान्येस हेगडीप्रधान, आग्नेयेस गणपती, नैर्ऋत्येला पंचलिंग आणि वायव्येला अन्नपूर्णा आहेत.

महादेवाची मुक्ती देणारी पाच लिंगे प्रसिद्ध आहेत :

**१. नीलाद्री** - गौतमीच्या पाण्यात स्नान केल्याने मुक्ती **२. काशी** -

राहिल्याने **३. मातापूर** - केवळ दर्शनाने, **४. हरिद्वार** - तीन महिने राहिल्याने. **५. जेजुरी** - तीन दिवस राहिल्याने मुक्ती मिळते. जेजुरीतील गडावरच्या पंचलिंग महादेवाच्या फक्त दर्शनाने वरील पाचही लिंगांच्या दर्शनाचे फळ मिळते.

जेजुरीत अष्टतीर्थे पुढील आहेत - १) मल्लारी भैरव २) लक्ष्मीतीर्थ ३) जनाईतीर्थ ४) लवतीर्थ ५) तापशमनतीर्थ (शंकरेश्वर-साकुर्डी येथे) ६) पापनाशनतीर्थ (कऱ्हा नदीत) ७) नागतीर्थ ८) गणपतितीर्थ (मोरगावी).

**दवणा** - पूर्वी दवणा नावाचा रुद्रगण होता. शंकरांनी त्याचा उद्धार केला व वर दिला. तो औषधी सुगंधी वनस्पती बनला. खंडोबाला दवणा फारच प्रिय झाला.

**शंकराची रूपे** - १) गुप्त मल्लेश्वर - बाणेचा पती, २. मार्तंडभैरव - म्हाळसेचा पती, ३. भुवनेश्वर - गंगेचा पती, ४. पंचलिंगेश्वर - रेणुकेचा पती.

**विशेष गोष्टी** : १. प्रतिज्ञा करताना मराठेवीर खंडोबाचा बेलभंडार उचलीत. २. जेजुरीला श्राद्ध, उपवास, मुंडन इ. क्रिया नाहीत; कारण ती देवाची राजधानी व मंगलाचे माहेर आहे. ३. रविवार हा खंडोबाचा वार आहे. ४. जेजुरीभोवती संत्री, मोसंबी, अंजीर इत्यादी फळे होतात. ५. यात्रेकरू मुंग्यांना भंडारयुक्त साखर घालतात.

चार वेदांपैकी सामवेद एकदा गात होता. त्याचे 'हाऊ हाऊ' हे उच्चार ऐकून कृष्ण त्याला 'हाड हाड' असे म्हणाला. कृष्णाने आपणाला कुत्रा समजून चिडविले, हे पाहून सामवेदाने याला 'तू कुत्रा होशील, असा शाप दिला त्याप्रमाणे पुढे कृष्ण कुत्रा झाला. आपली फजिती झाली म्हणून कृष्णाने सामवेदाला पुढे खराच कुत्रा केले. मग सामवेद शंकराकडे गाऱ्हाणे घेऊन गेला. शंकराने त्याला अभय दिले. शांत केले. नंतर मल्हारीमार्तंड अवताराच्या वेळी त्या कुत्र्याला शंकराने मानाचे स्थान दिले.

तो कुत्रा मरण पावल्यावर त्याचे सहा भाग झाले. ते देवांनी वाटून घेतले. त्यापैकी देवांचे वैद्य अश्विनीकुमार यांनी दात घेतले. त्यापासून रसायन (रसाने-लसूण) बनविले, आणि कातड्यासह वृषण हे कंदस्थान इंद्राने घेतले. लसूण आणि कांदा या वनस्पती त्याच अवयवांच्या अवशेषांपासून देवांच्या वैद्यांनी बनविल्या. या दोन्हीही वनस्पती औषधिगुणात श्रेष्ठ ठरवल्या. मल्हारी मार्तंडाला त्यामुळे लसूण आणि कांदा फार प्रिय वस्तू झाल्या. त्याच्या रोगहारक व उत्तेजन गुणांचा उपयोग खंडोबाने फारच केला. जगाला या वस्तू त्यानेच दिल्या. त्या निषिद्धशा वस्तूंना खंडोबाने मान दिला.

अशी ही जेजुरी क्षेत्राची माहिती.

❖

८९०
२८३३८

# ४. श्रीक्षेत्र नेवासे

देवांचा राजा इंद्र थाटाने मिरवत चालला होता. वाटेत दुर्वास ऋषींनी प्रसाद म्हणून त्याला फुलांची माळ दिली. ती माळ इंद्राने हत्तीच्या पायाखाली फेकली. कोपिष्ट दुर्वासांनी त्याला शाप दिला, "तुझे रत्नभांडार समुद्रात पडून नाहीसे होईल!"

झाले ! देव ऐश्वर्यहीन बनले. दैत्यांनी स्वारी केली. देव पळाले. श्रीविष्णूंनी त्यांना मग उपाय सांगितला "देवदैत्य मिळून समुद्र घुसळून काढा म्हणजे त्यातून तुमचे रत्नभांडार तुम्हाला परत मिळेल; शिवाय अमृताचीही प्राप्ती होईल. त्यामुळे देव अमर बनतील. विजयी राहतील."

मग समुद्रमंथन झाले. त्यातून लक्ष्मी, कौस्तुभ, पारिजातक, सुरा वगैरे चौदा रत्ने निघाली. ती रत्ने काही देवांनी, तर काही दैत्यांनी वाटून घेतली; पण अमृताच्या वाटणीवरून त्यांच्यात भांडण सुरू झाले! ते भांडण मिटवून देवांना अमृत देण्यासाठी श्रीविष्णूंनी मोहिनीचे मोहक रूप घेतले ! अहाहा, काय ते रूप! नील कमलासारखा शामल रंग, रेखीव अवयव, कानांतील कुंडलांची प्रभा गालावर पडलेली. शुभ्र वस्त्र, अलंकारांनी नटलेली, पायांतील नूपुरांचा झंकार करीत, मधुर भाषण करणारी अशी ती स्त्री पाहून दैत्यांना तिची मोहिनी पडली. त्यांनी तिची तडजोड मान्य केली.

दंडकारण्यातील त्या रम्य ठिकाणी मोहिनीने देवांना अमृत आणि दैत्यांना सुरा दिली. तिचे ते कार्य पाहून राहू दैत्याने देवांचे रूप घेतले व तो देवांच्या पंक्तीत येऊन बसला; पण त्याच्या घशाखाली अमृत जाण्यापूर्वीच मोहिनीने त्याचा शिरच्छेद केला.

त्या वेळी सुदर्शनचक्राचे आवाहन करण्यासाठी मोहिनीला मूळचे विष्णुरूप घ्यावे लागले आणि म्हणून ते रूप अर्धनारी नटेश्वराचे बनले. देवांना विष्णुरूप, तर दैत्यांना मोहिनीरूप असे एकाच मूर्तीचे दोन प्रकार दिसू लागले. त्याला मोहिनीराज हे नाव मिळाले.

शांडिल्यऋषीने मधुमालती संगमावर तप केले म्हणून विश्वकर्म्याने ती मोहिनीराज मूर्ती तयार केली. तिची स्थापना त्या ठिकाणी केली. भक्तांची संकटे दूर करण्यासाठी भगवान त्या रूपाने तिथे राहू लागले.

पुढे तारकासुराच्या भीतीने स्वर्गातील सारे देव श्रीमोहिनीराजाच्या आश्रयाला आले. कुबेराचे भांडारही तिथे आणले गेले आणि त्या स्थळाला "निधिनिवास" हे नाव मिळाले. तो निधिनिवास म्हणजेच नेवासे क्षेत्र.

नेवासे हे शिवस्थान आहे. कल्याणकारी क्षेत्र आहे. त्याला "जवाआगळी काशी" म्हणतात. त्या स्थळी कोटिलिंगे आहेत. भाविक लोक तिथे पायांत जोडे न घालता चालतात. जेजुरीच्या खंडोबाची सासुरवाडी म्हणजेच म्हाळसेचे ते माहेर आहे.

नगर-औरंगाबाद रस्त्यावर नगरपासून उत्तरेला पस्तीस मैलांवर प्रवराकाठी हे नेवासे क्षेत्र आहे. दौंड-मनमाड रेल्वेच्या श्रीरामपूर स्टेशनहून पूर्वेला वीस मैल मोटारने नेवाशाला जाता येते.

जुने नेवासे म्हणजे बुद्रुक आणि नवे म्हणजे खुर्द असे दोन भाग प्रवरानदीने केले आहेत. पूर्वी प्रवरानदी इथे दक्षिणवाहिनी होती. तिला जवाएवढी खिंड पडली आणि ती खिंड फोडून प्रवरेचा प्रवाह गावातून पूर्वेकडे वाहू लागला. तिने नेवासे उद्ध्वस्त केले. गावचे दोन भाग केले. भयंकर अशी ती जवखिंड अद्यापही तिथे पाहायला मिळते.

राहूच्या कंठातील अमृत प्रवरा नदीत पडले म्हणून प्रवरेला अमृतवाहिनी हे नाव मिळाले. प्रवरेचे पाणी अमृतासारखे मधुर आणि अतिशय पाचक आहे. प्रवरेचे माहात्म्य थोर आहे. ती देवांची नदी आहे.

नेवाशाला प्रवराकाठी मोठमोठे घाट बांधले आहेत. पैकी जुना घाट प्रसिद्ध आहे. तो सध्या पडीक असला तरी गावाचा एक भक्कम संरक्षक घाट आहे. हल्ली तर त्याच्या जवळच नव्या पद्धतीचा थोप धक्का बांधला जात आहे. नारो आबाजी नगरकर यांनी बांधलेला नवा घाट सुस्थितीत आहे. त्या घाटावर गणेशमंदिर सुंदर आहे. जुन्या घाटावरील कोटात पूर्वी श्रीमोहिनीराजाचे मंदिर होते. वैभवसंपन्न असे कुबेराचे भांडार होते. महानुभावांच्या स्थानपोथीत त्याचा उलेख आहे, तो असा –

दक्षिणे बुडवे घर पूर्वे हाटवटी । म्हाळसेचे देऊळ पासीमामुख ।

लीळाचरित्रात श्री मोहिनीराज मूर्तीचे वर्णन आहे -"साधे म्हाळसी पाहू गेली तव शृंगारू केला असे; पाटाऊ राउळा नेसली असे; पाटाऊ चोळी; कांकणे कळाविया सोनियाची तानवडे; भवरिया भांगु टिळा" इत्यादी.

अशा प्रकारे ह्या शिवस्थानात विष्णूचा अवतार, कुबेराचा निधी, विश्वकर्म्याची कला आणि लक्ष्मीसह सर्व देवांचा निवास असल्यामुळे जुन्या काळचे या नेवाशाचे अपार वैभव सर्वत्र प्रसिद्ध होते.

यादव राजांच्या काळात नेवासे गाव लाडमोड म्हणून प्रसिद्ध व्यापारी पेठेचा होता. तो परगाणा होता. औरंगजेबाने नेवाशावर हल्ला करून कोट पाडला. त्याच्या दगडांची एक मोठी मशीद बांधली. त्या वेळी पुजारी बडवे यांनी श्रीमोहिनीराजमूर्ती प्रवरेच्या वाळूत पुरून ठेवली आणि आपली संस्कृती जपून ठेवली.

आर्यअनार्यांच्या झगड्यात तडजोड होऊन हा नेवासे भाग व प्रवारातीराचा अमृतप्रदेश आर्यांना मिळाला. राहूपुरीपासून केतूळपर्यंतचा मुळातीर अनार्यांना मिळाला. मुळा-प्रवरा संगमाचा पाचेगाव तेथून कायगाव ढोकापर्यंत गोदाप्रवरासंगमाचा प्रदेश नेवासे क्षेत्रात मोडतो.

महालयामाहात्म्य, प्रवरामाहात्म्य इत्यादी दुर्मिळ संस्कृतग्रंथांत व अलीकडील 'श्रीमोहिनीराजदर्शन', 'माझा मऱ्हाटाचि बोलु', 'आपले देव, आपली दैवते' वगैरे मराठी ग्रंथांत नेवाशाची खूप माहिती दिली आहे.

हल्लीचे मोहिनीराजमंदिर सरदार चंद्रचूड जहागिरदार यांनी इ.स. १७७३ मध्ये पाच लाख रुपये खर्चून बांधलेला आहे. त्यांना दृष्टान्त झाल्यामुळे वाळूतील मूर्ती गाड्यात घालून आणल्या व ज्या ठिकाणी त्या गाड्याचे चाक पडले त्या ठिकाणी त्यांनी हे नवे मंदिर बांधले.

नाशिकच्या काळ्या रामाच्या मंदिरासारखेच या भव्य मंदिराचे सुंदर शिल्पकाम आहे. चोहोबाजूंना उतरंडी आहेत. वेलबुट्टी आहे. कोपऱ्याकोपऱ्यांवर हत्ती आणि भांड्याच्या तोंडावर उभी गदा ठेवल्याप्रमाणे शिखर या शिखराखाली चाक आणि त्याखाली राक्षसाची शिरे असे बांधकाम या मंदिराचे आहे. पंचवीस फूट व्यासाचा घुमट असलेला भव्य सभामंडप आणि उत्तरद्वारावर जयविजयांच्या मूर्ती आहे. मंदिर अत्यंत प्रेक्षणीय आहे.

उत्तरदरवाजातून उंच पायऱ्या चढून आपण सभामंडपात जातो. तेथील कासवाजवळून ध्रुवदर्शनही साधले आहे. पूर्वेकडे तोंड करून आपण श्रीचे दर्शन घेतो. समोर उंच सिंहासनावर गाभाऱ्यात श्रीमोहिनीराजाची वालुकामय तेजोदार अशी स्वयंभू पाच फूट उंचीची मूर्ती आहे. शेजारीच श्रीलक्ष्मीचीही मूर्ती बसविलेली आहे. मोहिनीराजाच्या पायाजवळ राहूची मूर्ती आहे. हातात शंख, चक्र, गदा आणि अमृताचा कलश धारण केलेली वस्त्रालंकार विभूषित अशी अर्धनारी नटेश्वराची ती तेजस्वी मूर्ती पाहून चित्त हरखून जाते आणि सहजच तोंडातून उद्‌गार निघतात की-

"मोहिनीमाय, मोहिनीमाय, मी अपराधी घ्या पदरात ।"

लाखो लोकांचे हे कुलदैवत आहे. ओहरयात्रा, जावळ काढणे, लग्नमौंजी, नवस फेडणे वगैरे गोष्टींसाठी अनेक लोक इथे येत असतात. दररोज सांजसकाळ पूजा, आरती, भजन, पुराण वगैरे कार्यक्रम चालतो. सर्वांना तीर्थ मिळते. देवळातील सर्व व्यवस्था पुजारी बडवे यांच्याकडे आहे.


दर वर्षी माघ शुद्ध पौर्णिमेपासून वद्य पंचमीपर्यंत मोठा उत्सव असतो. पौर्णिमेच्या दिवशी कुलाचार, झेंडे लावणे, नवस फेडणे आणि रागीभळंदे किंवा गोंधळ हा अग्निपूजेचा विधी होतो. प्रतिपदेला देवाची भोगमूर्ती पालखीतून मिरवत पाकशाळेत जाते. वाटेत स्त्रिया ओवाळणी करतात. नंतर पाच दिवस

सहस्रभोजनाच्या प्रसादपंक्ती होतात. रोज चक्रीगायन आणि उत्तम कथाकीर्तनाचा कार्यक्रम होतो. पंचमीला काल्याची गर्दी खूपच असते. त्यानंतर उत्सवाची सांगता होते. मानकऱ्यांना प्रसाद देतात. या सर्व यात्रेची प्रचंड व्यवस्था येथील देवस्थान पंचकमेटी करीत असते.

जुन्या म्हणजे बुद्रुक नेवाशातील तीळभांडेश्वर या महादेवाची पिंड दरसाल तीळतीळ वाढते, असे म्हणतात. तेथील प्रसिद्ध खंडोबाच्या स्थानाची यात्राही मोठी असते. कुबेराने स्थापन केलेला नीलेश्वर किंवा नारदमुनी यांचे देऊळ तेथे आहे. नाथबाबांचा मठ, जहागिदाराचा वाडा, हत्तीबारव वगैरे ठिकाणे प्रेक्षणीय आहेत. नव्या म्हणजे खुर्द नेवाशातील लक्ष्मीतीर्थ, सरकारवाडा, गणेशमंदिर, नवा घाट, अहिल्याबाईंनी बांधलेले मधुमेश्वर मंदिर आणि इतर खूप देवळे वगैरे भाग सुंदर आहे.

तेराव्या शतकात मुसलमानांनी दक्षिणेत मोठा धुमाकूळ मांडला. त्या वेळी देवगिरीच्या यादवांनी खूप प्रयत्न करून हिंदू संस्कृतीला संजीवन दिले होते. अशा काळात संत ज्ञानेश्वरांनी पैठणची फेरी केली आणि नेवाशाला मुक्काम ठोकला. चारही भावंडे नेवाशाला येऊन राहिली.

दक्षिणवाहिनी प्रवरेच्या काठी करवीरेश्वराच्या मंदिरात ज्ञानदेवांनी आसन मांडले. विचारचक्र सुरू झाले. नेवासे हे पवित्र शिवस्थान, गुरुस्थान आहे. जगाचे परम मंगल करण्याची स्फूर्ती याच ठिकाणी होणार, असा त्यांचा विश्वास! जगाची हीन स्थिती पाहून त्या थोर कनवाळू ज्ञानेश्वरमाउलींचे अंतःकरण पाझरले आणि ते तेथील एका खांबाला टेकून बसले; लगेच त्यांच्या तोंडून श्रीमद्भगवद्गीतेवरील टीका भावार्थदीपिका सुरू झाली. तीच परमपवित्र ज्ञानेश्वरी ! तो ग्रंथ सच्चिदानंदबाबा यांनी लिहून घेतला.




नेवासे येथील खांब

"शके बाराशें बारोत्तरें । तैं टीका केली ज्ञानेश्वरें ।
सच्चिदानंदबाबा आदरें । लेखकू जाहला ॥

त्या ज्ञानेश्वरी ग्रंथाचा महिमा फार थोर आहे. गौतमबुद्धाला बोधिवृक्षाखाली सुखाचा खरा मार्ग सापडला. तसेच श्रीज्ञानेश्वरांना नेवासे येथील त्या खांबाजवळ जगाच्या कल्याणाची भावार्थदीपिका स्फुरण पावली. संस्कृत भाषेतील

ज्ञानभांडार आणि थोर अध्यात्मज्ञान त्यांना हजारो दृष्टान्त देऊन सामान्य लोकांना प्रथमच मराठी भाषेत पटवून दिले. सुमारे नऊ हजार ओव्यांचा तो प्रचंड ग्रंथ महाराष्ट्राचे महत्त्वाचे भूषण आहे. नेवासे हे त्या दृष्टीने मराठी भाषेची गंगोत्रीच आहे. ज्ञानेश्वरांच्या त्या प्रसंगाची आठवण म्हणून तो खांब जतन करून ठेवला आहे. खांबावर एका लेखाची खूण आहे. त्या पवित्र स्फूर्तिदायी खांबावर इ. स. १८५४ मध्ये लाला छताराम यांनी मंदिर बांधले होते. त्यानंतर अनेक वेळा त्या मंदिराचा जीर्णोद्धार झाला. इ.स. १९१५ मध्ये त्या जागेवरील ओवरीचा तंटा होऊन हिंदु-मुसलमानांत खूपच वादळ माजले. १९३६ पर्यंत ती जागा सरकारच्या ताब्यात होती; पण शेवटी हिंदूंच्या बाजूचा निकाल हायकोर्टात झाला आणि १९३७ मध्ये तिथे मोठा सत्कार-समारंभ झाला. त्यानंतर मराठीच्या या माहेराकडे महाराष्ट्राच्या मदतीचा प्रचंड ओघ सुरू झाला आणि त्याचे फळ म्हणजे हल्लीचे नेवाशाचे प्रचंड व रमणीय असे ज्ञानेश्वरी-मंदिर हे आहे! ज्ञानेश्वरी विद्यापीठ, ग्रंथ भांडार, भजनी मंडळे वगैरे कार्यांमुळे ते ठिकाण आदराचे आणि मानाचे केंद्रस्थान झाले आहे. फाल्गुन वद्य १३ ला तेथे मोठा उत्सव होतो.



**नेवासे येथील मंदिर**

ज्ञानेश्वरी मंदिराजवळच उत्तरेकडे लाडमोडची टेकडी आहे. तिथे नुकतेच उत्खनन झाले असून वीस हजार वर्षांपूर्वीची संस्कृती सापडली आहे. त्यामुळे नेवाशाच्या इतिहासावर नवप्रकाश पडणार आहे.

एकंदरीत नेवासे हे क्षेत्र देवाची आणि साधुसंतांची पवित्र भूमी आहे. सर्व मंगलांचे तीर्थक्षेत्र आहे. अमृतमय स्फूर्तिस्थान आहे. त्या ठिकाणी आपण जातो तेव्हा श्रीमोहिनीराजाचे दर्शन घेऊन पवित्र ज्ञानेश्वरी मंदिर पाहतो आणि मग सहजच आपल्या मुखातून ओवी बाहेर पडते -

दुरितांचे तिमिर जावो । विश्वस्वधर्मे सूर्ये पाहो ।<br>
जो जें वांछील तो ते लाहो । प्राणिजात ।

❖

# ५. श्रीक्षेत्र रामटेक

महाराष्ट्राच्या अगदी उत्तर टोकाला 'रामटेक' नावाचे एक पवित्र स्थान असून ते अत्यंत प्रेक्षणीय आणि दर्शनीय आहे. या स्थळाचा विशेष इतिहास, येथील रम्य भूगोल आणि बहुविध लोककथा यांमुळे 'रामटेक' फारच आदरणीय झाले आहे. रामटेकची खाण्याची मऊ, चवदार पाने केवळ पुण्यामुंबईपर्यंतच नाही, तर भारतात प्रसिद्ध आहेत.


सुमारे चार हजार वर्षांपूर्वी प्रभू रामचंद्रांनी या ठिकाणी सीता-लक्ष्मणासह निवास केला होता. त्यांच्या पवित्र पावलांनी पावन झालेली ही रामटेकची भूमी आहे. सीतामाईच्या स्थानाने इथले पाणी पवित्र झाले आहे.

वराह, नरसिंह, वामन इत्यादी अवतार श्रीविष्णूंनी याच ठिकाणी धारण केले. कविकुलगुरू कालिदासाला याच रामगिरीवर मेघदूत हे अमरकाव्य सुचले. वाकाटक, नल, यादव आणि भोसले यांनी याच ठिकाणी राज्ये केली. श्रीचक्रधर महानुभावांनी येथे दहा महिने वस्ती केली. श्रीनागार्जुनासारख्या आयुर्वेद पंडिताने याच स्थळी अमृतरसायनाचा शोध लावून ज्ञानसाधना केली आणि शंबूकशूद्राने तप करून या भूमीत राम आणला.

नागपूरहून उत्तरेला सुमारे पंचवीस मैलांवरील रामटेक स्टेशनवर उतरून रामटेक गावी आपण जातो. तेथून जवळच्याच टेकडीवर प्रसिद्ध रामटेक मंदिर आहे. टेकडीवरील मंदिराकडे जाण्यासाठी तीनचार रस्ते आहेत. एक रस्ता मंदिराच्या पश्चिम दरवाजाकडे जातो, तो सरळ जवळचा, पण उंच पायऱ्यांच्या चढणीचा आहे. दुसरा उजव्या हाताने मंदिराच्या दक्षिण बाजूकडून गुहेतील कपटरामावरून, सीतेच्या न्हाणीकुंडावरून धूम्रेश्वराकडून पूर्व दरवाजाकडे जातो. हा रस्ता मात्र अवघड आहे. या बाजूला डोंगरकडा तुटलेला आहे.

गावाच्या डावीकडून रामटेकडीला वळसा घालून मंदिराच्या उत्तर दरवाजाकडे जाणारा आणि तेथून पुढे खिंडसी तलावाच्या डाक बंगल्यावरून नागार्जुन टेकडी व अंबाल तलाव यावरून पूर्व दरवाजाला भिडणारा रस्ता दूर वळणाचा असला तरी कमी चढाचा, सोपा असा आहे. बहुतेक यात्रेकरू याच मार्गाने वर जातात. या रस्त्यावरून सृष्टिशोभा फारच सुंदर दिसते. वाटेत रामधूताचे दर्शनही होते. इकडील वानरे प्रवाशांचे खिसे पाहातात. त्यांनी दिलेले फुटाणे, शेंगा खातात. खूपच गंमत होते.

रामगडच्या पूर्व बाजूला खिंडसी नावाचा तलाव आहे. त्याला रामसागरही म्हणतात. महासुर आणि कलिपा या नद्यांना अडवून हा तलाव शेतीच्या उपयोगी



रामटेक येथील मंदिर

आणलेला आहे. सुमारे सोळा हजार एकर शेती या पाण्याखाली आहे. तलावाच्या काठी निसर्गशोभा रम्य आहे.

नागार्जुन टेकडीवर एका त्रिकोणी चिंचोळ्या खिंडीत नागप्रतिमा आणि माणसाचा दगडी तांदळा आहे. हेच प्रसिद्ध नागार्जुनाचे स्थान. दोन हजार वर्षांपूर्वी हा आयुर्वेद संशोधक पंडित होऊन गेला. माणसाला हजारो वर्षे तरुण राहता येईल, असे अमृतरसायन त्याने याच ठिकाणी शोधून काढले. त्याच्या ज्ञानसाधनेला जैन, बौद्ध लोकही फार मान देतात.

दुसऱ्या बाजूस अंबाला नावाचा तलाव आहे. गंगेसारखा पवित्र मानून लोक येथे मृतांची पिंडदान क्रिया करतात. पूर्वी कोणा अंब नावाच्या राजाचा कुष्ट-महारोग येथील पाण्यामुळे बरा झाला म्हणून त्याने हा तलाव खोदला. यांत पाताळातून भोगावती नदी आली आहे, असा समज आहे. यात्रेकरू लोक अंबाल्याचा उदक स्पर्शकरून मग रामगडाची पायरी चढतात.

थोडे चढून गेल्यावर डाव्या हाताला धूम्रेश्वराचे मंदिर लागते. येथे प्रदक्षिणा करून मग रामदर्शन घ्यावे, असा दंडक आहे.

रामावताराच्या वेळी शंबूक नावाच्या एका शूद्राने या ठिकाणी तपश्चर्या करून मुक्ती मिळविली. त्याच्याच आग्रहावरून प्रभू रामचंद्रांनी रामटेकवर कायम वस्ती केली आणि रामगिरीला तपोगिरी हे नाव मिळाले.

पूर्व बाजूने रामगडावर जाताच वराह दरवाजाच्या आत उजव्या बाजूला वराह मंदिर आहे. तेथे प्रचंड आणि पुष्ट अशी वराहाची एक मूर्ती आहे. तिच्या अंगावर देव, ऋषी यांच्या आकृती कोरलेल्या आहे. पायाशी हिराण्याक्ष राक्षस दाबलेला आहे. पूर्वी झालेल्या जलप्रलयात श्रीविष्णूने हा चौथा अवतार घेऊन आपल्या दातावर पृथ्वीला ता``न धरले आणि दुष्ट हिरण्याक्षाला ठार मारले, ती

ही वराहमूर्ती आहे. वाकाटक राजांनी हिची स्थापना केली असे म्हणतात.

यात्रेकरू लोक या वराहमूर्तीखालून आरपार सरपटत जातात आणि आपल्या पाप-पुण्याचा अंदाज घेतात. लठ्ठ माणसाची मात्र येथे साहजिकच थट्टा होते.

जवळच नृसिंहाचेही मंदिर आहे. ती उग्र, भयंकर धिप्पाड मूर्ती पाहून मुलांना तर भीतीच वाटते. हिरण्यकशिपूला याच ठिकाणी नृसिंहाने ठार मारले आणि त्याच्या रक्ताने हा डोंगर लाल झाला, म्हणून याला नाव पडले, सिंदूरगिरी! तसे पाहिले, तर येथील दगडही लालच आहेत.

बाजूला कर्पूरवापी आणि सिंदूरवापी या विहिरी आहेत. सिंदूरवापीचे पाणी फारच गोड आहे.

याच भागात त्रिविक्रम-वामनाचेही मंदिर आहे; पण ते सगळे भग्नावस्थेत आहे. ही मूर्ती शिल्पकलेच्या दृष्टीने अत्यंत रेखीव आणि अप्रतिम नमुन्याची आहे. दुष्ट भंजकांनी या उत्तम कलेचा नाश केला आहे.

या मूर्तीचा उजवा पाय उचललेला होता. त्याखाली बळिराणा व त्याच्या पत्नीची सुंदर मूर्ती आहे. अडाणी लोक या मूर्तीला बहीण-भाऊ म्हणतात. भावाने बहिणीला लाथ मारली म्हणून त्याचा तो पाय झडला आहे, असे म्हणतात.

डाव्या हाताच्या बाजूला भोगरामाचे देऊळ आहे. तिथे चतुर्भुज विष्णुमूर्ती आहे. महानुभाव लोक हिला पूजतात. शेजारीच श्रीचक्रधराचे पवित्र ओटे आहेत. स्वामींचा मुक्काम या ठिकाणी दहा महिने होता, असा उल्लेख स्थानपोथी, लीळाचरित्र या महानुभावी ग्रंथांत आहे.

नगारखान्याजवळ गोकुळ दरवाजात येताच पहारेकरी लोक आपणास विनंती करतील आणि पादत्राणे व सामान बाहेर ठेवावयास लावून, मग देवळात प्रवेश देतील.

समोरच लक्ष्मणाचे स्वतंत्र पूर्वाभिमुख मंदिर आहे. त्याची बांधणी चांगली आहे. उजव्या भिंतीवर सुमारे पंचाहत्तर ओळींत यादवकालीन शिलालेख कोरलेला आहे. लक्ष्मणाची मूर्ती वनवासी पोषाखात आहे. वनवासात लक्ष्मण हा नेहमी रामसीतेच्या पुढे चाले. म्हणून त्याचे मंदिरही येथे राम-सीतेच्या पुढेच आहे. 'राम चाले वाटे - लक्ष्मण झाडी काटे.' पाठीमागे रामसीतेचे फारच भव्य मंदिर आहे. त्या मूर्ती वनवासी वेषांतीलच आहेत. डोक्यावर मुकुट नाही; फक्त जटा आहेत. अंगावरील अलंकार लाखो रुपयांचे आहेत. या सर्व मंदिराचे बाहेरील दरवाजे पितळी पत्र्यांनी आणि आतील कडेपाट, प्रभावळ वगैरे चांदीच्या पत्र्यांनी सुंदर मढविलेले आहेत. नक्षीकाम अप्रतिम आहेत. या देवस्थानाला हजारो रुपयांचे उत्पन्न आहे. दरसाल चैत्रात मोठी यात्रा भरते. कार्तिकी पौर्णिमेला त्रिपुरी यात्रा थाटात भरते. त्या वेळी कोरा पीतांबर तुपांत

जाळीत असत. तो प्रकाश थेट नागपुराहूनही दिसत असे, असे म्हणतात!

रामलक्ष्मणांच्या देवळांना प्रदक्षिणा घालताना डाव्या हाताला धर्मेश्वराचे मंदिर लागते. धर्मेश्वराने कलीपासून धर्माचे रक्षण केले. त्यानंतर लहान लहान खूप देवळे आहेत. दशरथ, कौसल्या, मुक्तेश्वर, कुश-लव, देवी, सत्यनारायण, व्यंकटेश वगैरे.

कुश-लव मंदिर राममंदिराच्या मागच्या बाजूस आहे. त्यात गरुडारूढ लक्ष्मीनारायणाची सुंदर मूर्ती आहे. या मंदिरावर एक प्रसिद्ध सज्जा आहे. त्याला 'राम-झरोका' म्हणतात. येथून भोवतालचा आसमंत नितान्त सुंदर दिसतो.

डाव्या बाजूस तीनचार मैलांवर नंदिवर्धनलगरधन या वाकाटकांच्या राजधानीचे अवशेष झाडीतून डोकावतात. पश्चिमेला रामटेक गाव, स्टेशन, मनसर व मँगेनीज खाणी. दक्षिण बाजूचा तुटलेला कडा आणि पूर्वेचे दोन मोठे तलाव, हा देखावा पाहून आणि रामदर्शन घेऊन आपण धन्य होतो. मग दक्षिण बाजूचे सीता न्हाणीकुंड, गुप्तराम वगैरे भाग पाहून येतो.. रामटेकच्या सभोवतालची काही पवित्र स्थळेही सवडीने पाहतो. उदाहरणार्थ, मनसुर हे क्षेत्र. येथे हिडिंबातीर्थ कुंड असून त्याभोवती खूप मंदिरे आहेत. नगरधनच्या कोटेश्वराच्या लिंगाला तीन फूट खोल भेग आहे. गवळणीच्या यतीने फेकलेल्या भाल्याची खूण आहे.

रामटेक पूर्वी काशीचे महाद्वार समजत. कारण पायी यात्रा करणारे लोक प्रथम येथे थांबत असत. येथील निसर्गरम्यता नंदनवनासमान आहे, श्रमहारक आहे. पूर्वी या ठिकाणी श्रीरामाच्या फक्त पादुकाच होत्या. नंतर बसविलेल्या मूर्ती औरंगजेबाच्या दक्षिणधाडीमुळे महासुर नदीत लपविल्या होत्या. त्या नागपूर राज्यस्थापक श्री. रघुजीराजे भोसले यांनी पुन्हा येथे स्थापन केल्या.

देवगडावरील स्वारीच्या वेळी बखरीतला उल्लेख असा आहे. "तेथून कूच करून रामक्षेत्रास फौजेसह आले. तेथे अं[illegible] कुंडावर स्नान करून नवस केला. जे आमची कार्यसिद्धि झाल्यास गडावर [illegible]ीरामचंद्राजीची स्थापना करून जागा ब्राह्मणास अग्रहार धर्मादाय देऊ. असा निश्चय करून निघाले. या स्वारीत त्यांना यश मिळाले. त्यांनी जयपूरहून मूर्तीही आणल्या; पण दृष्टान्त झाल्यामुळे त्यांनी मूळच्या मूर्ती नदीतून काढून स्थापल्या." (१७५३). भोसल्यांचे मूळ दैवत श्रीशंभूमहादेव; परंतु या प्रसंगापासून त्या घराण्यात रामरायाची उपासना सुरू झाली.

रामटेक आणि त्याच्या आसमंताचा असा खूप मोठा इतिहास आहे. सामान्य लोकांसह सरकारचेही लक्ष आता रामटेककडे लागले आहे. त्याचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे. रामदासस्वामी म्हणतात :-

'देव मस्तकी धरावा अवघा हलकल्लोळ करावा.' ❖

# ६. श्रीक्षेत्र तुळजापूर

**श्रीतुळजादेवी** - हजारो वर्षे झाली त्या गोष्टीला. दंडकारण्यातील दिंडिरवनाच्या सीमेवर आर्यांनी आपले आश्रम बांधले होते. सह्यगिरीच्या दूरवर पसरलेल्या फाट्यावर निसर्ग-सौंदर्याची वारेमाप उधळण झालेली होती.

त्या फाट्यांपैकी यमुनाचल पर्वताच्या दरीत शेकडो ऋषिमुनी तपश्चर्या करीत होते. तेथील यज्ञधूमाचा गिरिशिखरावरील धुक्याशी संगम होऊन वातावरण कुंदधुंद धूसर बनत होते. रविकिरणांचा प्रखरपणा सौम्य रूप धारण करून शीतल चंद्रकराप्रमाणे आल्हाद देत होता. गाईगुरांची खिल्लारे डोंगरउतरणीवरील गवत खाऊन पुष्ट होत होती. डोंगराच्या पोटातून सतत स्रवणाऱ्या झऱ्यांचे झोत दुग्धधारांप्रमाणे फेसाळत कड्यावरून उड्या घेत होते. त्यांच्या त्या गंभीर निनादात ऋषिमुनींच्या वेदमंत्रांचे घोष मिळून एकंदर परिसर शीतल, शांत, प्रसन्न व गंभीर होत असे.

अशा त्या रम्य स्थळी कर्दम नावाचा ब्रह्मवेत्ता आपल्या पत्नीसह रहात होता. तो मरण पावला, त्या वेळी त्याची पत्नी अनुभूती सती जाऊ लागली; पण त्या वेळी ती गर्भवती असल्यामुळे लोकांनी तिला परावृत्त केले. नंतर यथाकाल ती प्रसूत झाली. तिने आपल्या पुत्राचे लालनपालन करून योग्य वेळी त्याला उत्तम गुरूच्या स्वाधीन केले.

साध्वी अनुभूती नंतर याच यमुनाचलावर तपश्चर्या करू लागली. मूळच्या रूपलावण्याची खाण असलेल्या अनुभूतीचे सौंदर्य त्या तपोतेजामुळे आणखी जास्त खुलून दिसू लागले. तिच्या कांतीची दीप्ती चंद्रकिरणांप्रमाणे दशदिशांत पसरत होती.

मेरूपर्वतावर राहणारा कुकुर दैत्य एके दिवशी त्या यमुनाचलावर शिकारीसाठी आला. त्या वेळी त्याने ध्यानस्थ बसलेल्या अनुभूतीचे अप्रतिम सौंदर्य पाहिले आणि तो मोहून गेला. त्याने त्या सुंदरीच्या शरीराला स्पर्श केला.

अनुभूतीची समाधी भंग पावली. तिने रागाने त्या दुष्ट दैत्याकडे पाहिले. तिचा संताप अनावर झाला.

पण तिने थोडा विचार केला, संयम धरला. 'या दुष्टाला शापून भस्म करावे तर आपल्या तपश्चर्येचे पुण्य नाश पावेल आणि गप्प बसावे, तर आपल्या पातिव्रत्याचा भंग होईल; तेव्हा अशा प्रसंगी काय करावे!' या पेचामुळे ती

गोंधळून गेली.

मग तिने देवी आदिशक्तीचा धावा केला. माता पार्वतीने श्रीभवानीदेवीचे उग्र रूप घेतले आणि ती अनुभूतीच्या सहाय्यार्थ आली. आदिशक्ती भवानी देवीने त्या कुकुर राक्षसाशी युद्ध केले.

नऊ दिवस ते भयंकर युद्ध चालले होते. प्रत्येक वेळी तो दुष्ट कुकुरासुर वेगवेगळे रूप घेई आणि देवी भवानीही आपले वाहन बदलून त्या दुष्टाशी युद्ध करी. शेवटी रेड्याच्या (महिषाच्या) रूपात असलेल्या कुकुर राक्षसाला देवीने ठार मारले. देवीच्या सिंहाने त्या महिषासुराचे मस्तक फोडले. त्या राक्षसाच्या रक्तातून पुनः दैत्य निर्माण झाले. ते सर्व दैत्य अष्टभुजा देवीने अष्टायुधांनी ठार केले आणि विजय मिळविला.

सती अनुभूतीच्या सत्त्वरक्षणासाठी देवी जगदंबेने जे अष्टभुजा महिषासुर-मर्दिनीचे रूप घेतले, ते रूप कार्यसिद्धीनंतर अत्यंत सौम्य बनले. त्या रूपातील देवीला सर्वांनी विनवून नम्र प्रार्थना केली आणि इतर भक्तजनांच्या संकटांना दूर करण्यासाठी त्या जगन्मातेने त्या स्थळी सतत निवास करण्याचे मान्य केले.

नंतर देवीने बटू भैरवाला आज्ञा करून एक रम्य निवासस्थळ शोधण्यास सांगितले. तो ते स्थळ शोधण्यास गेला; पण यमुनाचलाचा तो सर्वच परिसर अत्यंत रमणीय पाहून तो गुंगून तिकडेच फिरत राहिला. भान हरपलेल्या त्या देवीने टोळभैरवाची नंतर चांगलीच कान उघाडणी केली.

त्याच वेळी मातंग नावाचा राक्षस देवीवर धावून आला. देवीने आपल्या तामसी शक्तीने त्या दुष्टाचा नाश केला आणि त्या स्थळी मातंगी देवीच्या मूर्तीची स्थापना झाली. ब्रह्मदेवाचा पुत्र विश्वकर्मा याने नंतर देवी तुळजा-भवानीची अष्टभुजा मूर्ती बनविली आणि ती गंडकी शिळेची सुंदर मूर्ती त्या स्थळी स्थापन केली. त्या मूर्तिरूपाने आदिशक्ती तेथे राहिली.

**त्वरितापूर :** महाराष्ट्राच्या मराठवाड्यात धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्यात सध्याचे जे तुळजापूर नावाचे क्षेत्रस्थान आहे तेच पूर्वीचे तुरजापूर किंवा त्वरितापूर हे गाव! सती अनुभूतीसाठी प्रगट झालेली आणि भक्तांना त्वरित पावणारी आदिशक्ती जगदंबा भवानी त्या क्षेत्रात निवास करते, म्हणून त्या स्थळाला ते नाव मिळाले. मूळच्या तुरजापूरचा अपभ्रंश होऊन त्याचे नाव तुळजापूर असे झाले.

सह्याद्रीच्या बालाघाट फाट्यावरील यमुनाचलाच्या दोन उंच टेकड्यांमधील दरीत हे गाव वसलेले आहे. समुद्रसपाटीपासून त्या स्थळाची उंची सुमारे २६१० फूट आहे. सृष्टिसौंदर्याच्या रमणीय देखाव्यामुळे ते स्थळ प्रेक्षणीय आहे.

तेथे जाता येते. तेथे अद्याप लोहमार्गाची सोय नाही. लौकरच हे महाराष्ट्राचे महत्त्वाचे क्षेत्रस्थान रेल्वेमार्ग व नवीन सुधारणांनी युक्त असे होऊन त्याचे महत्त्व जास्त वाढेल.

तुळजापूर हा सध्या तालुक्याचा गाव आहे. तेथे येणाऱ्या भक्तगणांच्या गरजा भागविणारी पेठही आहे. महाराष्ट्रातील कोट्यवधी लोकांची कुलदेवता ही येथील अंबाभवानी असल्यामुळे दररोज अनेक लोक येथे कुलधर्म, ओहर यात्रा नवस फेडणे, मंगलकार्ये आणि दर्शन यांसाठी येत असतात.

येथील उपाध्यायांकडे आपापल्या यजमानांचे वंशवृक्ष आणि शेकडो वर्षांपासूनच्या यात्रेकरूंच्या हस्तलेखांच्या चोपड्या आहेत. आलेल्या यात्रेकरूला त्याचे नावगाव विचारून त्याच्या पूर्वजांचे हस्तलेख दाखवून उपाध्याय त्यांच्या यात्राविधीची व राहण्याची सोय करीत असतो.

तेथील क्षेत्रस्थानी हजारो वर्षांपासून हा थोर सांस्कृतिक ठेवा जतन करून ठेवला आहे. त्यांच्या त्या अमोल कार्याचे कौतुक करून नव्या पिढ्यांनी त्यांना उत्तेजन दिले पाहिजे. तेथे दानधर्म भरपूर केला पाहिजे.

तुळजापूर हे आदिशक्तीचे महन्मंगल क्षेत्र आहे. महाराष्ट्राचे ते स्फूर्तिस्थान-शक्तिस्थान आहे. क्षेत्राची यात्रा प्रत्येकाने केलीच पाहिजे.

**कल्लोळ तीर्थ** - बिऱ्हाडाची सोय लावल्यानंतर प्रत्येक यात्रेकरू देवीच्या धूळभेटीस आधी जातो आणि नंतर यथावकाश यात्राविधी करतो.

मंदिराच्या महाद्वारातून बऱ्याच पायऱ्या उतरून खाली गेल्यावर पहिल्या विसाव्याच्या डाव्या बाजूस 'कल्लोळ' नावाचे महातीर्थ आपणांस दिसते. चारही बाजूंना मजबूत दगडी पायऱ्यांची सुंदर बांधणी केलेल्या त्या कुंडात योग्य तो कर भरून प्रत्येक जण स्नान करतो.

सुमारे ४० फूट लांब व १६ फूट रुंदीचे ते भव्य स्नानकुंड असून त्यात साधारणतः कमरेइतके पाणी सतत असते. चार-आठ दिवसांनी तेथील पाणी सोडून देऊन ते कुंड स्वच्छ धुतात. पुन्हा लवकरच ते कुंड आपोआप भरले जाते.

जगन्माता अंबाभवनी त्या यमुनाचलाच्या दरीत राहू लागली तेव्हा स्वर्ग-मृत्यु-पाताळातील सर्व पवित्र तीर्थ त्या स्थळी एकदम धावून आली. त्यांच्या कोलाहलामुळे त्या संगमतीर्थ कुंडाला कल्लोळ हे नाव मिळाले. तेथील स्नान अत्यंत पुण्यप्रद मानतात.

**गोमुख** - कल्लोळाच्या विसाव्यावरून काही पायऱ्या उतरून गेल्यावर 'गोमुख' नावाचे तीर्थस्थळ लागते. एका खोलीत सुमारे सहा फूट उंचीवर असलेल्या

गाईच्या दगडी तोंडातून पाण्याची संततधार तेथे वाहात असते. ते पाणी थंडगार आणि रुचकर व पाचक आहे. त्या निर्मळ धारेखाली उभे राहून सर्व स्त्री-पुरुष भक्त भाविकतेने स्नान करतात.

प्रत्यक्ष ब्रह्मदेवाने देवी भवानीच्या नित्य स्नानासाठी गंगा, यमुना, सरस्वती ह्या नद्या तेथे एकत्र आणल्या. पाताळातील भोगावतीही तेथे येऊन त्या धारेत मिळाली आणि गोमुखाच्या आकाराच्या दगडातून ती संततधार वाहू लागली. या पवित्र पाण्यानेच देवीला रोजचे स्नान घालण्यात येते.

देवीशी प्रत्यक्ष बोलणारा गरीबनाथ नावाचा एक भक्त एकदा देवीचे न ऐकता काशीस गेला होता. तेथे गंगेत त्याने काठी व लिंबू सोडले, ते वाहात वाहात या गोमुखातून बाहेर आले, अशी एक कथा सांगतात. त्या गरीबनाथ मठातील महंत दिवाळीच्या दिवशी देवीच्या दर्शनास येतात आणि त्या कथेला उजाळा मिळतो.

**जगदंबेचे मंदिर** - "घ्या, काही हार-फुले घ्या! हळदीकुंकू, नारळ घ्या! देवीला तेल घाला!" देवीच्या मंदिरद्वाराशी दुतर्फा बसलेल्या छोट्या दुकानदारांचे हे आवाज तेथे नित्य चालू असतात. भक्तमंडळी ते साहित्य घेतात.

दरवाज्यातून पायऱ्या उतरून खाली गेल्यावर मुख्य मंदिराचा भव्य प्राकार दृष्टीस पडतो. प्राकारात सर्व बाजूंना तटाच्या आत मोठमोठ्या ओवऱ्या आहेत. सारे बांधकाम विस्तीर्ण व मजबूत दगडांचे आहे.


दर्शनी बाजूस एक प्रचंड होमकुंड आहे. नवरात्र उत्सवात अष्टमी-नवमीला तेथे मोठा होम होतो. होमकुंडाच्या कठड्यावर देवीच्या पादुका ठेवल्या आहेत.

गोमुखाजवळ गणेशतीर्थ, अमृतकुंड आणि सिद्धिविनायक, दत्त, विठ्ठलरखुमाई या देवतांच्या मूर्ती आहेत. तशाच प्रांगणातील ओवऱ्यांमध्येही काही देवदेवतांच्या मूर्ती आहेत. ओवऱ्यांतून परगावच्या भक्तउतारूंची बिऱ्हाडे, पुजाऱ्यांची घरे, सरकारी पोलिस कचेरी आणि नवरात्र उत्सवातील देवीच्या वाहनांच्या सुंदर मूर्ती ठेवलेल्या आहेत.

मंदिराच्या प्रांगणात भुते, आराधी वगैरे लोक परड्या-दुरड्या मांडून बसतात. त्यांत काही भक्त लोक पीठ घालतात. त्यांना दानदक्षिणा देतात.

देवीच्या मुख्य मंदिरासमोरच सुंदर असे श्रीभवानीशंकराचे मंदिर आहे; त्यात महादेवाच्या पिंडीवर मोठा सुवर्ण मुखवटा घालून वस्त्रालंकारांनी तो सजलेला असतो.

देवीच्या मुख्य मंदिराचे शिल्पकाम अत्यंत सुंदर आहे. मूळच्या हेमाडपंती बांधणीवर पुस्त देऊन मंदिराची बांधणी नवीन केलेली आहे. सुमारे दोनशे




तुळजापूर येथील मंदिर

वर्षांपूर्वी हे नवीन बांधकाम केल्याचे सांगतात.

या मंदिराच्या शिखरावर सोन्याचा कळस आहे. शिखराचे शिल्प अप्रतिम असून हत्ती, घोडे, मोर, माकडे आणि देवदेवता व यक्षकिन्नरांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. वेलबुट्टीही प्रेक्षणीय आहे. बीड येथील श्रीमान थिगळे यांनी हे मंदिरशिखर बांधले 'आणि आपली सेवा देवीला अर्पण केली.

देवीच्या मंदिरात, सभामंडपात, भिंतीवर, खांबांवर वगैरे सर्वत्र चांदीचे रुपये व नाणी ठोकली आहेत.

सभामंडपात गोंधळ-जागरण (कथा-कीर्तन), जावळ काढणे, लग्न, मौंजी वगैरे विधी चालतात. भक्तगण तेथे विसावा घेत असतात.

मंदिराच्या गाभाऱ्यात पांढरा शुभ्र स्फटिकाचा उभा सिंह आहे. तो सुमारे चार फूट लांबीचा आणि दोन फूट उंचीचा असून देवीच्या अगदी समोरच आहे.

देवीच्या मंदिराचे दरवाजे चांदीच्या जाड पत्र्याने मढविलेले आहेत. सिंहासन, चबुतरा, कडेपाट वगैरे सर्व भाग चांदीमय असून त्यावर सुंदर नक्षीकाम केलेले आहे. ते सर्व काम पाहून आपण थक्कच होतो.


गाभाऱ्याजवळ शेजघर असून तेथील भव्य पलंगावर उंच गाद्या मांडलेल्या आहेत. वर्षातून तीन वेळा त्या शेजघरात देवीची मूर्ती उचलून झोपवितात.

देवीची पूजा करणे, खणानारळाने ओटी भरणे, ओवाळणी करणे, नवस फेडणे वगैरे विधींसाठी तेथे अगोदर सरकारी कर भरावा लागतो आणि नंतरच साधी पूजा, अभिषेक-पूजा, अलंकार-पूजा वगैरे विविध प्रकारची पूजा भक्तांना करता येते. देवीची नित्य होत असलेली त्रिकाल पूजा पाहण्यास व दर्शनास कर नाही.

प्रत्येक प्रकारच्या पूजेच्या वेळी देवीच्या वस्त्रालंकारांचा थाट वेगवेगळा करतात. गंधलेपन विविध प्रकारचे करतात.

गुढीपाडवा, शिराळषष्ठी, ललितापंचमी, बलिप्रतिपदा, मकरसंक्रांत आणि रथसप्तमी या वेळी देवीची अलंकार महापूजा होत असते. खेरीज काही श्रीमंत भक्त मुद्दाम मोठा कर भरून अलंकार-महापूजा मधून मधून करवीत असतात. त्या पूजेचा थाट अप्रतिम आणि अवर्णनीय असतो.

देवीला दूध, दही, तूप, मध आणि साखर या पंचमृतांनी स्नान घालून अत्यंत बहुमोल असे वस्त्रालंकार चढवितात. शहाजीराजे, छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, पेशवे आणि इतर अनेक राजेरजवाड्यांनी देवीला सोन्याचे, हिऱ्यांचे अलंकार अर्पण केलेले आहेत, ते सर्व पोलिस बंदोबस्तात देवीच्या अंगावर त्या वेळी घातले जातात. रत्नजडित टोप, कमरपट्टे, रत्नहार, माळा, चिंचपेट्या, बाजूबंद, गोंडे, बाळ्या वगैरे कितीतरी अलंकार आहेत. त्यांची किंमत लाखावर आहे!



तुळजापूर येथील भवानीदेवी

पंचामृत पूजेच्या वेळी श्रीभवानी देवीची उघडी स्वयंभू मूर्ती आपणास पाहावयास मिळते. काळ्या गंडकी शिळेच्या त्या अष्टभुजा तुरजादेवीची नितान्तसुंदर मूर्ती पाहून आपण हरखून जातो.

देवीच्या सहा हातांत विविध शस्त्रे आहेत. डाव्या हाताने महिषासुराची शेंडी धरलेली असून उजव्या हातातील त्रिशूळ त्याच्या बरगडीत मारलेला आहे. तिच्या पायाखाली रेड्याचे धड पडलेले आहे आणि जवळच त्याचे शिरही पडलेले दिसते.

देवीच्या उजव्या बाजूस सिंहाची मूर्ती आहे. जवळच पुराण सांगणाऱ्या मार्कंडेय मुनींचीही मूर्ती आहे. देवीच्या उजव्या स्कंदावर चंद्र आणि डाव्या स्कंदावर सूर्य आहे. देवीच्या मूर्तीशेजारीच सती अनुभूती उलटे टांगून घेऊन तपश्चर्या करीत आहे, अशी तिची मूर्ती आपणांस दिसते.

देवीच्या मुकुटभागात शिवलिंग असून एकंदर मूर्ती अत्यंत रेखीव, तुकतुकीत आणि सुंदर ध्यानाची आहे. ती मूर्ती, तो तिचा थाटमाट आणि ते तिचे मंदिर पाहून आपण आदराने नम्र होतो.

**थोडा इतिहास** - दुष्टांचा नाश करून भक्तांची संकटे दूर करणारी ही

त्वरिताभवानी, वीरांना स्फूर्ती देणारी जगन्माता आदिशक्ती पार्वती, महाराष्ट्र, कर्नाटक वगैरे प्रांतांतील अनेक लोकांची कुलदेवता आहे.

व्यासांनी तुळजा माहात्म्याच्या संस्कृत ग्रंथात तिची महती लिहून ठेवली. प्रभु रामचंद्राला वनवासात हिनेच मार्गदर्शन करून वर दिला होता. यादवकालीन ताम्रपटावरून तुळजापूरचे श्रेष्ठत्व स्पष्ट झाले. हेमाडपंतांनी त्यांच्या विशिष्ट पद्धतीने या देवीचे मंदिर बांधले. ही देवी भोसले घराण्याची कुलस्वामिनी बनली. मालोजी राजांना भवानीदेवी पावली आणि शिवछत्रपतींना प्रसन्न होऊन त्यांच्या हातून महाराष्ट्र धर्म हिनेच वाढविला.

शिवाजी महाराजांना विजयी भवानी तलवार याच देवीने प्रसाद होऊन दिल्याचे सांगतात. ही देवी शिवाजीला वारंवार दृष्टान्त व कौल देऊन अनेक संकटांतून सोडवीत असे. त्याबद्दलचे कितीतरी दाखले महाराष्ट्राच्या इतिहासात नमूद आहेत.

इ.स. १६५८ मध्ये अफजुलखानाने याच तुळजापुरावर हल्ला केला होता. त्याने देवीची मूर्ती फोडून तिचे जात्यात भरडून पीठ केल्याचे सभासदाच्या बखरीत सांगितले आहे; परंतु खरी गोष्ट अशी होती की, "अफजुलखान मोठे अहंकारे मजल-दरमजल तुळजापुरी आला आणि देवीस उपद्रव करणार तोच देवी लपविली................" असा स्पष्ट उल्लेख चिटणीस यांच्या बखरीत आहे.

म्हणजे अविंधांच्या हल्ल्यापासून या देवीच्या स्वयंभू मूर्तीचे रक्षण पुजाऱ्यांनी केले आणि त्या मूर्तीच्या जागेवर बनावट मूर्ती उभी केली. पिसाट खानाने कदाचित तीच मूर्ती नष्ट केली असावी!

शिवाजीच्या अंगात भवानीमातेने संचार करून अफजुलखान राक्षसाचा नाश प्रतापडाच्या पायथ्याशी केला आणि आपल्या दुष्ट निर्दालनाची प्रचीती दाखविली, असे स्पष्टपणे दिसून आले.

शिवाजी महाराजांनी प्रतापगडावर जी भवानीची मूर्ती स्थापन केली होती, ती याच देवीची प्रतिकृती असून नित्य दर्शनासाठी त्यांनी ती सुलभ सोय केली होती.

औरंगजेबाचीही वक्रदृष्टी तुळजापूरवर वळली होती, पण मराठ्यांच्या गनिमीकाव्यामुळे त्याने धास्ती घेतली आणि मग फारसा उपद्रव केला नाही.

सातारा व कोल्हापूर येथील राजे, सरदार, पेशवे वगैरेंनी तुळजापूरचे वैभव वाढविले होते. येथील नारोजी आराध्ये यांच्या घरी पाच वर्षेपर्यंत रामराजा अज्ञातवासात होता, असे म्हणतात.

महादजी शिंदे यांची सासुरवाडी तुळजापूरला होती. बिदर, विजापूर, मोगल,

निजाम वगैरे यवनसत्तेच्या आधिपत्याखाली तुळजापूर नांदले होते. निंबाळकरांनी इकडील जहागिरी भोगली. इंग्रजी सबसिडरी फौजही येथे अमल गाजवीत होती.

१९४८ मध्ये रझाकारांनी येथे त्रास दिला होता; पण एका रात्रीत देवीने त्यांचा बळी घेतला. १९५६ मध्ये तुळजापूर महाराष्ट्रात म्हणजे मूळच्या माहेरात आले आणि त्याचा इतिहास धन्य झाला.

मराठ्यांच्या व महाराष्ट्राच्या ह्या स्फूर्तिस्थानाला व कीर्तिस्थानाला रामदासांनी विशेष महत्त्व दिले होते. त्यांच्या येथील भेटीच्या वेळचे 'रामवरदायिनी स्तोत्र' प्रसिद्धच आहे.

**भोवतालचा भाग** - मुख्य मंदिराच्या पाठीमागील पश्चिम दरवाजामधून पाहिले तर खोल दरीत अत्यंत मनोहर सृष्टिशोभा दिसते. दारातून पायऱ्या उतरून जाताना महंत दमरोजीबुवांचा मठ आणि वाकोजीबुवांचा मठ ही ठिकाणे डावीकडे दिसतात.

या मठाधिपतींकडे देवीच्या पूजेचे साहित्य आणि अलंकार वगैरेंवर देखरेख करण्याचे काम असते. या मठातही देवीच्या छोट्या सुंदर मूर्ती आहेत.

शेकडो पायऱ्या उतरून खाली गेल्यावर 'आराधवाडी' नावाची छोटी वस्ती लागते. तेथे देवीची आराधना करणारे लोक राहतात. ते आपल्या गळ्यात कवड्याच्या माळा घालतात. पुरुषांच्या डोक्यावर उंच टोपी असते. हाती पाजळता पोत घेऊन देवीची गाणी गात हे लोक फ़िरत असतात. लोकांना अंगारा व कुंकू - देवीचा प्रसाद देऊन त्यांच्याकडून हे लोक दानदक्षिणा घेतात. हे आराधी व भुते लोक देवीच्या जोगव्याची दीक्षा घेतात आणि त्या भिक्षेवर जगतात. महाराष्ट्रात हे लोक प्रसिद्ध आहेत.

**आईचे माहेर** - आराधवाडीच्या पुढे गेल्यावर महंत भारतीबुवा यांच्या मठात आपण जातो. सर्व बाजूंनी मजबूत दगडी तट असलेला अणि गर्द झाडीत बसलेला हा भव्य मठ आहे. या ठिकाणालाच 'आईचे माहेर' असे म्हणतात.

पूर्वी या मठाचे अधिपती महंत रणछोड भारती हे शंकराचे अवतार होते. देवी अंबाभवानी पार्वतीच्या रूपात त्यांच्याशी सारीपाट खेळत असे. अद्यापी ही तुळजाभवानी सतत याच मठात निवास करते आणि फक्त पूजेच्या वेळी आईला हाक मारल्यावर ती वर मुख्य मंदिरात येते, असे म्हणतात.

दररोज सकाळ-संध्याकाळ पूजेच्या अगोदर पश्चिम दरवाज्यातून पुजारी आईला हाक घालतो. पूजा आटोपताच आई परत त्या माहेरघरी जाते.

या मठात भारतीबुवांची समाधी, देवीची सुंदर मूर्ती आणि शंकर-पार्वतींचा सारीपाट मांडलेला आहे. येथीही देवीची त्रिकाळ पूजा, आरती होते. हा मठ

शांत वातावरणात आणि निसर्ग-सौंदर्यात अतिशय प्रसिद्ध आहे.. प्रत्येक भक्त आईच्या ह्या माहेराचे दर्शन घेत असतो.

**रामवरदायिनी** - जमदग्नी - पत्नी रेणुका ही पार्वतीचा अवतार होती. पति निधनानंतर सती जाताना तिने आपला पुत्र परशुराम याला वचन दिले होते की, "तू जेव्हा रामावतार घेशील तेव्हा लंकेला सीता शोधण्यास जाशील, त्या वेळी यमुनाचळावर मी तुला पुन्हा भेटेन."

त्यानंतर पार्वतीदेवी भवानीच्या रूपात या तुळजापुरात राहू लागली. प्रभु रामचंद्र जेव्हा सीतेच्या शोधार्थ निघाले तेव्हा या देवीने त्याची परीक्षा पाहण्यास प्रत्येक्ष सीतेचे रूप घेतले; पण रामाने मातेला ओळखले. राम म्हणाले, "ओहो! तू का आई? ये माई, मला तुझे दर्शन घेऊ दे." हे शब्द ऐकून रामाला देवी प्रसन्न झाली आणि रामाला तिने विजयाचा वर दिला.

त्या घटनेची स्मृती म्हणून तुळजापूरच्या उत्तरेकडील टेकडीवर रामवरदायिनी देवीचे यमाई-तुकाईचे सुंदर मंदिर आहे. देवीची तेथील मूर्ती फारच प्रेक्षणीय आहे. तेथे जवळच अरण्यबुवा यांचा मठ आहे. हे स्थळही अत्यंत रमणीय आहे.

**घाटशीळ** - तुळजापूरच्या दक्षिण टेकडीवर घाटशीळ येथे देवीचे एक सुंदर मंदिर आहे. तेथील प्रचंड शिळेवर बसून देवी पार्वती रामचंद्राशी बोलली होती. तेथूनच तिने रामाला लंकेचा मार्ग दाखविला.

**पापनाशतीर्थ** - घाटशिळेजवळच पापनाशतीर्थ आहे. या पुष्करणीत स्नान केल्यामुळे इंद्राचे वृत्रासुरवधाचे पातक नाहीसे झाले असे सांगतात. त्या ठिकाणी इंद्रवरदायिनी देवीचीही मूर्ती आहे.

**नागझरी** - अहिरावणाने वासुकी नागराज्य घेतले, तेव्हा वासुकीने या ठिकाणी तपश्चर्या करून भगवान शंकराला प्रसन्न करून घेतले अशी कथा आहे. आपले राज्य परत मिळविणाऱ्या नागराज वासुकीचे हे पवित्र स्मृतिस्थळ आहे.

या नागझरी तीर्थात स्नान केल्याचे सर्व रोग नाहीसे होतात, असे सांगतात. त्याचा अनुभव बऱ्याच लोकांना आला, त्याबद्दलच्या काही कथाही प्रसिद्ध आहेत. या ठिकाणी नागांच्या मूर्ती आणि शिवशिंग आहे. काही लोक पुत्रप्राप्तीसाठी या स्थळी नागनारायण बली नावाचा विशिष्ट विधी करतात.

**मंकावती तीर्थ** - तुळजापूर गावातच हे एक मोठे प्रसिद्ध व पवित्र तीर्थकुंड आहे. चौफेर दगडी पायऱ्यांची उत्तम बांधणी केलेली तीन प्रवेशद्वारे असलेली ही प्रचंड बारव आहे.

या ठिकाणी पूर्वी प्रत्यक्ष विष्णूंनी गौतममुनीचे पाप नाहीसे केले, असे सांगतात. येथे योगिनी जलक्रीडेसाठी येत असतात. प्रदोषकाली भवानीदेवी येथे येऊन जलविहार करते, असे सांगतात. या पवित्र तीर्थाचे स्नान पुण्यप्रद मानले जाते.

**इतर तीर्थे** - तुळजापुरात अमृतकुंड, सूर्यकुंड, चक्रकुंड, चक्रतीर्थ वगैरे अनेक तीर्थकुंडे आहेत. वेशीबाहेर देवी अहिल्याबाई होळकर यांनी बांधलेली एक प्रचंड बारव आहे. तीत एक शिलालेखही आहे.

**धाकटे तुळजापूर** - तुळजापूरच्या पूर्वेस एक छोटीशी वस्ती आहे. तेली, कोष्टी, माळी, कुंभार वगैरे सर्व ग्रामोद्योगी लोकांची ती वस्ती आहे. शेतात सापडलेल्या देवीभवानीची एक सुंदर मूर्ती या वस्तीत आहे. प्रत्यक्ष तुळजापूर गावात तेलघाणा चालवीत नाहीत. कुंभाराचे चाक फिरवीत नाहीत म्हणून ही स्वतंत्र वस्ती आहे.

**उत्सव आणि उपासना** - आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून दशमीपर्यंत महाराष्ट्रात सामान्यतः घरोघर देवीच्या नवरात्राचा उत्सव होत असतो. हा उत्सव तुळजापूर पूजाअर्चा, ध्यानधारणा, मंत्र, धार्मिक शिक्षण, वेदपठन इत्यादी कामे चालतात.

भाद्रपद वद्य अष्टमीच्या सायंकाळी भवानीदेवी सिंहासनावरून उठून पलंगावर शयन करते. नंतर आश्विन शुद्ध प्रतिपदेच्या पहाटे ती पुन्हा सिंहासनावर येऊन बसते. तेव्हापासून नवरात्रोत्सव सुरू होतो.

दररोज थाटाची महापूजा करून रात्री या देवीचा छबिना काढतात. रोजच्या मिरवणुकीत देवीचे वाहन बदलतात. हत्ती, घोडा, सिंह, वाघ, मोर, बैल इ. प्राणी सुंदर मूर्तिरूपाने सजवून त्यावर देवीची मूर्ती बसवितात. ती थाटाची मिरवणूक अत्यंत प्रेक्षणीय असते.

शुद्ध नवमीला मोठा होम होतो. त्याचा नैवेद्य मातंगीदेवीला नेतात. रात्री देवीच्या पलंग-पालखीची भव्य मिरवणूक होते. ही पालखी व पलंग नगर-भिंगार येथील भक्त-तेली वंशपरंपरा थाटाने आणतात. पलंग-पालखीचा हा सोहळा पाहण्यास प्रचंड गर्दी उसळते.

दसऱ्याच्या दिवशी पहाटेच ही पालखी व पलंग देवीच्या मंदिरात आल्यावर तो तेलीभक्त आपली करंगळी कापून देवीला रक्ताचा टिळा लावतो आणि प्रार्थना करतो, "आई, शिलंगणाला ऊठ!"

नंतर देवी पालखीत बसून शिलंगणास जाते. प्रदक्षिणामार्गे पिंपळाच्या म्हणजेच शिलंगणच्या पारावर देवी विश्रांती घेते. सर्व लोक तेथे देवीचे दर्शन घेतात. मंदिराच्या प्रांगणात खूपच गर्दी होऊन सारी जमीन कुंकवाच्या सड्याने भरून जाते.

शिलंगणाहून आल्यावर देवी सभामंडपात स्फटिकसिंहाजवळ त्या पलंगावर

शयन करते. नंतर ही श्रमनिद्रा आश्विन शुद्ध चतुर्दशीपर्यंत चालू असते.

कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी देवी जागृत होते. तिला सिंहासनावर बसवून महापूजा व महानैवेद्य करण्यात येतो. या वेळी सोलापूरचे तेली देवीच्या काठ्या सजवून आणतात. तो थाट पाहण्यासारखा असतो. पलंगीपौर्णिमेचा येथील हा उत्सव महत्त्वाचा मानतात.

तुळजापूरचा नवरात्र-उत्सव पाहण्यास अनेक प्रांतांतील लाखो लोक येतात आणि प्रचंड मेळावा भरतो.

**नवरात्रासाठी** सप्तधान्ये, सप्तमृत्तिका, अष्टगंध, अष्टधातू, नवाघट, नवे वस्त्र, नऊपदरी सुताची वात, पंचपल्लव वगैरे साहित्य लागते. नऊ दिवस दररोज देवीची पूजा-आरती करून रोज नवी माळ घटावर चढवितात. देवीला पुऱ्या-करंज्यांचा फुलवरा वाहतात.

"ऐंद्री, ब्राह्मणी, महेश्वरी, वाराही, कौमारी, वैष्णवी, नारसिंही, मातृकादेवी आणि अंबा (मातंगी) या नऊ योगिनींची पूजा करून नऊ दुर्गा म्हणून रोज नऊ कुमारिकांना भोजन घालतात.

## तुळजापुरातील नवरात्राखेरीज इतर महिन्यांतील उत्सव

**कार्तिक** - कृष्णाष्टमीला देवीची पंचामृत महापूजा.

**मार्गशीर्ष** - चंपाषष्ठीला मल्लारीची पूजा व अष्टमीपर्यंत नवरात्र करून समारंभ करतात. चतुर्दशीला मंत्रजागर.

**पौष** - शुद्ध प्रतिपदेपासून अष्टमीपर्यंत देवी पुन्हा शयन करते, नंतर अष्टमी ते पौर्णिमेपर्यंत थाटाने शाकंबरीचे नवरात्र म्हणून मोठा उत्सव करतात.

**माघ** - रथसप्तमीला विष्णुतीर्थ-मंकावतीत स्नान व सूर्यपूजेचा उत्सव. पौर्णिमेला ब्राह्मणभोजन, शिवरात्रीला उपवास व शंकराची पूजा हा उत्सव होतो.

**फाल्गुन** - कृष्णाष्टमीला देवीची महापूजा करतात.

**चैत्र** - रामनवमीचा उत्सव रामतीर्थावर करतात आणि रामवरदायिनी देवीचा उत्सव थाटाने करतात.

**वैशाख** - अक्षय्यतृतीयेस रेणुकेसह परशुरामाची पूजा (घाटशिळेवर थाटाचा समारंभ करतात), शुद्ध चतुर्दशीला नृसिंहतीर्थावर स्नान व जयंती.

**ज्येष्ठ** - पौर्णिमेच्या दिवशी मातंगीदेवीची महापूजा.

**आषाढ** - वद्य नवमीला योगेश्वर दत्तात्रयाचा उत्सव.

**श्रावण** - नागपूजा नागझरी तीर्थावर, नागपंचमी, दर सोमवारी मुद्गलतीर्थात स्नान व सिद्धेश्वर महादेवाची पूजा. चतुर्दशीला जगदंबेची महापूजा.

**भाद्रपद** - पौर्णिमेच्या दिवशी पूजा व विविध प्रकारच्या भाज्यांचा विशेष नैवेद्य देवीला अर्पण करतात.

याखेरीज आठवड्यातले प्रत्येक मंगळवारी व शुक्रवारी देवीची महापूजा

करून रात्री छबिना काढतात. प्रत्येक पौर्णिमेच्या आधी व नंतरचा एकेक दिवस धरून तीन रात्री देवीचा छबिना काढतात. या सर्व मिरवणुका देवीच्या मंदिर-प्रांगणात विशेष थाटाने होतात.

## उपासना, नवस आणि दाने

देवीच्या सेवेचे वेगवेगळे प्रकार पुढीलप्रमाणे —

१) भोगी - पंचामृत पूजा. २) पाद्यपूजा - ओटी भरणे. ३) जावळ काढणे. ४) दंडवत घालणे. ५) लोटांगणे घेणे. ६) भळंदे ७) लिंब नेसणे ८) माळ - परडी. ९) पोत. १०) पानांची प्रभावळ ११) फुलांचे हार १२) कुंकुम-सडा १३) सूपदान १४) गोप्रदान १५) वेणीदान १६) मूल वाहणे- मुलाच्या पायात देवीची चांदीची बेडी घालणे १७) मूल उतरणे १८) खेळणा-पाळणा देवीला बांधणे १९) ओहर यात्रा - लग्नानंतर कुटुंबासह यात्रा करणे २०) टिळे, डोळे वाहणे. २१) आधाची बसणे - जोगवा मागणे २२) नवचंडी - शतचंडी यांचे पाठ विधिपूर्वक करणे. २३) होम करणे २४) नंदादीप लावणे - तेलवात वाहणे २५) देवी सहस्रनाम नित्य पाठ करणे - नामजप करणे २६) यथाशक्ती नैवेद्य फुलवरा देवीला अर्पण करणे. २७) गहाण ठेवणे - जेवताना एक हात गहाण. २८) भाग बांधून ठेवणे २९) उपवास धरणे, व्रत करणे.

अशा प्रकारच्या उपासनांची, नवसांची व दानांची माहितगार इसमांकडून नीट समजून घ्यावी व त्याप्रमाणे यथाशक्ती देवीची सेवा करावी.

प्रत्येक यात्रेकरूने मनोभावे तुळजापूरच्या यात्रेचा संकल्प करून तेथे जावे. देवीची धूळभेट घ्यावी, नंतर कल्लोळात स्नान करून गोमुखातील धार अंगावर घ्यावी. देवीचे आणि शंकराचे दर्शन घ्यावे.

देवीची विधियुक्त पूजा करून यथाशक्ती दाने द्यावी. नवस फेडावे. प्रदक्षिणा करून सर्व देव-देवतांची दर्शने घ्यावी. सर्व तीर्थांत स्थाने करावीत !

शुक्रवार अथवा मंगळवार साधून देवीचा कुलधर्म - कुलाचार करावा. पक्वान्न नैवेद्य देवीला अर्पण करावा. देवी-माहात्म्य व कथा श्रवण कराव्या आणि आनंदाने यात्रा पार पाडून सर्वांना प्रसाद वाटावा.


देवीची स्तोत्रे, अष्टके, आरत्या, पदे वगैरे साहित्य पाठ करून रोज म्हणावे. नामजप करावा. यशसिद्धीसाठी देवीची काही यंत्रे, कोष्टके व मंत्र आहेत, ते मिळवून त्यांचा योग्य तो उपयोग भावनिष्ठेने करावा.

प्रत्येक पिढीत एकदा तरी या कुलस्वामिनीचे प्रत्यक्ष दर्शन घ्यावे. तुळजापूरच्या भवानी देवीची ठाणी अनेक ठिकाणी आहेत. त्या देवीचे दर्शन घेऊन तेथेही पूजा-नैवेद्य केले तरी ही त्वरितादेवी प्रसन्न होते. असे आहे तुळजापूरच्या भवानी देवीचे माहात्म्य.

❖

# ७. श्रीक्षेत्र राक्षसभुवन

महाराष्ट्रातील अनेक तीर्थस्थानांपैकी एक मोठे पवित्र क्षेत्र म्हणून 'शनीचे राक्षसभुवन' प्रसिद्ध आहे. बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यात गोदावरी नदीच्या काठी हे क्षेत्र वसलेले आहे. बीड-औरंगाबाद राजरस्त्यावरील शहागडाच्या मोटारतळावरून पश्चिमेस पाच मैलांवर राक्षसभुवन आहे. या क्षेत्राला गीदातीशवरील उत्तरक्रिया करण्याचे पवित्र तीर्थ मानतात. त्याचप्रमाणे शनिग्रहाचे जागृत क्षेत्र म्हणूनही ह्या राक्षसभुवनाला लोकांची सतत गर्दी असते.




पूर्ववहिनी गोदावरीच्या दक्षिणतीरावर राक्षसभुवन हा जुनाट गाव बसलेला आहे. प्रचंड असे मजबूत दगडी बांधणीचे वाडे, अरुंद गल्ल्या, बोळ आणि बरीचशी पडझड झालेली वस्ती असे या गावाचे सध्याचे स्वरूप आहे. पूर्वी हे गाव फार वैभवसंपन्न असून ब्रह्मविद्येचे माहेरघर होते म्हणतात.

आतापी, वातापी अणि इल्वल या तीन राक्षसांनी ऋषिमुनींची रूपे घेऊन गोदातीरावर आपल्या परिवारासह वस्ती केली. श्राद्धपक्षाच्या आणि धार्मिक कार्याच्या निमित्ताने शेजारच्या वेदशास्त्रसंपन्न अशा ब्राह्मण वस्तीतील ब्राह्मणांना

ते राक्षस जेवण्यासाठी बोलावीत आणि त्या ब्राह्मणांना खाऊन ते स्वतःचे भोजन करीत. असा क्रम बरेच दिवस चालला. दक्षिणेच्या मोहाला बळी पडून बरेच ब्राह्मण त्या राक्षसांच्या पोटात गेले. नंतर ब्रह्मवृंदांत खळबळ उडाली. त्यांनी अगस्ती ऋषींना ते गाऱ्हाणे सांगितले तेव्हा त्या राक्षसांचा नाश करण्यासाठी स्वतः अगस्ती मुनी त्या राक्षस भुवनात ब्राह्मण म्हणून भोजनास गेले. अन्नाच्या रूपाने ते राक्षस अगस्ती ऋषींच्या पोटात गेले; पण त्यांनी आपल्या सामर्थ्याने पोटातच त्यांचे भस्म करून टाकले. इतर ब्राह्मणांच्या पोटातून ते राक्षस बाहेर येत आणि मग त्या ब्राह्मणांना मारून खात; पण या वेळी अगस्ती मुनी हा तेजस्वी ब्राह्मण त्यांना मिळाला. त्याने त्या राक्षसांचा नाश केला आणि ब्रह्मवृंदाना निर्भय केले

राक्षसभुवनाच्या स्थळाची अशी ही मूळची आख्यायिका सांगतात. अद्यापीही त्या राक्षरांच्या वस्तीचे ठिकाण आणि अगस्तिमुनींचे स्थळ तेथे दाखवितात. 'राक्षसभुवन' हे नाव त्यावरूनच पडले.

पुढे प्रभू रामचंद्र वनवासात असताना या स्थळी आले, तेव्हा अगस्तिमुनींची त्यांनी भेट घेतली. सहज बोलताना आपल्या ग्रहदशेची पीडा रामचंद्रांनी त्यांना विचारली. त्यावर अगस्ती मुनी म्हणाले, "रामा, तू तर प्रत्यक्ष परमात्मा आहेस, तथापि मनुष्यरूपात आहेस. म्हणून ग्रहदशा तुझ्या पाठीशी लागल्याचे वाटते. पण मी तुला असा वर देतो की, सर्व ग्रहांत शनी हा मोठा पापग्रह आहे. तो या ठिकाणी तुझ्याच स्वरूपात संपूर्ण विलीन होईल. तुला तर त्याची बाधा होणार नाहीच, पण या पवित्र क्षेत्री तुझ्या मूर्तीचीच शनिमूर्ती म्हणून जे लोक पूजा करतील, त्यांना शनीची बाधा होणार नाही! ग्रहपीडा होणार नाही!"

अगस्तिमुनींनी नंतर गोदावरीच्या दक्षिणतीरावर पौष शुद्ध अष्टमीला राम, लक्ष्मण, सीता या मूर्तींची स्थापना केली. त्याच मूर्तींना 'शनीची मूर्ती' म्हणून मान दिला.

त्या मूर्ती राम, लक्ष्मण, सीता यांच्या असल्या तरी शनीच्या दृष्टी, पोटी आणि पायी अशा तीन अवस्थांच्या मूर्ती म्हणून प्राचीन काळापासून पूजिल्या जातात. गंगेच्या प्रचंड व मजबूत घाटावर ऐन प्रवाहात त्या शनिमूर्तीची पूजाअर्चा, अभिषेक, नैवेद्य वगैरे सर्व कार्यक्रम नित्यनियमाने अद्यापही मोठ्या निष्ठेने चालतो. आपणास ग्रहपीडा होऊ नये म्हणून भाविक निष्ठावान लोकांची तेथे सतत मोठी गर्दी असते. या क्षेत्री मुख्य दैवत जे शनी, त्या देवाला मात्र मंदिर नाही. त्या मूर्ती घाटावर उघड्यावरच आहेत; पण गोदाकाठी घाटावर व इतरत्र अनेक मंदिरे व देवदैवते आहेत. गणपती, दत्त, विज्ञानेश्वर, काळकाई,

नृसिंह, मंदेश्वरमहादेव, मारुती वगैरे कितीतरी देवांची मंदिरे तेथे आहेत.

पावसाळ्यात गोदावरीला पूर आल्यावर हे शनीचे मूळ स्थान व त्या मूर्ती पाण्यात गडप होतात, त्या वेळी वरच्या घाटावर उंच ठिकाणी एका वृक्षाखाली शनीचे उपस्थान म्हणून पूजाअर्चा चालते. याच शनिग्रहाच्या जागृत देवस्थानामुळे या क्षेत्राला 'शनीचे राक्षसभुवन' असे प्रसिद्ध नाव मिळाले आहे. प्रत्येक शनि-अमावास्येला राक्षसभुवन क्षेत्री फार मोठी यात्रा जमते. त्या यात्रेमुळे येथील सध्याच्या ब्रह्मवृंदाला मोठी कमाई होते. वैशाखी अमावास्येला दरवर्षी शनिजयंतीचा मोठा उत्सव येथे करतात. त्या वेळी भरपूर दानधर्म केला जातो.

गणेशजन्माचा सप्ताह माघ शुद्ध प्रतिपदेपासून सप्तमीपर्यंत मोठ्या थाटाने या गावी दरसाल होत असतो. त्या वेळी सहस्रभोजने, कथा-कीर्तने, प्रवचने, नाटके वगैरे फारच मोठे कार्यक्रम होत असतात.

या गावच्या लोकांनी नाट्यकलेची जोपासना परंपरेला धरून सूत्रधार-नटी, गणेश-सरस्वती, विदूषक वगैरेंसह अद्यापही चालविली आहे. ती जुन्या काळची सांप्रदायिक रंगभूमी येथे अद्यापही यात्रा-उत्सवात उजळून निघते. येथील नाटके प्रसिद्ध व प्रेक्षणीय असतात. दत्तजयंती, नृसिंह जयंती वगैरे अनेक उत्सव या गावी दरवर्षी मोठ्या थाटाने व धार्मिक पद्धतीने होतात.

पौराणिक काळापासून राक्षसभुवन क्षेत्राचे महत्त्व असले तरी इतिहासकाळातही या स्थानाला महत्त्व प्राप्त झाले होते. हैदराबादच्या निजामाची; औरंगाबाद सुभ्याची जी अनेक लष्करी ठाणी होती, त्या ठाण्यांपैकी शहागड हे ठाणें प्रसिद्ध होते. पेशवाईच्या काळात निजाम आणि मराठे यांच्या ज्या लढाया झाल्या त्यांपैकी राक्षसभुवनची लढाई खूपच प्रसिद्ध आहे. शहागडच्या निजामी लष्करी छावणीवर हल्ला केला तेव्हा राक्षसभुवनाजवळ घनघोर युद्ध झाले. त्या युद्धात निजामाकडील एक शहाणा शूर, मुत्सद्दी वीर विठ्ठल सुंदर परशरामी हा मारला गेला. पेशवाईतील साडेतीन शहाण्यांपैकी एक शहाणा म्हणून विठ्ठल सुंदरची प्रसिद्धी होती. तो मूळचा संगमनेर येथील राहणारा. तो निजामाकडे गेला. तिकडे त्याला दिवाणपद मिळाले. तो राक्षसभुवनच्या लढाईत मारला गेला. वेशीजवळ अद्यापही राक्षसभुवन येथे गोदातीरी त्याची समाधी आहे.

राक्षसभुवन या प्रसिद्ध व पवित्र क्षेत्रात देवी अहिल्याबाई होळकर आणि बायजाबाई पेशवे यांनी अनेक घाट, मंदिरे बांधली. तेथील विद्वान ब्रह्मवृंदांना इनामे दिली. मोकाशे दिली, अन्नछत्रे व सदावर्ते स्थापन केली. देवांच्या पूजा-अर्चा करण्याची व्यवस्था लावून दिली; ती अद्याप चालू आहे.

राक्षसभुवनच्या गोदातटाकाचे सृष्टिसौंदर्य प्रेक्षणीय आहे. नदीचा स्वच्छ रुपेरी प्रवाह, विशाल वाळवंट, काठावरील घाट आणि ठायी ठायी सुंदर मंदिरे, भरपूर झाडी, डगरीवरील उंच पिंपळाच्या झाडाखाली शनीचा भव्य मजबूत घाट आणि प्रवाहातील मोठ्या चौथऱ्यावरील शनिदेवाचे उघडे पवित्र स्थान हा सर्व देखावा नास्तिकालाही मोहून टाकणारा आहे.

या स्थानावर दररोज अहर्निश ब्रह्मवृंदांची धावपळ चाललेली असते. दर्शन, पूजाअर्चा, अभिषेक, नैवेद्य, नवस फेडणे यांसाठी दूरदूरच्या लोकांची गर्दी येथे खूपच असते. नांदेडपासून तेलंगणातील लोकही येथे शनि-दर्शनास येत असतात. सांजसकाळ ब्राह्मणलोक स्नानसंध्येत मग्न असतात. मंत्रघोषांनी आसमंत दुमदुमतो -

"कोणस्थः पिंगलो बभ्रुः कृष्णो रौद्रोऽन्तको यमः ।
सौरि शनैश्चरो मंदः पिप्पलादेन संस्तुतः ॥
एतानि दशनामानि सायंप्रातः पठेन्नरः ।
शनैश्चरकृता पीडा न कदाचिद्भविष्यति ॥"

हे शनीचे स्तोत्र प्रत्येक जण मोठ्या भाविकतेने म्हणतो. मंदेश्वराच्या चौथऱ्यावर काही लोक शनिमाहात्म्य पोथीची पारायणे करतात. काही लोक शनीचा तेवीस हजार जप करण्यासाठी पुढील मंत्र म्हणत असतात –

"नीलांजनसमाभासं रविपुत्रं यमाग्रज़म् ।
छायामार्तंडसंभूतं तन्नमामि शनैश्चरम् ॥"

काही लोक शनिमूर्तीला तेलाचा अभिषेक करतात आणि कापूस, मीठ, सुवर्ण, लोखंड, उडीद, काळे वस्त्र व निळी फुले दान करतात. काही लोक शनीची कृपा होण्यासाठी प्रतिमादानही करतात.

रात्रीच्या वेळी गंगाप्रवाहात दिवे सोडण्याचीही मौज मोठ्या भाविकतेने या स्थळी होते. येथील गंगेचा प्रवाह वरून संथ दिसत असला तरी खालून फारच वेगाचा आहे. पायाखालील वाळू भराभर निसटून जाते. पात्र इतके स्वच्छ असते की, तळाची वाळू स्पष्ट दिसते.

हे क्षेत्र उत्तरक्रियेसाठीही खूपच प्रसिद्ध आहे. त्या ठिकाणी मृत इसमांचे अंत्य संस्कार किंवा उत्तरक्रिया करण्यासाठी दूरदूरचे लोक येत असतात. येथील क्षेत्रोपाध्यांकडे अनेक गावांच्या खूप वर्षांच्या जुन्या वंशावळ्या व नावांच्या चोपड्या आहेत. कोणत्या गावचे कोणकोणते यजमान आपले आहेत, त्यांच्या वर्णानुक्रमांच्या याद्या व त्यांच्या पूर्वजांचे खूप हस्तलेख त्याच्याकडे आहेत. उत्तरक्रियेसाठी कोठलाही यजमान येवो, तेथील गंगापुत्र त्याचे नावगाव विचारून

झटकन लेख काढून दाखवितात व त्याला आपल्या घरी नेऊन त्याची सर्व व्यवस्था यथासांग करून देतात.

राक्षसभुवन येथे दर आठवड्यास सोमवारी बाजार भरतो. तो जर शनिवारी भरू लागेल, तर या क्षेत्राचे महत्त्व आणखी वाढेल. देवदर्शनास येणाऱ्या लोकांची सहजच बाजाराचीही सोय होईल, व्यापार-धंदे वाढतील व आणखी प्रगती होईल, असे वाटते. शनिवार हा येथील प्रसिद्ध वार आहे! ग्रहदशेची पीडा निवारण्यासाठी श्रीशनैश्चराच्या दर्शनासाठी आणि आपल्या प्रिय पूर्वजांच्या, आप्तेष्टांच्या आत्म्याला शांती देण्यास त्यांच्या उत्तरक्रियेसाठी अनेक लोकांना या राक्षसभुवनक्षेत्राला जावे लागते; त्या सर्व लोकांना या नव्या पद्धतीने झालेला विकास व प्रगती पाहून खूपच समाधान वाटेल !

**साष्ट पिंपळगाव :** राक्षसभुवनाजवळच गोदावरीच्या पैलतीरावर पिंपळगाव नावाचे एक जुनाट पण प्रसिद्ध गाव आहे. दर गुरुवारी तेथे भरणाऱ्या बाजारासाठी खूप लोक जातात. पिंपळगाव हे दीक्षित आडनावाच्या जहागीदारांचे गाव आहे. त्या जहागीरदारांच्या वाड्यात त्रिपुरसुंदरी देवीचे प्रख्यात ठाणे आहे. वैशाख शुद्ध चतुर्थीला दरवर्षी येथे या देवीचा उत्सव मोठ्या थाटाने होतो. हे साष्ट पिंपळगावसुद्धा ऋषिभुवन म्हणून ख्यातनाम आहे. पैठण ते शहागड या मोटारमार्गावर पिंपळगाव प्रवासाला सोयीचे आहे. हल्ली तेथेही काही मंदिरे व प्रसिद्ध इतिहास-स्मारके आहेत; पण नजीकच्या राक्षसभुवन क्षेत्राच्या माहात्म्यापुढे या गावच्या माहात्म्याकडे लोकांचे थोडे दुर्लक्ष होणे साहजिकच आहे. राक्षसभुवन बीड जिल्ह्यात, तर पिंपळगाव साष्ट हे गाव औरंगाबाद जिल्ह्यात येते. कारण गोदावरी नदीचा मध्य प्रवाह हा त्या दोन जिल्ह्यांची सरहद्द ठरला आहे. पिंपळगावचा पाणवठा राक्षसभुवनच्या या पाणवठ्याच्या समोरच पण थोडा पूर्वेकडे उत्तरेकडे असा आहे. राक्षसभुवन पिंपळगावाप्रमाणे अनेक जोडीची गावे या नदीच्या ऐलपैल तीरावर आहेत!

**विज्ञानेश्वराचे आपेगाव :** राक्षसभुवनाजवळच गोदावरी नदीच्या पैलतीरी विज्ञानेश्वराचे आपेगाव या नावाचे खेडे आहे. त्या स्थळाला पौराणिक आणि ऐतिहासिक असे महत्त्व विशेष आहे. नागनारंवळाचा विधी येथे होतो.

या गावी विज्ञानेश्वर महादेवाचे मोठे मंदिर असून शिवरात्रीला येथे मोठी यात्रा भरते. या संस्थानाची पेशव्यांनी उत्तम व्यवस्था केली होती, असे सांगतात. येथे ऐतिहसिक वास्तूंचे भग्नावशेष अद्यापही आहेत.

**पांचाळेश्वर :** राक्षसभुवनाच्या पश्चिमेस सुमारे दोन मैल अंतरावर पांचाळेश्वर नावाचे एक महान् प्रसिद्ध क्षेत्र आहे. महानुभाव पंथीयांचे ते एक

मोठे श्रद्धास्थान आहे. ते एक प्रसिद्ध दत्तस्थान आहे !

**विष्णुपद :** राक्षसभुवनापासून पश्चिमेस एक मैलावर विष्णुपद नावाचे एक अतिरम्य तपोवन आहे. ते स्थळ ध्यान-धारणा व तपाचरण यासाठी फारच सोयीचे आहे. तेथे शिवदत्त महाराजांनी तपश्चर्या केली होती. शिवदत्त महाराजांच्या पुण्यतिथीचा उत्सव दरसाल मार्गशीर्ष वद्य द्वितीयेला मोठ्या थाटाने साजरा होतो. शिवदत्तांच्या समाधीजवळच त्यांचे शिष्य शंकरबुवा यांचीही समाधी आहे. हे शंकरबुवा पूर्वायुष्यात सरकारी कचेरीत फडणीस होते. भजन-पूजनाचा त्यांना फार छंद होता. पुढे दृष्टान्त झाल्यामुळे त्यांनी नोकरी सोडून पाथर्डीजवळ वृद्धेश्वर येथे तपाचरण केले. तेथे त्यांना रोज वाघाचे दर्शन होई. काही दिवसांनी त्यांना तेथेही दृष्टांत झाला म्हणून ते या विष्णुपदावर आले आणि शिवदत्त महाराजांचे शिष्य बनले.

राक्षसभुवनाजवळील हे विष्णुपदाचे स्थान आणि शिवदत्त महाराजांची समाधी व शंकरबुवांची समाधी ही स्थळे प्रसिद्ध आहेत. या ठिकाणी नित्य पूजाअर्चा, ध्यानधारणा, मंत्र, धार्मिक शिक्षण, वेदपठन इत्यादी कामे चालतात. या रम्य तपोवनात अनेक लोक सहलीसाठी येत असतात. येथील सर्वच व्यवस्था आदर्श असून नास्तिकालाही आस्तिक बनविणारी आहे. जुन्या पोथ्यांचा येथील संग्रह म्हणजे इतिहाससंशोधकांना खूपच काम देणारा आहे. येथील गोदातटाकी अनेक टेकड्या असून तेथे अधूनमधून जुन्या वस्तूही सापडतात. उत्खनन केल्यास तेथे पुराणवस्तू सापडून प्राचीन इतिहासावर प्रकाश पडण्याचा संभव आहे. एकंदरीत राक्षसभुवनाचा सर्व परिसर हा जुन्या महाराष्ट्रातील प्रतिष्ठानच्या नजीकचा असल्यामुळे पौराणिक व ऐतिहासिकदृष्ट्या फारच महत्त्वाचा आहे. प्रत्येक जिज्ञासूने त्या स्थळाला एकदा तरी भेट देणे जरूर आहे.

# ८. सर्व सुखाचे आगर श्रीक्षेत्र पंढरपूर

"माझे माहेर पंढरीऽ आहे भीवरेच्या तीरीऽऽ"

असे अनेक अभंग गात गात हजारो, लाखो वारकरी दरवर्षी पंढरीला जात असतात. पंढरी म्हणजे पंढरपूर आणि भीवरा म्हणजे भीमा नदी. ती या ठिकाणी चंद्रकोरीसारखा आकार घेऊन वाहते म्हणून तिला येथे चंद्रभागा असे म्हणतात.

"पुंडलिका भेटी परब्रह्म आले आणि हे पंढरपूर तीर्थक्षेत्र साऱ्या महाराष्ट्राचे माहेर बनले! अठरा पगड जातींच्या भाविक वारकऱ्यांचा, संतसत्पुरुषांचा या क्षेत्रात सतत मेळावा भरला. महाराष्ट्रातील साऱ्या तीर्थक्षेत्रात पंढरपूरला फार मोठं, महत्त्वाचं, मानाचं स्थान आहे.

द्वारकाधीश श्रीकृष्णाची पट्टराणी रुक्मिणी एकदा रुसली आणि द्वारकेहून थेट दिंडिरवनात आली. तिचा शोध करीत विष्णूचा अवतार तो भगवान कृष्णही मग दिंडीरवनात आला. तिथं एक चमत्कार घडला.


चंद्रभागेच्या तीरावर एका पर्णकुटीत पुंडलीक नावाचा थोर मातृपितृभक्त होता. त्याची भेट घेण्यासाठी भगवान गोपालकृष्ण त्याच्या दाराशी आले, पण तो भक्त पुंडलीक म्हणाला, "देवा, तिथंच थांबा. ही एक वीट घ्या. तिच्यावर उभे रहा !"

बराच वेळ झाला तरी पुंडलीक बाहेर येईना, कारण त्याचे माता-पिता मरण पावले होते आणि तो पुंडलीकही त्यांच्या चरणी लीन होऊन स्वर्गवासी झाला होता. ते पहाताच मग ते देवही एकदम थिजून पाषाणमूर्ती बनून या विटेवर कर कटीवर ठेवून समचरण उभे तटस्थ उभे राहिले.

आपला शोध घेत स्वतः भगवान द्वारकाधीश श्रीकृष्ण दिंडीरवनात आले आहेत, हे कळताच ती रुसलेली रुक्मिणी त्यांना शोधीत चंद्रभागातटी आली आणि पाहाते तर तो चमत्कार ! मग तीही पाषाणमूर्ती बनून तिथं देवाच्या मागील बाजूस तटस्थ उभी राहिली, लोकांना तो प्रकार कळल्यावर भक्तांच्या झुंडीवर झुंडी तिथं लोटल्या.

त्या भक्त पुंडलिकाचा, विटेवरील उभ्या भगवान विठ्ठलाचा आणि रुक्मिणी मातेचा साऱ्यांनी जयजयकार केला. सारा आसमंत मग त्या भावभक्तीच्या जयजयकारांनी दुमदुमून गेला. लोकांनी मग याच ठिकाणी भक्त पुंडलिकाची,

विठ्ठलाची आणि रुक्मिणीची मंदिरे बांधली. हळू- हळू त्या ठिकाणी वस्तीही वाढली. त्या पवित्र पांढरीला - पंढरी - पंढरपूर-विठूरायाची नगरी अशी नावं - दिली गेली.




पंढरी म्हणजे जणू दुसरी द्वारकानगरीच. इथं तो चैतन्याचा पुतळा सावळा विठ्ठल म्हणजे भगवान विष्णूंनी घेतलेला नववा बौद्धावतार! तो समचरण उभा राहून कर कटीवर ठेवून या जगातील लोकांच्या, भक्तांच्या लीला पाहतो. भक्तांच्या संकटात धावून जातो. दीन, पतित, पीडितांचा उद्धार करतो आणि संतसज्जनांकडून महान मानवतेच्या, समतेच्या धर्माचा भागवत - धर्माचा प्रसार करतो.

**"सुखासाठी जरी करिशी तळमळ**
**तरी तू पंढरीशी जाय एक वेळ ।"**

असा संदेश संतांनी लोकांना दिला आणि तसे हजारो, लाखो, कोट्यवधी भक्तांना अनुभवही आले. "सर्व सुखाचे आगर असे आहे पंढरपूर!"

युगे अठ्ठावीस विटेवर उभ्या असलेल्या विठ्ठलाचे सुंदर ते ध्यान डोळाभर पाहून दर्शन घेण्यासाठी महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांतून हजारो, लाखो भाविक वारकरी येत असतात. सगळीकडून पंढरपुरास जाण्यासाठी रेल्वेची, एस. टी. गाड्यांची चांगली सोय आहे.

आषाढी-कार्तिकीच्या एकादशींना तर अफाट जनसागर चंद्रभागेच्या पाण्यात स्नान करतो. वाळवंटात भजन-कीर्तनात दंग होतो. दिंड्यापताकांची शोभा अवर्णनीयच असते. पंढरी क्षेत्राचं वर्णन म्हणजे नुसतं मठमंदिरांचं, समाध्यांचं वर्णन नव्हे तर तेथील भावभक्ती, ईश्वरनिष्ठा आणि मानवधर्माच्या महान् एकतेचं वर्णन ! ते वर्णन करण्यात शेषाचीही जीभ थकेल, महाकवींचीही मती खुंटेल !



चंद्रभागेत स्नान, पुंडलिकाचं दर्शन नंतर महाद्वार घाटावरून विठ्ठलमंदिराकडे जाताना, श्रीकृष्ण मंदिर, राममंदिर, चोखोबा संताची समाधी इत्यादींचं दर्शन घेतलं जातं. विठ्ठलाच्या मुख्य मंदिराच्या पहिल्या पायरीवर संत नामदेवांनी चिरशांती मिळविली, तिथं त्यांच्या मुखवट्याचं दर्शन अवश्य घेतलं जातं. त्या पायरीला पाय न लावताच लोक मुक्तिमंडपात जातात. नंतर चौकात

गरुड, हनुमंत जे पुढे उभे राहिलेले आहेत त्यांच्या भेटी घेतात.

दीपमाळा, बोधलेबुवांचा रांजण आणि सोळाखांबी मंडपातील चांदीच्या खांबाला लोक कडकडून मिठी मारून आलिंगन देतात. जवळच्या रंगशिळेवर थयथय नाचतात. हरिनामाचा गजर मुक्तकंठाने करून नंतर गाभाऱ्यात जातात. तिथं तो चैतन्याचा पुतळा जो भूतळा अवतरला आहे त्या पांडुरंगाचं दर्शन घेतात. त्या सावळ्या विठ्ठलाच्या चरणी मस्तक ठेवून त्याचं ते गोजिरं रूप डोळा भरून पाहतात. तुळसीहार गळा ऽ कासे पीतांबर, शिवलिंग माथ्यावर आनंदाचा कंद ध्यान ते सुंदर मूर्ती मनोहर त्या पांडुरंगाचं दर्शन घेऊन भक्त पावन होतात, जीवनाचं सार्थक मानून धन्य होतात.

पांडुरंगाच्या मुख्य मंदिरामागे रुक्मिणीचे स्वतंत्र मंदिर आहे. त्या सौभाग्य-सुंदरीच्या भेटीला दर संक्रांतीला वायनदान देण्यासाठी महाराष्ट्रातून लाखो स्त्रिया येत असतात. सत्यभामा, राही, राधा यांनाही वायनदान देतात. आरतीत म्हणतात, "राही रखुमाबाई राणी या सकळाऽ
ओवाळिता राजा विठोबा सावळाऽ"

जवळच्या भिंतीत एक चौऱ्यांशीचा शिलालेख आहे. तिथं पाठ घासली म्हणजे चौऱ्यांशी जन्माचे जन्म-मरणाचे फेरे चुकतात, असा समज आहे!

गावातील अनेक मठ, मंदिरे, धर्मशाळा इ. पाहून झाल्यावर चंद्रभागेच्या पाण्यातून नावेतून गोपाळपुरा पाहण्यास भक्तांची गर्दी होत असते. तिथे देहुडाचरणी वाजवितो वेणू अशा श्रीकृष्णाचं दर्शन, जनाबाईचा संसार आणि काल्याची यात्रा इत्यादींचं दर्शन भावभक्तीनं घेतलं जातं.

वैकुंठभुवन असलेल्या पंढरपूर तीर्थक्षेत्राचं वर्णन किती करावं! पंढरीचा-द्वारकेचा महिमा तरी किती वर्णावा! विठ्ठलाच्या भक्तीचा त्या, भागवत धर्माचा, एकात्मतेचा "ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस!" ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम इत्यादी संतांनी आपलं जीवन विठ्ठलभक्तीत आणि त्या श्रेष्ठ भागवत धर्माच्या प्रसारात वाहून टाकलं होतं. आजही अनेक संत, कीर्तनकार तेच करीत आहेत. यापुढेही त्या पंढरपूर तीर्थक्षेत्राचं माहात्म्य सतत वाढतच राहणार आहे.

"पुंडलिका वर दे हारी विठ्ठल!"

# १. ज्ञानदेव डोळा पाहू !
# श्रीक्षेत्र देवाची आळंदी



"अलंकापुरी पुण्यभूमी पवित्र -
तिथे नांदतो ज्ञानराजा सुपात्र !
तया आठवीता महापुण्यराशी -
नमस्कार माझा तया ज्ञानेश्वरासी !"

गावोगावची भजनी मंडळी सुरुवातीला हा श्लोक म्हणून नंतर "सुंदर ते ध्यान उभे विटेवरी" हा पारंपरिक अभंग गातात. देवाआधी संतस्मरण? होय! संतांना तसा अग्रपूजेचा मान द्यावा लागतो, कारण संत हे सद्गुरू असतात, तेच देव दाखवतात आणि सकल संत-सज्जनांत ज्ञानेश्वर माऊलीलाच पहिला मान दिलेला आहे.

अलंकापुरी म्हणजे ज्ञानेश्वरांची आळंदी! तिथंच त्या ज्ञानदेवाचा जन्म झाला आणि तिथंच त्यांनी संजीवन समाधी घेतली. म्हणूनच त्या पवित्र पुण्यभूमीला पहिलं वंदन ! कोण होते ते ज्ञानदेव?

श्रीक्षेत्र पैठणजवळच्या आपेगाव येथील विठ्ठलपंत कुलकर्णी. त्यांना बालपणीच वैराग्य प्राप्त झालं. तीर्थयात्रा करीत ते आळंदीला आले. आळंदी हे पुरातन काळचे सिद्धेश्वराचे शिवस्थान होते. तिथं त्या नाथपंथी विरक्त विठ्ठलपंताला दृष्टान्तानं सिद्धेश्वर कुलकर्ण्यांच्या रुक्मिणीशी विवाहबद्ध व्हावं लागलं.

पण संसारात मन रमेना म्हणून विठ्ठलपंत एके रात्री गुपचूप घरातून निघून थेट काशीला गेले. तिथं त्यांनी श्रीपादस्वामींकडून संन्यास दीक्षा घेतली. पुढे श्रीपादस्वामी फिरत फिरत आळंदीला आले होते. "निघून गेलेल्या आपल्या पतीची भेट व्हावी" म्हणून सुवर्ण-पिंपळाला प्रदक्षिणा घालीत असलेल्या रुक्मिणीनं त्या श्रीपादस्वामींना नमस्कार केला तेव्हा त्यांनी त्या पतिव्रतेला "पुत्रवती भव" असा आशीर्वाद दिला, पण हा आशीर्वाद खरा कसा होणार ?

स्वामींनी मग पूर्ण चौकशी केली. ते काशीला परत गेले आणि आपल्या त्या चैतन्याश्रमाला-संन्याशी विठ्ठलपंताला - आळंदीला परत जाऊन नेटका संसार करण्याची आज्ञा दिली. त्याप्रमाणे विठ्ठलपंतांनी पुनः संसारात लक्ष दिलं. मग यथाकाल त्यांच्या संसाराला - निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई ही चार अमृतफळं लाभली.

शके ११९७ श्रावण कृष्ण अष्टमी जन्माष्टमीच्या मध्यरात्री जणू भगवान श्रीकृष्णानं धर्मस्थापनेसाठी ज्ञानदेवाच्या रूपानं पुनर्जन्मच घेतला होता. याच ज्ञानदेवानं पुढं भगवद्गीतेवर सुलभ टीका करून भावार्थदीपिका- ज्ञानेश्वरी- हा महान ग्रंथ सांगून मरगळलेल्या महाराष्ट्राच्या मराठी मनाला पुन्हाः अध्यात्माचं अमृत पाजलं.


ती चार भावंडं मोठी झाली, पण कुळकर्ण्यांच्या कुळवंतांची जातकुळीनं अवहेलना केली. संन्याशाच्या संतानाला मौंजीचा अधिकार नाकारला. तो अपमान विठ्ठल-रुक्मिणीला सहन झाला नाही. त्यांनी मग एकेरात्री आपली ती अपत्ये वाऱ्यावर सोडून पुन्हा काशीक्षेत्र गाठलं आणि आपले देह गंगेला अर्पण केले. कठोर काळानं त्या कोवळ्या कळ्या कोमेजून टाकल्या.

मौंजीच्या प्रमाणपत्रासाठी मग ती चारी भावंडे पैठण क्षेत्राला गेली, पण तिथल्या प्रतिष्ठित धर्मपंडितांच्या पाषाण हृदयाला पाझर फुटलाच नाही. मग रेड्यामुखी वेदमंत्र म्हणवून ज्ञानेश्वरानं आत्मैक्याचा साऱ्यांना चमत्कार

दाखविला.

नंतर ती भावंडे नेवासे क्षेत्रात येऊन विसावली. तिथं निवृत्तिनाथांच्या - गुरूंच्या - आज्ञेनं साक्षात्कार होऊन ज्ञानेश्वरानं - गीता ग्रंथाच्या ७०० संस्कृत श्लोकांवर ९०३७ ओव्या रचून मऱ्हाठी भाषेत भावार्थदीपिका- ज्ञानेश्वरी - या अमोल ग्रंथाची निर्मिती केली. बस ! हेच त्यांच्या जीवनाचं सार्थक ! कर्तव्याची ती पूर्तताच !

ज्ञानेश्वरीच्या रूपानं जगाला - विश्वाला - अध्यात्म ज्ञानदानाचं महान पवित्र कार्य केल्यावर पंढरीच्या विठ्ठलाचं दर्शन त्या भावंडांनी घेतलं आणि भक्त संत नामदेवाबरोबर तीर्थयात्राही केली.



जन्मगावी-आळंदीला परत आल्यावर ज्ञानेश्वरांनी जिवंत समाधी घेण्याचं ठरविलं आणि तशी तयारी करून, सिद्धेश्वर मंदिराच्या स्फटिक नंदीखालून भुयार तयार करून त्या भुयारात मग शके १२१८ कार्तिक वद्य त्रयोदशीला ज्ञानेश्वरांनी संजीवन समाधी घेतली.

सातशे वर्षे होऊन गेली तरी ज्ञानदेवांची ती समाधीस्थ चैतन्य मूर्ती होती तशीच आहे, याचा प्रत्यय संत एकनाथांना प्रत्यक्ष आलाच होता. त्यांनी दृष्टान्तानं ज्ञानदेवाच्या गळ्याला लागलेली अजानवृक्षाची मुळी प्रत्यक्ष त्या भुयारात जाऊन काढली होती, हा पुरावा आहे.

ज्ञानेश्वर माऊलीच्या त्या समाधीवरील शिळेचं, त्या अजानवृक्षाचं, दारीच्या त्या सौभाग्य सुवर्ण पिंपळाचं आणि सिद्धेश्वरादि पुरातन पावन मंदिराचं दर्शन घेऊन पावन होण्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून हजारो लाखो भक्तगण आळंदीला नित्य येत असतातच ! अनेक संतांचा सहवास सार्‍यांना तिथं लाभतो. भजन, कीर्तन, ज्ञानेश्वरी वाचन, पारायण, प्रवचन आणि ज्ञानेश्वर माउलीच्या जयजयकारांनी आळंदीचा आसमंत सतत दुमदुमलेला असतो. इंद्रायणीच्या लाटा घाटाघाटावर भेटी घेऊन सतत त्या ज्ञानराजाला वंदन करीत असतात.

"चला आळंदीला जाऊ, ज्ञानराज डोळा पाहू ! या ओढीनं आळंदीला जाण्यासाठी पुण्याहून एस. टी., बस, मोटारींची फार चांगली सोय केलेली आहे.

## आळंदीला आल्यावर

इंद्रायणीच्या पुलावरून समाधी मंदिराचा कळस दिसतो. घाटावर स्नान करून भक्तजन ज्ञानेश्वर दर्शनाला जातात. समाधी मंदिर म्हणजे देऊळवाडा. पहिल्या पायरीवर हैबतबाबांची लहानशी मूर्ती. पंढरीला जशी नामदेवांची पायरी तशी आळंदीलाही हैबतबाबा भक्ताची पायरी. तिथं माथा टेकवून लोक देऊळवाड्यात जातात.

पूर्वेला गणेशद्वार, पश्चिमेला पाणदरवाजा, उत्तरेला महाद्वार. महाद्वारातून आत गेल्यावर गरुड - हनुमान दर्शन..भजनी मंडपात विठ्ठलरुक्मिणी यांचं दर्शन, नंतर गाभाऱ्यात ज्ञानेश्वर माउलीच्या समाधिशिळेचं दर्शन. आळंदी क्षेत्राचं हेच महत्त्वाचं भावदर्शनीय ठिकाण आहे.

गाभाऱ्यातून पूर्वदरवाजानं बाहेर यावं, गणेश आणि सिद्धेश्वर यांचं दर्शन घ्यावं. तिथं नंदी हेही ठिकाण महत्त्वाचं आहे. कारण
"उठविला नंदी शिवाचा ढवळा उघडिली शिळा विवरांची !" असं हे ठिकाण !

प्रदक्षिणेच्या वाटेवर मुक्ताबाई मंदिर, नंतर अजानवृक्ष, सुवर्णपिंपळ, नाथांचा पार, केसरीनाथांची समाधी, लक्ष्मीनाथ आणि भोजलिंग काका यांच्या समाध्या, महादेव बाबांच्या पादुका, हरिहरेंद्र स्वामींचा मठ, नंतर अनेक धर्मशाळा, गोपाळपुऱ्याकडे जाताना नृसिंह - सरस्वतींचा मठ, ज्ञानेश्वर उद्यान, सिद्धबेट इ. पाहून झाल्यावर आणखी एक महत्त्वाचं दर्शनीय स्थळ -

वाघावर बसून भेटीला आलेले पणतांबे येथील योगीराज चांगदेव यांचे गर्वहरण करण्यासाठी ज्ञानदेवादि भावंडांनी चालवलेली ती जड भिंत! त्या भिंतीच्या स्मारकाचं आणि तीवरील भावंडांच्या मूर्तींचं दर्शन घेऊन भक्तजन कृतकृत्य होतात. शेवटी चंद्रभागेतील पुंडलिकाचं दर्शन घेऊन आपली आळंदीची नगर- प्रदक्षिणा पूर्ण होते.

आळंदी हे क्षेत्र ज्ञानदेवांची आळंदी म्हणून सध्याच्या काळात प्रख्यात असले तरी फार फार प्राचीन काळात हे सिद्धक्षेत्र शिवपीठ म्हणूनही प्रसिद्ध होते. येथील सिद्धेश्वर मंदिर आणि इंद्रायणीच्या पात्रातील 'सिद्धबेट' अशा काही प्राचीन अवशेषांवरून ती गोष्ट खरी आहे.

इंद्रायणी काठी इंद्रदेवांनी अनेक यज्ञयाग केले होते. या नदीला कुबेरगंगा असे नाव होते. अनेक सिद्ध-सत्पुरुषांनी या क्षेत्रात निवास केला होता. पूर्वी या

असे नाव होते. अनेक सिद्ध-सत्पुरुषांनी या क्षेत्रात निवास केला होता. पूर्वी या क्षेत्राला आनंदविपिन, अलका वगैरे नावे होती. राष्ट्रकूट राजांनी या तीर्थक्षेत्राला 'अलन्दिय' असे नाव दिले. त्यावरून आळंदी! संतांनी अलंकापुरी अशी नावे रूढ केली.

ऐतिहासिक काळात महाराष्ट्रावर अनेक संकटं आली. देव-देवतांच्या मंदिर-मठांचा विध्वंस झाला, पण भागवत धर्मीयांनी, वारकऱ्यांनी ती लाट थोपवून आळंदी येथील ज्ञानराज माऊलीची समाधी अभंग ठेवली. शिवछत्रपतींनी, नंतर पेशवे सरकारांनी लक्ष ठेवून आळंदी क्षेत्राचं महत्त्व वाढविलं. इंग्रजी आमदानीतही सरकारनं आळंदीचा मार्ग खुलाच ठेवला.

हल्लीच्या काळात तर या क्षेत्राची खूपच सुधारणा झाली आहे, भरभराट झाली आहे. येथील नगरपालिका यात्रेकरूंच्या सर्व प्रकारे सुखसोयी करण्यात दक्ष असते. अनेक दानशूर भक्त-भाविकांनी आळंदी क्षेत्राच्या विकासात भर घातली आहे. जुन्या स्मारकांचे जीर्णोद्धार झाले आहेत. नित्य-नैमित्तिक उपचार प्रचंड यात्रा, सण-समारंभ अत्यंत शिस्तबद्धरीत्या केले जातात. पालखी-सोहळा तर अवर्णनीय असाच असतो. संस्थान कमिटी, वारकरी शिक्षणसंस्था, ज्ञानेश्वर विद्यापीठ इत्यादींचे निष्ठापूर्वक सेवाकार्य प्रगतिपथावर आहे.

## काही प्रसिद्ध काव्यपंक्ती

"ज्ञानेश्वरीपाठी - जो ओवी करील मऱ्हाटी -
तेणे अमृताचे ताटी - जाण नरोटी ठेवली ॥"

- संत एकनाथ

" आता विश्वात्मके देवे, येणे वाग्यज्ञे तोषावे
तोषुनी मज द्यावे - पसायदान हे ॥"

- संत ज्ञानेश्वर

"तुका म्हणे तेथे सुख काय उणे
राहे समाधाने चित्ताचिया !"

- संत तुकाराम

आळंदी हे गाव - पुण्यभूमी ठाव ।...
नामा म्हणे देवा - चला तया ठाया ।

- संत नामदेव

भू वैकुंठ पंढरपूर - त्याहुनी थोर महिमा या
निळा म्हणे जाणोनि संत - येती धावत प्रतिवर्षी

- संत निळोबाराय

सर्व सुखाची लहरी - ज्ञानाबाई अलंकापुरी -
शिवपीठ हे जुनाट - ज्ञानाबाई तेथे मुगुट ।
ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर - मुखी म्हणता चुकती फेर -
जन्म नाही रे आणिक - तुका म्हणे माझी भाक ॥

- संत तुकाराम

ऐसिया स्थळी समाधि ज्ञानदेव -
एका जनार्दनी ठाव - अलंकापूर ।
ज्ञानाबाई आई आर्त माझे पायी -
धावूनिया येई झडकरी ऽ
नामयाची जनी म्हणावी आपुली -
तुम्ही आपंगिली मायबाप !

- संत जनाबाई

REFBK-0029338

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भूपरिवार
क्रा. क्र. २९२३८